रेशीमगाठी

(निवडक कोकणी ललित निबंधांचा अनुवाद)

चिन्मय मधू घैसास

रेशीमगाठी
(निवडक कोकणी ललित निबंधांचा अनुवाद)
चिन्मय मधू घैसास
संपर्क : ९८२३७२८६४०

Reshimgaathi
(Translation of select Konkani essays)
Chinmay Madhu Ghaisas

प्रथम प्रकाशन : २०१८

प्रकाशक :
सौ. संपदा चिन्मय घैसास
घर क्र. ७३, वरगाव, माशेल, गोवा. ४०३१०७
संपर्क : ९९२२५४२८४०

© संपदा चिन्मय घैसास
सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक :
इंप्रेशन्स, बेळगाव

मुखपृष्ठ : प्रसाद नाईक
संपर्क : ९३२६१३३७९७

मूल्य : रु. १५०/-

978-93-5291-952-9

अर्पणपत्रिका

माझ्यातील क्षमता ओळखून, जाणून
माझ्या सर्वांगीण उत्कर्षासाठी आयुष्यभर झटणाऱ्या माझ्या
आई-वडिलांना सादर अर्पण. . .

अनुक्रमणिका

- मागीलदार २४
- दिवे ३०
- रंग श्रावणाचे ३४
- स्पष्टतेतील स्पष्टता ४२
- जीवनाचा रियाज ४९
- गावाकडे ५९
- खुबे ६७
- कुठे गेली ती प्रेमळ मने? ७३
- सायकल ७९
- व्यवस्था आणि अवस्था ८५
- गुलमोहर ९३
- छिमकणी ९८
- मिकी १०३
- कारवार : एक अनुभव १०७
- लोणचे १११

ऋणनिर्देश

साहित्यनिर्मिती वा भाषांतराच्या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या व्यक्तीवर विश्वास दाखवून आपले साहित्य भाषांतरित करण्याची परवानगी त्या व्यक्तीला देणे ही तशी धाडसाचीच गोष्ट. असा विश्वास दाखवायला दृढ विश्वासाच्या जोडीलाच एक उदार हृदय लागते. या पुस्तकासाठी श्री. मुकेश थळी, श्री. संजीव वेरेंकार आणि सौ. शीला कोळंबकार यांनी आपले निबंध वापरण्याची परवानगी दिली त्याबद्दल सर्वप्रथम त्यांचे मन:पूर्वक आभार. भाषांतराच्या एकुण वाटचालीत, या तीन्ही लेखकांनी स्वत:, अनेक संदर्भ स्पष्ट करण्यासाठी आपला बहुमूल्य वेळ दिला त्यासाठीही त्यांचे विशेष आभार. अनुवादाच्या कार्यात, ज्या कोकणी शब्दकोशाची खूप मदत झाली त्या कोशाचे कर्ते श्री. सुरेश बोरकार, श्री. मुकेश थळी आणि श्री. दामोदर घाणेकार यांचेही आभार.

गोवा सरकारचे सार्वजनिक बांधकाम तथा वाहतुक मंत्री माननीय 'श्री. रामकृष्ण उर्फ सुदिन माधवराव ढवळीकर' यांचा आशीर्वाद प्रत्येक सद्कार्याला असतोच. सामाजिक, सांस्कृतिक कार्यासाठी त्यांचे प्रोत्साहन नवीन उर्जा देणारे असते. या पुस्तकाच्या निर्मितीसाठीही त्यांची प्रेरणा लाभली त्यासाठी त्यांचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच. त्यांचा आधाराचा हात असाच आमच्या पाठीशी सदैव असेल व त्यांच्या आशीर्वादाच्या बळावर नवनवीन उपक्रम पूर्णत्वास जातील याची पुरेपूर खात्री आहे.

पुणे विद्यापीठात एम. ए. करत असता 'तौलनिक साहित्याभ्यास' आणि 'भाषांतर' या विषयाचे अत्यंत प्रगत व सखोल ज्ञान, डॉ. विजया देव यांच्याकडून मला प्राप्त झाले. त्यांनी दिलेल्या

ज्ञानाच्या बळावरच हा साहित्यनिर्मितीचा अल्पसा प्रयत्न करण्याचे धाडस मी दाखवू शकलो. आपल्या प्रचंड व्यस्त कामकाजातून वेळ काढून, या पुस्तकासाठी त्यांनी प्रस्तावना लिहिली तसेच वेळोवळी मला अमूल्य असे मार्गदर्शन केले त्यासाठी मी त्यांचा आजन्म ऋणी आहे.

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी असल्यापासून आजतागायत, कायम प्रत्येक विषयात ज्यांचे अमूल्य मार्गदर्शन मला लाभत आले आहे, मराठी साहित्याविषयीची तसेच अनुवादासंबंधीची माझी जाणीव ज्यांनी अधिकाधिक समृद्ध केली त्या माझ्या गुरु डॉ. विद्या प्रभुदेसाई यांचाही मी ऋणी आहे.

या पुस्तकासाठी आय. एस. बी. एन. क्रमांक मिळविणे ही गोष्ट आमच्यासाठी प्रचंड महत्त्वाकांक्षी बाब होती. गोवा सरकारच्या कृष्णदास शामा राज्य मध्यवर्ती वाचनालयाचे प्रमुख ग्रंथपाल (क्युरेटर) डॉ. कार्लुस फर्नांडिस तसेच त्यांचे सहकारी आणि माझे मित्र श्री. प्रशांत फडते यांनी यासाठी अत्यंत मोलाची मदत केली त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार. मी अध्यापन कार्य करीत असलेल्या, श्री शांतादुर्गा शिक्षण समितीच्या सौ. अन्नपूर्णाबाई माधवराव ढवळीकर विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयातील माझे सर्व सहकारी आणि विशेष म्हणजे ग्रंथपाल श्री. प्रकाश नार्वेकर यांचेही या कार्यात मला सहकार्य लाभले. त्यासाठी त्या सर्वांचेही आभार.

माझ्या जन्मापासून, ज्यांनी माझ्यावर भाषिक-सांस्कृतिक-सांगितिक संस्कार केले, माझ्यातील उत्साह कायम सळसळत ठेवला आणि मला अमूल्य मार्गदर्शन केले त्या माझ्या आई-वडिलांचाही मी अनंत ऋणी आहे. माझी पत्नी सौ. संपदा घैसास हिने या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी उचलली. अनेकदा, अनुवादाच्या व्यापात मी गुंतून राहिल्यामुळे प्रापंचिक जबाबदाऱ्यांचा भार घरच्या मंडळींना सोसावा लागला आणि त्यामुळेच या पुस्तकाचे काम मी शक्य तेवढ्या लवकर पूर्ण करू शकलो त्यासाठी मी त्यांचाही ऋणी आहे.

या पुस्तकासाठी मुखपृष्ठ रेखाटणारे प्रतिभावंत चित्रकार श्री. प्रसाद नाईक तसेच सर्व तंत्रज्ञांचेही मी आभार मानतो. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी ज्या-ज्या ज्ञात-अज्ञात व्यक्तींनी हातभार लावला त्या सर्वांचेही मन:पूर्वक आभार मानतो. धन्यवाद !

□

मनोगत

''गोकर्णादुत्तरे भागे सप्तयोजनविस्तृतं
तत्र गोवापुरी नामे नगरी पापनाशिनी''

स्कंद पुराणातील सह्याद्रीखंडात 'पापनाशिनी' असे वर्णन केलेल्या तसेच विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि भाषिक गुणांचा वारसा लाभलेल्या पुण्यभूमी गोव्यात माझा जन्म झाला. या सर्व गुणांचा आणि परंपरांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम बालपणापासूनच माझ्या जीवनावर झाला. कोणत्याही व्यक्तीसाठी अभिव्यक्तीचे सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा. माझा जन्म झाला तोच मुळात मराठी आणि कोकणी या दोन्ही भाषांचा वारसा घेऊन. फोंडा तालुक्यातील मडकई गावचा माझा जन्म. आमच्या कुटुंबात पूर्वापार कोकणीचाच वापर. त्यामुळे साहजिकच, बालपणापासून घरात आणि घराबाहेर कोकणी भाषाच दैनंदिन वापरात येई. माझी आई मात्र मराठी भाषिक घराण्यातील. त्यामुळे साहजिकच मराठी माझी मातृभाषा बनली. परंतु त्यामुळे कोकणी भाषा कधीच नावडती झाली नाही. मराठी आणि कोकणी या दोन्ही भाषांचा समान वारसा घेऊनच मी लहानाचा मोठा झालो.

मराठी भाषा तर माझ्या लिहिण्या-बोलण्या-वाचनात येत होतीच परंतु कोकणी भाषेतून मात्र संवाद साधण्यापलीकडे म्हणावे तसे काही कार्य माझ्या हातून घडत नव्हते. त्यातच सन् २००९ साली एका खाजगी वृत्तवाहिनीत कोकणी बातमीपत्रासाठी वृत्तनिवेदक म्हणून मी रुजू झालो आणि कोकणी भाषेतील माझे अल्पसे कार्य सुरू झाले. त्यानंतर, सन् २०१२ साली पणजी दूरदर्शन आणि सन् २०१३

साली पणजी आकाशवाणी केंद्राच्या प्रादेशिक वृत्तविभागात कोकणी बातमीपत्रासाठी हंगामी वृत्तवनिवेदक तथा भाषांतरकार म्हणून माझी निवड झाली आणि कोकणीशी माझी जवळीक प्रचंड प्रमाणात वाढली. या दोन्ही ठिकाणी काम करताना, कोकणीतील नामवंत व्यक्तींशी माझा जवळचा संपर्क आला. त्यातीलच महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे आकाशवाणी पणजी केंद्राचे वृत्तनिवेदक/साहित्यिक श्री. मुकेश थळी आणि कोकणीतील नामवंत साहित्यिक श्री. संजीव वेरेंकार.

खरे म्हणजे जन्मापासून मराठी आणि कोकणी या दोन्ही, भगिनीसमान असणाऱ्या, भाषा मी जगत आलो होतो परंतु यातील कोणत्याही एका किंवा दोन्हीतून काही लेखन करावे असा विचार कधी आलाच नाही. असे म्हणतात की प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते. श्री. थळी आणि श्री. वेरेंकार आणि यांच्याशी संपर्क आला आणि माझ्या आयुष्यात 'ती' योग्य वेळ आली असे मी म्हणेन. श्री. थळी, 'दै. नवप्रभा' च्या सेवेत असणारे श्री. वेरेंकार आणि मी असे आम्ही तिघे बहुधा एकत्रच प्रवास करीत. त्या प्रवासात रोज वेगवेगळ्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक आणि अन्य विषयांवर चर्चा, उहापोह होत. त्या सर्वातून काहीतरी समुद्रमंथन होत होते एवढे मात्र नक्की.

मराठी साहित्य हा विषय घेऊन पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातून मी एम. ए. झालो खरा परंतु स्वतंत्रपणे एखादी साहित्यनिर्मिती करावी असा विचार त्यावेळेस कधी मनात आला नाही. मात्र श्री. थळी आणि श्री. वेरेंकार यांच्यासोबत साहित्य, भाषा आणि तत्सम विषयांवरच्या चर्चेत जेव्हा रोज सहभागी होण्याची संधी मिळाली तेव्हा मात्र कुठेतरी, आपणही काहीतरी प्रयत्न करून पहावा असे मनाला वाटून गेले. एम. ए. करताना भाषांतर हा माझा विशेष प्राविण्याचा (specialisation) विषय होता. त्याआधीही भाषांतराच्या क्षेत्रात बरेच कार्य करण्याची संधी मला मिळालेली

होतीच. त्यामुळे भाषांतराच्याच क्षेत्रात एखादी नवनिर्मिती करण्याच्या दृष्टीने मी विचार करू लागलो.

एके दिवशी सहज चर्चा चालल्या असता, श्री. थळी आणि श्री. वेरेंकार यांच्याशी हा विचार मी बोलून दाखविला. त्यांनीही तो लागलीच उचलून धरला आणि त्याच क्षणी या विषयावर आम्ही कामाला लागलो. भाषांतर करायचे कशाचे हा प्रश्न महत्त्वाचा होता. त्यावर, कोकणी निबंधांचे मराठी भाषांतर करणे नाविन्यपूर्ण ठरेल असा विचार समोर आला आणि मी क्षणाचाही विलंब न लावता कामाला लागलो. श्री. थळी आणि श्री. वेरेंकार यांची निबंधांची पुस्तके प्रकाशित झालेली आहेत त्यातीलच निवडक निबंध घ्यावेत असे ठरले. त्याच जोडीला, कोकणीतील अत्यंत नामवंत आणि ज्येष्ठ लेखिका म्हणजे सौ. शीला कोळंबकर यांच्या काही निवडक निबंधांचा समावेश करावा असे ठरले. आणि मग त्यानुसार, श्री. मुकेश थळी, श्री. संजीव वेरेंकार आणि सौ. शीला कोळंबकर या तीन्ही लेखकांची परवानगी आणि मार्गदर्शन घेऊन या अनुवादाचा 'श्रीगणेशा' झाला.

या पुस्तकातील निबंध मानवी जीवनातील वेगवेगळ्या क्षणांचे, आठवणींचे व प्रसंगांचे हृदयंगम वर्णन करतात. आपल्या गतस्मृतींना हात घालत हे निबंध आपल्याला भूतकाळात घेऊन जातात. यातील निबंधांत वर्णन केलेल्या गोष्टी, आपण सर्वांनी आपल्या बालपणी नक्कीच अनुभवलेल्या परंतु काळाच्या ओघात कुठेतरी विस्मृतीत गेलेल्या आहेत. या निबंधांच्या निमित्ताने, कुठेतरी त्याच गतस्मृतींची उजळणी होईल आणि प्रत्येक लेख वाचकाला भूतकाळात घेऊन जाईल याची खात्री वाटते.

वास्तविक, गोमंतकीय जीवनाच्या बाबतीत साधारपणपणे बिगर-गोमंतकीयांच्या मनात अनेक भ्रामक, अतिरंजित कल्पना असलेल्या दिसतात. गोमंतकीय जीवन म्हणजे फक्त मजा-मस्ती आणि स्वैराचारच जणू असेही अनेकांना वाटते. परंतु गोमंतकीय

जीवनाला स्वत:ची अशी संस्कृती, साहित्य व इतिहास आहे याची जाणीव आणि ओळख कुठेतरी या निबंधांच्या माध्यमातून व्हावी आणि त्यायोगे गोव्याच्या एकुण जीवनाबद्दल असलेले भ्रम आणि गैरसमज दूर व्हावेत एवढीच माफक अपेक्षा.

रेशीमगाठी या शीर्षकातून मनातील भावना, स्मृती आणि मराठी-कोकणी भाषांचे बंधच जणू अधोरेखित होतात. आठवणींचे अनेकविध बंध, भाषांतील नात्यांची गुंफण आणि वीण या संग्रहात मांडलेली आहे. रेशीमगाठी या शीर्षकातून मनातील भावना, स्मृती आणि मराठी-कोकणी भाषांचे बंधच जणू प्रदर्शित होतात. हा निबंधसंग्रह रसिक वाचकांना आवडेल अशी आशा बाळगतो. धन्यवाद !

चिन्मय मधू घैसास

□

डॉ. विजया जयन्त देव

जन्म : ४ सप्टेंबर १९५१ (मुंबई)
पत्ता : २०२, संपादन, प्रभात रोड, १४ वी गल्ली,
६१/९ एरंडवणे, इन्कम टॅक्स ऑफिससमोर,
पुणे. ४११००४
संपर्क : ९४२३००९५२२

शिक्षण :
बी.ए. (संस्कृत/मराठी, मुंबई विद्यापीठ), एम.ए. (लिंग्विस्टिक्स, पुणे विद्यापीठ)
एम.ए. (मराठी-तौलनिक साहित्याभ्यास, मुंबई विद्यापीठ), पीएच.डी. (लिंग्विस्टिक्स, मुंबई विद्यापीठ)

कार्यानुभव :
मुंबई विद्यापीठाच्या भाषाविज्ञान विभागात संशोधन सहायक व अध्यापन, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात अध्यापन, पीएच.डी. मार्गदर्शक, ललित कला केंद्र (पुणे विद्यापीठ),
स. प. महाविद्यालय (पुणे) व एस. एन. डी. टी. विद्यापीठात अध्यापन.

प्रकाशित साहित्य :
लेखक परिचय पुस्तिका, नितीन प्रकाशन, पुणे, १९९१
'हसऱ्या कथा गंगाधर गाडगिळांच्या', (संपादन), दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९६.
एम. पी. एम. सी. मराठी, नितीन प्रकाशन, पुणे, १९९७
पवित्र बायबल (जुना करार), (अनुवाद), वर्ल्ड बायबल ट्रांसलेशन सेंटर, २००१

‘समुद्राकाठचा गाव’ (अनुवादित कादंबरी), नेशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, १९९९
फिनिक्सची दंतकथा (व्हिएतनामी कथा, अनुवाद), नेशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, २००५
सखे सोयरे (स्वतंत्र, ललित), कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २०१२
माझे सैनिक, माझा लढा (अनुवाद, जनरल जे. जे. सिंग यांचे आत्मचरित्र), अमेय प्रकाशन, पुणे, २०१३
नदी आणि स्त्रीत्व (अनुवाद, ॲरनफेल्डहाऊस "Water and womanhood'), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१४
टोटल फिटनेस (अनुवाद, लीना मोगरे, ‘Total Fitness’), अमेय प्रकाशन, पुणे, २०१६
Interrogating Motherhood : by Jasodhara Bagchi, S-GE Publications, २०१७ (मराठी अनुवाद)

□

प्रस्तावना

डॉ. विजया देव

कोकणी भाषेतील ललित लेखन मराठीत आणल्याबद्दल, प्रथम, अनुवादक चिन्मय घैसास यांचं अभिनंदन केलं पाहिजे. या अनुवादामुळे, कोकणीत लिहित्या असणाऱ्या, ललित लेखकांचा परिचय मराठी वाचकांना होत आहे. आजवर मराठी साहित्य अनुवादामार्फत कोकणी भाषेत पोचलं असलं तरी कोकणी लेखन सहसा मराठीत यापूर्वी आलेलं नव्हतं. म्हणूनही चिन्मय घैसास अभिनंदनाला पात्र आहेत. याआधी असे अनुवाद सहसा झाले नाहीत याला बहुधा दोन कारणं असावीत : एकतर कोकणी आणि मराठी भाषा एकमेकींना जवळच्या; आणि दुसरं, गोव्यातील कोकणी लेखकच मराठीत लिहीत आले आहेत म्हणून निकड जाणवली नसावी.

या लेखसंग्रहात घैसास यांनी अनुवादासाठी मुकेश थळी, संजीव वेरेंकार आणि शीला कोळंबकार यांच्या लेखनाची निवड केली आहे. हे तीन्ही लेखक गोव्यातील जीवन समरसून जगणारे आणि या जगण्यावर प्रेम करणारे आहेत. या मातीशी त्यांची नाळ जुळलेली आहे आणि त्यामुळे इथे घेतलेल्या अनुभवांचा रसरशीतपणा त्यांच्या लेखनात आहे. जीवनानुभवातले काहीसे साम्य आणि लेखकपरत्वे लेखनातील भिन्नत्व यांचा चांगला मेळ या संग्रहात आहे. ''माझ्या गोव्याच्या भूमीत गड्या नारळ मधाचे'' या बा. भ. बोरकर यांच्या काव्यपंक्तींची आठवण करून देणारे हे लेखन आहे.

हे भावपूर्ण लेखन आत्मपर, चिंतनपर, गोव्यातील बदलांचा मागोवा घेणारे आहे. वैयक्तिक आयुष्यात आणि गोव्याच्या

सांस्कृतिक पर्यावरणात जे बदल घडत गेले त्यातून हे लेखक गेलेले आहेत. त्याविषयीच्या चिंतनामुळे या सर्व लेखांना एक गहिरेपण आले आहे.

गोव्याविषयी, गोव्याबाहेरील समाजाची, एक पर्यटक मनोवृत्ती झालेली अलीकडे दिसून येते. गोवा म्हणजे मौजमजा, दारू, समुद्रकिनारे, मनमोकळं (म्हणजे धरबंद नसलेलं) जीवन, यापलिकडे या लोकप्रिय समाजाची झेप जात नाही. या पठडीतल्या कल्पनांना छेद देणारे हे लेखन आहे हे इथे आवर्जून नमूद करावेसे वाटते. गोव्याच्या संस्कृतीचा खरा गाभा इथे आपल्याला पहायला मिळतो. जे जीवन गोव्यातील लेखकांनी पाहिलं, अनुभवलं, उपभोगलं आणि अंतर्यामी जपून ठेवलं त्याचं दर्शन या अनुवादातून आपल्याला होतं आणि गोव्यातील समृद्ध संस्कृतीला खरा उजाळा मिळतो. संस्कृतीचा असा परिचय साहित्यातून होणं हेच अनुवादाचं एक श्रेय असतं. त्याची प्रचीती आपल्याला या लेखनातून येते. मराठी साहित्यात या अनुवादाची भर पडल्यामुळे मराठी साहित्याचं दालन काही अंशी अधिक समृद्ध झाल्याचं समाधान हे लेखन आपल्याला देतं.

तरुण अनुवादक चिन्मय घैसास यांना ललित साहित्याच्या अनुवादाचा अनुभव फारसा नसेलही, (व्यावहारिक पातळीवरील भाषांतराचा खूप आहे) पण तरी हा अनुवाद त्यांनी अत्यंत सफाईदारपणे केलेला आहे यात काही शंका नाही. त्याचं कारण ते स्वत: या संस्कृतीतील आहेत, या मातीशी ओढ असलेले आहेत. या लेखनात व्यक्त झालेलं गोव्याच्या भूमीतलं जीवन (सांस्कृतिक-कौटुंबिक), इथला निसर्ग आणि त्याचं आता बदलणारं रूप हा त्यांच्याही व्यक्तिगत, दैनंदिन जीवनाचा भाग आहे. म्हणूनच ते हा अनुवाद समरसून, सफाईदारपणे करू शकलेले आहेत.

अनुवादातून आपल्याला परभाषेतील संस्कृतीची ओळख होते तसेच भाषेचे वेगळे विभ्रम कळतात. आपला नेहमीच्या परिचयातला एखादा अनुभव, एखादी गोष्ट अगदी वेगळ्याच स्वरुपात

व्यक्त झालेली आढळते तेव्हा आपण काहीसे स्तिमित होतो आणि भाषेचा तो वापर आपल्याला सुखावतोही. त्याचे प्रत्यंतर आपल्याला इथे या लेखनात येते. नेहमीच्या अनुभवाकडे पाहण्याचा एक वेगळा आयाम आपल्याला तिथे मिळतो. म्हणून अनुवादित साहित्य जितके अधिक वाचावे तितका वाचक अधिक समृद्ध होत जातो.

स्मरणरंजन हाही या पुस्तकातील लेखनाचा एक ठळक विशेष आहे. मुकेश थळी यांचे 'दिवे', 'मागीलदार', 'रंग श्रावणाचे', संजीव वेरेंकार यांचे 'सायकल', 'गावाकडे', खुबे', 'कुठे गेली ती प्रेमळ मने?', शीला कोळंबकार यांचे 'कारवार : एक अनुभव', 'लोणचे' हे लेख याची साक्ष देतात.

स्मरणरंजन हे कुठल्याही गोष्टीबद्दल असू शकतं. हरवलेल्या म्हणी-वाक्प्रचाराबद्दल असेल किंवा एखाद्या हरपलेल्या खाद्यप्रकाराविषयी असू शकेल. नव्या-जुन्याची सरमिसळ होत असताना, काळाच्या ओघात हे प्रत्येकाच्या बाबतीत होतच असते. याचे मनोरम नमुने या लेखनात आपल्याला भेटतात. गतकाळातील अन्नपूर्णा संस्कृतीविषयी 'खुबे' या लेखात संजीव वेरेंकार, या नाहीशा झालेल्या प्रकाराविषयी लिहितात; तर लोणच्यांविषयी शीला कोळंबकार. खुबे म्हणजे शिंपल्याच्या आकारातील मासे. व्यवसायातल्या आधुनिकीकरणामुळे पाहता पाहता हे नाहीसेच झाले. माणसाचा 'अधिक हवे' हा हव्यास, प्रदूषण यांच्यामुळे सावईवेरेचे खुबे आता मिळत नाहीत. त्याविषयीची वेरेंकार यांची सरणविव्हलता आपण समजून घेऊ शकतो. एखादी गोष्ट काळाच्या ओघात हरवते, नाहीशी होते, निसटून जाते तेव्हा नेमकी काय पडझड होते, आपलं एक भावविश्वच कसं विस्कटून जातं, नव्याला सामोरं जाताना कोणत्या दुखऱ्या खुणा मागे राहतात याचं हृद्य दर्शन या लेखांमधून घडतं.

तसाच शीला कोळंबकार यांचा 'लोणचे' हा लेख. त्याची सुरुवातच फार अप्रतिम आहे. त्या म्हणतात, ''लहान मुले चालायला

शिकण्याआधीच धावणे शिकतात असे म्हणतात, त्याचप्रमाणे मी स्वयंपाक करायला शिकण्याआधी लोणचे करायला शिकले''. आणि मग एक जातिवंत पाककुशल गृहिणी आपल्याला गोव्यातीलच नव्हे तर प्रांतोप्रांतीचे लोणच्यांचे प्रकार सांगते. मात्र ''हल्ली लोणचे कुणी करतच नाही. बहुतेकांना लोणचे करताच येत नाही'' ही हळवी खंत व्यक्त होतेच. लोणचे हा जेवणाचा स्वाद वाढवणारा घटक, त्यामुळे या लेखाचा शेवटही जीवनाच्या गुणवत्तेविषयी भाष्य करून होतो. संजीव वेरेकारांच्या 'कुठे गेली ती प्रेमळ मने?' या लेखात नाती लोप पावल्याची हळहळ व्यक्त होते आणि 'आपलेपणाच्या गाठी जपणाऱ्या' लग्नघरातल्या जेवणावळींची स्मृती जागवली जाते. त्यांच्याच 'गावाकडे' या लेखातही ते पूर्वसंस्कार, साधेपणा, आपलेपणा लोप पावत चालल्याची हळहळ व्यक्त करतात.

शीला कोळंबकार या कोकणी भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या लेखिका आहेत. त्यांच्या 'गुलमोहर', 'छिमकणी' या लेखांमध्ये त्या खासकरून गोव्यातल्या निसर्गसौंदर्याबद्दल बोलत नसल्या तरी त्यांची अभिजात सौंदर्यदृष्टी गोवा-कारवारनं संस्कारित केलेली आहे. छिमकणी (म्हणजे बहावा), गुलमोहर हे लेख म्हणजे या पुष्पित वृक्षांचं सर्व टप्प्यांवरचं सौंदर्य परोपरीने टिपणारे लेख. त्यांचा अनुवादही चिन्मय घैसास यांनी तितक्याच नजाकतीने केला आहे, हे विशेष. निसर्गाचे रूप, रंग, आकार, विभ्रम यांच्या जोडीलाच जमिनीवर पडलेल्या, वाळलेल्या पानांचा चुरचुर आवाज किंवा वाऱ्यावर हेलावणाऱ्या बहाव्याच्या पाकळ्यांची नाजुक किणकिण टिपण्याएवढं लेखिकेचं मन संवेदनक्षम आहे. त्यांचे हे लेख वाचताना मराठी वाचकांना दुर्गाबाई भागवतांच्या 'ऋतुचक्र'चं स्मरण खासच होईल. अनुवादातून परभाषेतील साहित्य आपल्यापर्यंत पोचवण्याचं सार्थक यातच असतं.

'मिकी' हे कोळंबकार यांचे अगदी वेगळ्या धर्तीचे स्वभावचित्र. मिकी या मांजरीविषयीची स्मरणविव्हलता यात व्यक्त

होते. ‘कारवार : एक अनुभव’ या आपल्या लेखात गोव्याच्या आणि कारवारच्या भाषेतला मजेशीर फरक त्या सांगतात. त्या ओघातच ‘म्हण’ या भाषालंकाराबद्दल बोलताना त्या सहज एक किस्सा सांगून जातात. त्यात ‘‘त्याला चांदण्यात फिरण्यासाठीही छत्री लागेल कदाचित’’ या म्हणीच्या काव्यात्म वापराने त्या वेडावून जातात आणि आपल्यालाही हा भाषालंकार सुखावतो.

माणसाचं आपल्या गावावर प्रेम असलं तर त्याला आपल्या गावाला नावं ठेवायचा अधिकारही आपोआप प्राप्त होतो, कारण तेही तो प्रेमापोटीच करत असतो. त्याचं एक उदाहरण शीला कोळंबकार यांच्या लेखात अनपेक्षितपणे भेटीला येतं. अमलताश किंवा बहावा या वृक्षाला कोकणीत ‘बाळो’ म्हणतात. इथे लेखिका मिश्किलपणे म्हणते, ‘‘एवढ्या सुंदर वृक्षाचे नाव ‘बाळो’ या वृक्षाच्या शेंगा ‘बाळो’ माशाप्रमाणे दिसतात, म्हणून त्याचेही नाव बाळो. शेवटी गोवेकराची बुद्धी ती ! माशांपर्यंतच धावणारी.’’

भाषेच्या वापराची दोन सुंदर उदाहरणे अन्य लेखात आहेत. ‘रंग श्रावणाचे’ या लेखात मुकेश थळी, त्यांची आजी करत असलेल्या, श्रावणी रविवार पूजेचं सविस्तर वर्णन करताना म्हणतात, ‘‘पूजा झाल्यावर ती प्रसाद देई. काकडीची गोलाकार फोड कॅरमच्या स्ट्रायकरप्रमाणेच दिसे’’ या उपमालंकारामुळे आपण एकदम् चमकून जातो. ज्या वयातल्या अनुभवाबद्दल ते सांगत आहेत त्या बालवयातल्या अनुभवविश्वात चपखल बसणारी ही उपमा आहे. अशीच उपमा ‘स्पष्टतेतील स्पष्टता’ या लेखात ते देतात. हा लेख मुद्देसूद, स्पष्ट, नेमके बोलण्या-वाचण्याबद्दल आहे. त्यात ते म्हणतात, ‘‘शब्दांचा उच्चार स्पष्ट असावा... पाण्यावर जणू कॅरम खेळल्यागत आपल्या तोंडून शब्द बाहेर पडले की अस्पष्टतेमुळे समोरच्याला ते कळत नाहीत...’’ घाईगडबडीने, बेफिकिरीने, निसरडे उच्चार करणे याला ‘पाण्यावर कॅरम खेळणे’ यासारखी अभिनव, नाविन्यपूर्ण कल्पना लेखकाने वापरली आहे. एक

अनोखेपण त्यात आहे. याच लेखकाचा 'दिवे' हा लेखही काळाचं एक बंद दालन उघडणारा आहे.

लोकजीवनातल्या समजुतींना जेव्हा साहित्यात स्वाभाविकपणे स्थान मिळतं, लेखकाच्या जीवनानुभवाला लगटून जेव्हा या समजुती येतात, तेव्हा त्या साहित्याला मूल्य प्राप्त होतं. प्राचीन परंपरेत चालत आलेल्या गोष्टी आधुनिक जीवनातही कसा प्रवेश करतात, आणि त्यांचा प्रवास कसा चालू राहतो याचं एक सुंदर उदाहरण थळी यांच्या लेखात आहे. 'रंग श्रावणाचे' याच लेखात ते शेवग्याबद्दलच्या लोकसमजुतीचा उल्लेख करतात. श्रावणात शेवग्याच्या शेंगांची भाजी खाता कामा नये अशी आजीची सक्त ताकीद होती. श्रावणबाळाने आपली कावड शेवग्याला बांधली होती आणि तो आईवडिलांसाठी पाणी आणायला गेला होता... काळीज पिळवटून टाकणारी ही रामायणातली कहाणी... शेवगा शापित असतो पानेदेखील लगेच सुटी होऊन एकुणएक पान वेगळे होते असेही आजी सांगत असे. आजीच्या या स्पष्टीकरणाने आपणही थरारून जातो. या प्रसंगातील कारुण्य भारतीय मनामनात कित्येक शतकांपासून झिरपत आलेले आहे. शेवग्याला कावड बांधली असेल या लोकसमजुतीतलं खरं-खोटं, तार्किक-अतार्किक बघायचं नसतं. दैनंदिन जीवनात कोणत्या गोष्टींशी कशी सांगड घातली जाते ते महत्त्वाचं. साहित्यात त्याचे उमटणारे स्वर आपला धागा परंपरेशी जोडतात आणि अनुवादामार्फत आपण त्या भाषेतील साहित्याशी आणि पर्यायाने त्या परंपरेशी पोचतो.

अशाच एका लोकसमजुतीचा उल्लेख 'मिकी'मध्ये शीला कोळंबकार करतात. बोका हवा असून मांजर आणून दिली कोणीतरी, तर नको का नाही म्हटलं, तर शुक्रवारी तीन्हीसांजेला घरात आलेलं मांजर आल्यापावली असं परत पाठवू नये म्हणून ! अर्थात्, याचं कुठलंच स्पष्टीकरण किंवा उलगडा लेखिका करत नाही पण ही

समजूत एकेकाळी सार्वत्रिक असावी. आधी मौखिक आणि नंतर लेखी परंपरेतूनच हा प्रवाह पुढे जात असतो.

आपल्या भाषेच्या कुंपणातून, किंवा अंगणातून म्हणा हवं तर, बाहेर पडून आपण जेव्हा परभाषेतलं साहित्य वाचतो तेव्हा खऱ्या अर्थाने आपल्या जाणिवेचं क्षितिज विस्तारतं.

अनुवादक चिन्मय घैसास यांनी कोकणी भाषेतले धन असेच अनुवादामार्फत मराठीत आणावे आणि कोकणी-मराठी दुवा अधिक बळकट करावा ही सदिच्छा.

डॉ. विजया देव
२०२, संपादन, प्रभात रोड, १४ वी गल्ली,
६१/९ एरंडवणे, इन्कम टॅक्स
ऑफिससमोर, पुणे. ४११००४
दूरध्वनी : ९४२३००९५२२

□

श्री. मुकेश थळी

जन्म : ५ जून १९६३
पत्ता : राजांगण, शांतीनगर,
फोंडा गोवा. ४०३४०१
संपर्क : ९४२३०५६७५५

कार्यानुभव : शालेय स्तरावर गणित विषयाचे अध्यापन
गोवा विद्यापीठाच्या विश्वकोश विभागात संशोधन सहायक
(१९८८-९३)
सध्या आकाशवाणी पणजी केंद्राच्या प्रादेशिक बातमीपत्र
विभागात वृत्तनिवेदक आणि भाषांतरकार (१९९३ पासून)

प्रकाशित साहित्य :
वळेसर (ललित) (कोकणी), १९९५
हंसध्वनी (ललित) (कोकणी), २००८
अक्षरब्रह्म (ललित) (कोकणी), २०१०
जीवनगंध (ललित) (कोकणी), २०१३
दो रे मी फा. . . सा रे नी सा (नाटक) (कोकणी), २०१७
कोकणी-इंग्रजी शब्दकोश (श्री. दामोदर घाणेकर आणि श्री. सुरेश बोरकर यांच्यासह संयुक्तपणे)
अनेक कोकणी कथांचे इंग्रजी अनुवाद
कथा, कविता, गीते आणि नाटकांचे लेखन तसेच कोकणी, इंग्रजी नियतकालिकांसाठी स्तंभलेखक, सूत्रसंचालक, मुलाखतकार

पुरस्कार :
'हंसध्वनी' पुस्तकासाठी कला अकादमी आणि गोवा कोकणी अकादमीचा राज्य पुरस्कार

पटकथा आणि संवाद लिहिलेल्या ‘हांव तसलें न्हय’ लघुपटासाठी दूरदर्शनचा राष्ट्रीय पुरस्कार

साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी लोकमत माध्यम समुहाचा ‘गोवन ऑफ द इयर’ पुरस्कार (२०१६)

रेडियो क्षेत्रातील विशेष योगदानासाठी ‘गोवा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज’चा पुरस्कार (२०१६)

‘वळेसर’ पुस्तक गोवा विद्यापीठाच्या प्रथम वर्ष बी. ए. (कोकणी) अभ्यासक्रमासाठी समाविष्ट

□

मागीलदार

मूळ लेखक : मुकेश थळी

राजांगण, शांतीनगर, फोंडा. हा माझा पत्ता. हा पत्ता वाचल्यावर अनेकजण विचारतात, ''तुझ्या घराचे नाव राजांगण?'' त्यांना वाटत असावे, माझे घर किंवा बंगला आहे आणि त्याला मध्यभागी 'राजांगण' वगैरे आहे की काय. म्हणून हे नाव असावे कदाचित.

तर सांगायचा मुद्दा हा की, राजांगण हे आमच्या कॉलनीला बिल्डरने दिलेले नाव आहे. या कॉलनीत अनेक इमारती व फ्लॅट आहेत. डुप्लेक्स बंगले, रो हावजेस, इंडेपेंडेंट हावजेस, ज्यांची नावे देखील उच्चारणे कठिण अशा वेगवेगळ्या सदनिका आहेत. तर, यातील एका फ्लॅटमध्ये माझे वास्तव्य आहे.

गॅलरीसमोर अजुन तरी काँक्रिटचे रान माजले नाही. त्यामुळे फर्मागुढीच्या डोंगरावरून स्वच्छ वारा येतो. हा वारा मला नकळत माझ्या बालपणातील, प्रियोळच्या, आजोळच्या भल्यामोठ्या घराची आणि त्या घराच्या मागीलदाराची आठवण करून देतो.

ऐसपैस पसरलेले भलेमोठे घर. घराशेजारी बाग. वास्तविक 'घराभोवती बाग' असे म्हणण्याऐवजी 'झाडांच्या सान्निध्यात घर' असे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल. घराच्या पुढल्या दारी बैठकीची जागा. या बैठकीच्या जागी बसणे म्हणजे शिष्टाचाराच्या आणि ताणतणावाच्या वातावरणात बसण्यासारखे होते.

पण, मागीलदार ? वा ! पुढल्या दारी असते त्यासारखे ताणाचे कसलेच वातावरण इथे नाही. हवे तसे मनमोकळेपणाने वावरता येते. आपला पोशाख, वेशभूषा काहीही असो. कुठेही बसा. मागीलदार म्हणजे एक निवांत विसावा. मोकळेपणा.

मी शाळेत शिकत असतानाची गोष्ट. आमच्यासाठी मागीलदार ही खेळण्याची, बाहेर पळण्याची किंवा वाटेल तेव्हा वडिलधाऱ्यांची नजर चुकवून घरात शिरण्याची जागा. डिसेंबर महिन्यात कडाक्याच्या थंडीत रात्रीच्या वेळेस सातेरी देवीच्या जत्रेला वा नाटकांना जायची भारी हौस आम्हाला असे. ''या कडाक्याच्या थंडीत बाहेर मरायला कशाला जातोयस ?'' असे म्हणून दम भरणाऱ्या माझ्या आजोबांची नजर चुकवून, मी मागीलदारावाटे बाहेर पळत असे. कुळागरातील माडाच्या झावळ्यांची चूड पेटवून, त्या लख्ख उजेडात वाटेवरील खड्डे चुकवत, नाना गंधांचा परिमळ अनुभवत आम्ही नाटकाला जात असू. घरी परतल्यावर मागीलदारातूनच प्रवेश होत असे. क्वचित जर आजोबा ओरडलेच, तर ''आम्ही मघाशीच घरी परतलो होतो'' हे नेहमीचे पालुपद आम्ही लावून धरत असू.

कामगार, घरातील गडी माणसे वा अन्य शेजारीदेखील मागीलदारातूनच प्रवेश करीत. पुढल्या दारी एकुणच औपचारिक वातावरण. मागीलदारी सगळेच अनौपचारिक. सोसाट्याचा वारा वा मुसळधार पाऊस पडू लागताच लहानमोठी जनावरे मागीलदारी आडोशाला येत असत. त्यात आजीचे लाडके वासरू देखील असे. त्या वासराच्या तोंडाला औषधाची बाटली लावून त्याची होणारी सेवा देखील मागीलदारीच चाले. बाहेरच्या गोठ्यात, गाईचे दूध पिऊन टाकेल म्हणून, वासराला देखील मागीलदारीच दावणीला बांधले जाई. मागीलदार हे सार्वजनिक नव्हे, सर्वजीवी होते.

मागीलदार हा शब्द फक्त दारापुरताच मर्यादित नव्हता. ते होते एक अवकाश. एक मोकळी जागा. त्याची व्याख्याच करणे मुळात अशक्य. एप्रिल आणि मे महिन्यात तर मागीलदार बहरून निघे. ते दिवस म्हणजे मागीलदाराच्या चैतन्याचा कळस.

फणस, धोणस (फणसाच्या गऱ्यांपासून केलेला एक पदार्थ) करण्यासाठी काढलेले रसाळ गरे, कैऱ्या, मासे, सोलकढीसाठीचे

कोकम, त्या कोकमातील बिया, एका फुटलेल्या भांड्यात ठेवलेला कोकमाचा आगळ, इतर भांडी व अन्य कितीतरी गोष्टी. वेगवेगळे रंग, गंध, आणि नाद यांनी हे मागीलदार भरून जात असे. डोळे मिटून त्या सर्वांचा संमिश्र परिणाम अनुभवावा एवढा गोड.

मागीलदारातील एका कोपऱ्यात, आजच्या घडीला ज्याला एक लघुउद्योग म्हणता येईल अशी, एक गोष्ट होती ती म्हणजे कोंबड्यांचे खुराडे. जाळीदार. लाकडी सिलिंडरप्रमाणे दिसणारी एक उभी वस्तू होती. त्यात लाकडाचा कीस असे. अंडी देण्यासाठी कोंबड्या त्यात बसत. मी वरचेवर तेथे जाऊन, कोंबड्यांनी अंडी दिलीत का ते कुतुहलाने पाहत असे. त्या ऊबदार अंड्यांना हात लावून, ''आजी, कोंबड्यांनी अंडी घातलीयत'' असे मी जोरात ओरडत असे. कोंबड्यांना अधुनमधून किडींचा प्रादुर्भाव होई. अशावेळी कोंबड्यांची काळजी घेताना आजीची धावपळ होई. अगदी धाप लागेपर्यंत. ''कोंबडी अंडी उबवायला बसलीय'' असे आजी अधुनमधून म्हणत असे. ''उबवायला म्हणजे काय?'' असे अत्यंत निरागसपणे मी आजीला विचारत असे. ''तुला नसत्या गोष्टी कशाला रे?'' असे म्हणून आजी मला बाहेर पिटाळत असे. परंतु, मागीलदाराइतके स्वातंत्र्य, मजा आणि आनंद आम्हा मुलांना पुढल्या दारात कधीच मिळाला नाही.

कोंबड्या अंडी कशाप्रकारे उबवतात आणि छोटीशी, नाजुक पिल्ले त्या टणक आवरणातून कशी बाहेर पडतात ते, या मागीलदारी आम्ही पाहिले, अनुभवले. कापसावर पिवळ्या रेघोट्या मारल्यागत त्या पिलांची पाठ दिसे. कोंबडे आणि कोंबड्या. एक काळाकुट्ट कोंबडा होता. एखाद्या राजासारखा. कलिंगडाची नाजुक शीर असल्याप्रमाणे, त्याच्या डोक्यावरचा तुरा दिसत होता. कोंबड्याच्या बांगेची घड्याळ मागीलदारात गाजत राही.

ऋतूंप्रमाणे हे मागीलदार फुलत राही. वेगवेगळ्या रंगांनी आणि वासांनी भरून जाई. गणेश चतुर्थीच्या काळात 'शीतू'

मिठाईवाला येई. चार दिवस घरी राहून शेवयांचे, बुंदीचे लाडू, शेव आणि इतर मिठाई तो तयार करत असे. मोठमोठी भांडी. वेगवेगळे वास. संपूर्ण मागीलदार आणि आसपासचा परिसर दरवळून जाई. जीव सुखावून जाई.

मागीलदारी हातपाय धुण्यासाठी एक खास नळ असे. तिथेच आजी मासे धुवून, चिरत असे. आयुष्याच्या कठिण वादळात देखील आजी कधी रडली नाही. परंतु, एके दिवशी एक जाडजूड खेकडा चिरत असता, आजीच्या अंगठ्याचा जोरदार चावा त्याने घेतला. आजी कळवळून रडली. खेकडा काही केल्या अंगठा सोडीना. एखादा खेकडा किंवा मोरीजवळील 'तो' नळ पाहताच, आजही, मला आजीची आठवण येते.

मागीलदारी विहीर खणण्याचा कार्यक्रम एप्रिल–मे महिन्याच्या दरम्यान पार पडला. सावईवेऱ्याहून आलेले कामगार आणि स्थानिक मजूर स्त्रियांनी मिळून पूर्ण केलेला तो सोपस्कार. विहीर खणण्याचा कार्यक्रम कित्येक दिवस चालू होता. मातीच्या राशीच राशी. मग, एके दिवशी विहिरीला पाणी लागले. अत्यंत आनंदाचा असा तो क्षण होता. त्यानंतर आजीने साग्रसंगीत देवपूजा केली. आजही, ती विहीर पाहताच त्या सगळ्या आठवणी मनात उचंबळून येतात. या विहिरीने, मागीलदाराला वेगळीच उंची आणि शोभा प्राप्त करून दिली.

फणसाच्या बिया, रताळी भाजून खाल्ल्याची आठवण. बिबे (कच्चे काजूगर) चिरून खाल्ल्याची आठवण. पाणी गरम करण्याच्या हंड्याशेजारी, हिवाळ्याच्या थंडीत उकिडवे बसून अनुभवलेली शेकोटी. छिद्रे असलेल्या पत्र्याच्या भांड्यात, पावसाच्या दिवसात, भाजलेला काजूगर. खांबाला टेकून ठेवलेली, काजूच्या निऱ्याची बाटली. सीताफळें, काजू बोंडें, अननस, जाम, बिंबल, करमल... कितीतरी चित्रे, कित्येक प्रतिमा... कोणत्या तरी एका कोनाड्यात असलेली जळणासाठीच्या लाकडांची रास... संपता संपत नाहीत

अशी आठवणींची जळमटें मागीलदारात साचून राहिलीत. परंतु, विशाल आवाक्याच्या या मागीलदाराची, कल्पक आणि सृजक मनाची नेपथ्यकार म्हणजे माझी आजी. तीच या विश्वाची शिल्पकार.

मागीलदाराच्या संस्कृतीत वाढलेला, त्याच घरातला माझा मामा. वयाच्या सतराव्या वर्षी त्याची मोठी बहिण, नोकरीसाठी त्याला मुंबईला घेऊन गेली. माहिमला फ्लॅटमध्ये पोहोचताच तो आत-बाहेर घुटमळू लागला. बहिणीने त्याला विचारले, ''काय शोधतोयस रे ?''

''मागीलदार...'' तो म्हणाला. ''घराचा आत्मा मागीलदारातच नांदतो'' या समजुतीसह लहानाचा मोठा असल्याने कदाचित तो मागीलदार शोधत असावा.

राजांगणातील फ्लॅटच्या गच्चीत बसून मागीलदाराच्या या आठवणी काढत असता काळीज द्रवू लागते. मागीलदाराजवळ वेगळ्याच प्रकारचा ओलावा होता. आपल्या मुळांशी नाते अधिकच घट्ट करणारा, जिवंतपणा टिकवून ठेवणारा.

मागीलदाराच्या जणू अंगाखांद्यावर लोळून, खेळून आम्ही लहानाचे मोठे झालो. मागीलदारी लपंडाव आणि अन्य खेळ आम्ही खेळलो. शरीरात भिनणारा, शरीर भेदून जाणारा रातराणीचा परिमळ तसेच अन्य फुलझाडांचा सुगंध आम्ही याच मागीलदारी चाखला. मागीलदाराच्या आठवणी आमच्या काळजात आजही रुंजी घालतात. आम्ही घातलेल्या बेभान दंगामस्तीच्या खुणा, मागीलदाराच्या चौकातील खरखरीत फरशीच्या कणाकणात एकजीव झालेल्या आहेत.

इमारत, इमारती हे शब्द आणि या संकल्पना काळाने आमच्यावर लादल्या आहेत. मागीलदार आणि भव्य स्वयंपाकघर अशा गोष्टी चिमुटभर किचनच्या वाऱ्याने कस्पटासमान उडून गेल्यात. भारतीय भाषांतील संदर्भाचे इंग्रजी भाषांतर करताना, भाषांतरकार पत्रावळीसाठी लीफप्लेट व मागीलदारासाठी बॅकयार्ड अशा अपूर्ण

शब्दांचा वापर करतात. अनंत बळ असलेल्या देशी भाषेतल्या 'मागीलदार' या शब्दात एक वेगळीच जादू आहे. या शब्दात सांस्कृतिक वलय आणि भावनिक आविष्कार आहे.

म्हणूनच म्हणावेसे वाटते,

''मागीलदार हा फक्त शब्द नाही, शब्दकोशातला...
मागीलदार ही तर भाषा ! माझ्या संस्कृती-संचिताची !''

□

दिवे

मूळ लेखक : मुकेश थळी

आमच्या बालपणी वीज नव्हती. माझे बालपण आजोळी, प्रियोळ गावचे. तिथे वीज बऱ्याच उशिरा म्हणजे १९७७ साली आली. वीजेविना ते बालपण कसे सरले त्याची आठवण काढताच, तो अंधुक प्रकाश आजही डोळ्यांसमोर तरळतो.

तीन्हीसांजेला काळोख होऊ लागताच पत्र्याचे दिवे पेटत असत. एखाद्या छोट्याश्या डबीसारखा त्यांचा तळ असे. पातळ कपड्याच्या काठाच्या वा सुतळीच्या वाती त्यात असत. दिव्यात केरोसिन. त्याकाळी केरोसिनालाही पेट्रोलच म्हणत. काहीजण घासलेट असाही शब्द वापरत. डब्यांमधून, बाटलीतून किंवा त्यानंतर आलेल्या प्लास्टीकच्या कॅनमधून ते पेट्रोल बाजारातून आणत. त्या पेट्रोलला एक प्रकारचा छान वास येई. ते पेट्रोल आणि त्याचा तो वास आता केवळ आठवणींतच शिल्लक राहिला आहे.

असे हे पत्र्याचे दिवे स्वयंपाकघरात एका खिडकीशेजारी, भिंतीतल्या एका कप्प्यात ठेवले जात. या कप्प्यांना कोकणीत कत्रेल (उच्चार कत्रॅल) म्हणतात. कत्रेल म्हणजे आताच्या परिभाषेत फडताळ (भिंतीतले शॅल्फ).

मेजावर सायंकाळी चिमण्या (एक प्रकारचे दिवे) पेटत. काचेच्या चिमण्या. त्यांचा तळसुद्धा काचेचाच, पारदर्शी. त्यात केरोसिन घालत. त्यावर निमुळत्या आकाराच्या टोपी सारखे काचेचे आवरण. पपईच्या गोलागत आकार असलेले. वातीला वारा लागू नये आणि उजेड पडावा म्हणून. त्या काचेच्या तोपऱ्याला (आवरणाला) ट्यूब असेही म्हणत. मेजावर अभ्यास करताना ह्या चिमण्यांचा खूप उपयोग होई. पत्र्याच्या दिव्यांपेक्षा ह्या चिमण्यांचा

उजेड मंद आणि शांत. जणू अगदी सभ्य. ह्या चिमणीतील रुंद आणि दाट कपड्याची पट्टीसारखी वात वर-खाली सरकवण्यासाठी एक कळ (बटन) असे.

पत्र्यांच्या दिव्यांप्रमाणेच काचेच्या बाटल्यांतही साध्या प्रकारचे दिवे असत. अगदी सामान्य. मुळात त्या असत औषधाच्या, लहानश्या बाटल्या. त्यांचा फेरवापर म्हणजेच आजच्या काळाप्रमाणे त्यांना रिसायकल करून त्यांचे रूपांतर दिव्यांत केले जाई. घरातच बाटल्यांपासून दिवे बनवले जात. बाटलीच्या टोपणाला छिद्र पाडून त्यात वात घातली जाई. बाटल्यांचे दिवे बनवण्यासाठीचे सुटे सामान बाजारात विकत मिळे. त्याखेरीज, पत्र्यांच्या दिव्यांप्रमाणे बाटलीचे तयार दिवेदेखील बाजारात विकत मिळत. आठवड्याच्या बाजारात हे सर्व सामान मिळे. दुकानांत तर मिळेच. ह्या बाटल्यांच्या दिव्यांना बाहेरून धातूचे घट्ट आवरण असे. बहुधा ॲल्युमिनियमचे. त्या बाह्य आवरणातच बाटली पकडण्यासाठी, उचलण्यासाठी एक मूठ असे.

'लापयांव' हा दिव्यांचा एक वेगळा प्रकार. त्याचे बूड पत्र्याचे असे. कॅरोसिनची टाकीच जणू. त्यात कॅरोसिन भरण्यासाठी एक खास, पत्र्याचे नसराळे मिळे. वात सुरक्षित ठेवण्यासाठी वरती एक काच. काचेभोवती तसेच वरच्या बाजूस एक झाकण. काच काढण्यासाठी आणि पुसण्यासाठी एक हॅण्डल असे. जत्रेस जाताना, रात्रीच्या वेळेस देवळात जात असता, प्रवास करताना किंवा रात्री शौचास जाताना हे लापयांव वापरले जात. लापयांव धरण्यासाठी वरच्या बाजूस बाकदार कडी असे. दुधाच्या लहानशा कॅन वा किटलीला असते त्यासारखी. असे हे लापयांव सुंदर दिसत. या लापयांव दिव्याला त्या काळात स्वत:ची अशी एक ऐट, स्वत:चे असे वेगळेच स्थान होते.

मात्र या सगळ्या दिव्यांचा राजा म्हणजे पेत्रोलमास (उच्चार पॅट्रोमॅक्स). बोलताना मात्र पेट्रोलमास असाच शब्द वापरला जाई. अगदी शुभ्रधवल असा त्याचा उजेड असे. आजच्या ट्यूबलाईट

सारखा. मुळाशी जड टाकी, कॅरोसिन साठवण्यासाठी. मधल्या काचेच्या भागात स्पिरिट घालण्यासाठी एक वाटी असे. एका छोट्याश्या छिद्रातून स्पिरिट घालून ते पेटवत. स्पिरिट अर्धवट जळत असता ऊब येताच पेत्रोलमासाला पंप मारत. त्याला 'पीन मारणे' असेही म्हणत. असे करताच ट्यूबमधून पेट्रोल वर येत असे. मध्यभागी असलेल्या धातूच्या बोंडातून वायूरूपाने धग निर्माण होई. याच धगामुळे पेत्रोलमासाची वात पेटण्यास मदत होई. अधूनमधून पेत्रोलमासाला पंप मारत असता त्याच्या शेंड्याकडच्या भागातून आगीचा जणू एक भडका उठे. आम्ही मुले त्यावेळी दचकून जात असू. बोंडाजवळ अधुनमधून कचरा जमा होई. तो स्वच्छ करण्यासाठी खास पिना, बाजारात विकत मिळत. उजेड मंद वा कमी होताच पेत्रोलमासाला पंप मारावा लागे. त्याची वात खूप नाजूक असे. पेत्रोलमास धरताना वा घेऊन जात असता जरा जरी हलला, तरी वात गळून पडत असे. म्हणूनच अगदी अलगद, नाजूकपणे ते सर्व प्रकरण हाताळावे लागे. वात म्हणजे छिद्रे असलेली कपड्याची पांढरी जाळीच. त्यांचा आकार छोट्याशा पिशवीसारखा असे. 'कॉक छाप' वाती त्या काळात खूप प्रसिद्ध. उत्तम दर्जाच्या असल्यामुळे लोकप्रिय देखील. त्या वातींवर कोंबड्याची प्रतिमा छापलेली असे.

बालपणी गणेश चतुर्थीच्या आधी करंज्या करायला सुरुवात झाली की पेत्रोलमास पेटवायला सुरुवात होत असे. मुंबईसारख्या शहरातून सगेसोयरे, नातेवाईक आल्यास घरात पेत्रोलमास पेटत असे. वास्तविक पेत्रोलमासाच्या पांढऱ्याशुभ्र उजेडात संपूर्ण घर उजळून निघालेले पाहताना मनाला कायम आनंद होई. मात्र त्यासाठी बरीच वाट बघावी लागे. पेत्रोलमासाचे वरचे आवरण काचेच्या पट्ट्यांपासून केलेले असे. कधीमधी त्या पट्ट्या सुटून पडतही. बोरोसीलची आवरणे मात्र चांगल्या दर्जाची असत. अखंड काचेच्या गोलाकार घेराची ती असत.

माईचे (माझ्या आईचे) एक काका – आपा. पेत्रोलमासाच्या

सुट्या भागांचा व्यापार ते करीत असत. माईचे दुसरे एक काका सावंतवाडीला राहत असत. पेत्रोलमासाच्या सुट्या भागांचे ते खूप मोठे एजंट होते. माझ्यावर झालेले पेत्रोलमासाचे घनिष्ठ संस्कार हे याच सर्वाचे फलित.

त्या काळी, पेत्रोलमासाच्या उजेडात नाटके सादर होत असत. पेत्रोलमासाचा उजेड थोडासा मंदावताच त्याला पंप मारावा लागे. पेत्रोलमासाचा लख्ख उजेड फाकताच नाटक पुन्हा गती घेई. जत्रेतल्या मिठाईच्या दुकानांतही पेत्रोलमासच असे.

माईच्या आईकडे, म्हणजे माझ्या आजीकडे, खलबत्त्यासारखा जड तांब्याचा दिवा होता. एखाद्या गडूसारखा दिसणारा. बहुधा तिच्या लग्नाचा वेळी तिच्या आईने तिला तो दिलेला असावा. तो दिवा ती कधीच, कोणालाच देत नसे.

त्या काळातील ते पत्र्याचे दिवे म्हणजे एक वेगळीच गंमत होती. सुट्टीत मुंबईहून माझा मावसभाऊ येई. ''किती छान रे तुमचे हे बल्ब, हातात घेऊन फिरता येते की'' असे म्हणत हातात घेऊन तो घरभर धावत सुटे. आज तो अमेरिकेत स्थायिक झाला आहे. भूतकाळातील या आठवणी त्याच्याजवळ काढताच त्याला हसू येते.

अचानक एके दिवशी विजेरीने (बॅटरीचा दिवा) आमच्या आयुष्यात प्रवेश केला. अगदी मोजक्या लोकांकडे ती असे. इतरांसाठी जणू ते नवलच. माझे आजोबा रात्रीच्या वेळेस घराबाहेर जाताना विजेरी घेऊन जाऊ लागले.

वास्तविक, उजेडाची आवश्यकता किती ? गरजे इतकीच. जास्त झाल्यास डोळे चमकू लागतात, कमी असेल तर अंधारात चाचपडायला होते.

त्यावेळचे ते दिवे, त्यांची जपणुक, त्यांत वाती घालणे हे सगळे खूप वेळखाऊ काम होते. मेणबत्तीपासून ते पेत्रोलमासापर्यंतचे हे तीऱ्हातऱ्हांचे दिवे काळाचा ओघात जणू गडप झाले, हरवले. स्मरणरंजनाच्या विजेरीने त्यांचा शोध घेण्याचा लहानसा प्रयत्न केला. छान वाटले. . .

□

रंग श्रावणाचे

मूळ लेखक : मुकेश थळी

वेळेला ना सुरुवात, ना शेवट. वेळ ही अनादि अनंत असते. ऋतूंच्याही बाबतीत तेच. ऋतूंचेही चक्र असेच फिरत असते. प्रत्येक ऋतूत दोन महिने समाविष्ट असतात. वसंतामध्ये येतात चैत्र आणि वैशाख. ज्येष्ठ आणि आषाढ यांचा ग्रीष्म ऋतू. आषाढात पाऊस संपूर्ण धरेला झोडपून काढतो. ये-जा करताना माणसांची मोठी दमछाक होते. मग सुरू होतो वर्षा ऋतू. श्रावणाचे आगमन. निसर्गात श्रेष्ठता, हिरवेगारपणा आणि संपन्नता घेऊन येणारा श्रावण.

श्रावणातला पाऊस म्हणजे अगदी लाडाचा, कौतुकाचा. संहार वा विध्वंस करण्याची कसलीच खुमखुमी वा दुष्टपणा त्याच्या स्वभावाला जणू ठाऊकच नाही. श्रावणातला पाऊस बेपर्वा आणि हिंसक अजिबात नव्हे. तो म्हणजे जणू संगीतातल्या मध्यलयीसारखा. प्रमाण, जोर, गती सगळेच कसे मध्यम स्तरावरचे. हा पाऊस येतो तसा निघून जातो. आहे म्हणता म्हणता क्षणात नाहीसा होतो.

श्रावणातला पाऊस मुसळधार नव्हे. तो मुळीच त्रास, दगदग करीत नाही. धो-धो पावसाची दडक नसते. जणू पिरपिर केल्यागत हा पाऊस झडत राहतो. हा पाऊस रिमझिम. बारीक. श्रावणातला पाऊस जरासा मिश्किल स्वभावाचाही. जरासा खट्याळ, खोडकर. मोठ्ठी वा जाड थेंबांची दाट दडक येऊन, चिमटे काढून, गुदगुल्या करून नाहीशी होते, अंग भिजवते आणि त्याचबरोबर मन देखील ओले आणि हिरवेगार करून सोडते. ठिकठिकाणी माती ओली करून सोडते. झाडांनाही भिजवून सोडते. अगदी अंगोपांग.

पावसाची रूपे नानाविध. श्रावणातल्या पावसाचीही रूपे अनेक. थेंब बरसावे तसा पाऊस श्रावणात कधीही शिंपडतो. जणू

थेंबांचा अभिषेक. रिमझिम. हिंदीत त्याला 'बूँदाबाँदी' असे म्हणतात. हा असा पाऊस अधुनमधून ये-जा करत असता अचानक सोने वितळून पातळल्यागत चकचकीत ऊन पसरते. मधुनच आभाळात इंद्रधनुष्य उगवते. झाडा-झुडपांना भिजवून पाऊस जातो खरा. पण त्यानंतरची काही मिनिटे त्या झाडा-झुडपांतून निथळणाऱ्या ओथांब्यांचे (मोठ्या आकाराचे थेंब) लयबद्ध संगीत मनाला आनंद देत राहते. हा देखावाच मोहक आणि ओढ लावणारा असतो. 'श्रावणात घन निळा' या गीतात कवी मंगेश पाडगावकर लिहितात,

''पाचूच्या हिरव्या माहेरी ऊन हळदीचे आले...''

''हळदीने माखल्यागत दिसणारे ऊन'' अशी ही गोड प्रतिमा. माझ्या एका मित्राचा हा अनुभव. त्याच्या बालपणी कर्नाटकातील जमखंडी गावी, श्रावणातला रिमझिम पाऊस येताच धुळीने माखलेला रस्ता जणू आमटीने सारवल्यागत दिसायचा म्हणे. पावसाला जोरच नसल्यामुळे हे पाणी वाहुनही जात नसते. तिथेच ते साचून राहते. एक वेगळ्याच तऱ्हेचा, वेगळ्याच रंगाचा चिखल तयार होतो. माझ्या मित्राने त्याला आमटीची उपमा दिली आणि माझ्या डोळ्यासमोर 'हुमण' म्हणजे माशांच्या आमटीने भरलेला रस्ता अशी एक उठावदार प्रतिमा उभी राहिली.

श्रावण म्हणजे दगदग किंवा त्रास न करणारा पाऊस इतकंच नव्हे. श्रावण म्हणजे सण, उत्सव, व्रतवैकल्यें, पूजा-विधी, आरत्या, पेटलेल्या वाती ह्या सगळ्यांची एक पवित्र रेलचेल. देवळांच्या प्रांगणातील सांस्कृतिक आणि सांगितिक कार्यक्रमांची धुमधाम आणि त्याचबरोबर त्या निमित्ताने केलेले गोड खाद्यपदार्थ, त्यांचा सुगंध आणि सुवास.

श्रावण म्हणजे सगळाच समतोल. ऊन तर आहे पण रखरख नाही. आणि असले तरी काही हरकत नाही. कारण ऊनच अचानक पाऊस घेऊन येते आणि क्षणार्धात सगळे काही ओलेचिंब करून सोडते. वारा वाहतो पण वादळी किंवा रुद्रावतार धारण करणारा नव्हे.

'श्रावणात घन निळा बरसला' या आपल्या कवितेत "गतजन्मीची ओळख सांगत आला गंधित वारा" असे कवीवर्य मंगेश पाडगावकर म्हणतात. त्यातच ते पुढे म्हणतात, "मातीच्या गंधाने भरला गगनाचा गाभारा." असे कितीतरी गंध घेऊन हा श्रावण सृष्टीत आणि आमच्या आयुष्यात आनंद भरत राहतो. श्रावणातला पाऊस मात्र हवाहवासा वाटावा असा. लपंडाव मांडल्याप्रमाणे येतो आणि अचानक गायब होतो.

बालपणी अनुभवलेल्या श्रावणाच्या आठवणी आजही तशाच ताज्या टवटवीत आहेत. लहानपणी प्रियोळला, आजोळी, श्रावण परिपूर्णपणे आणि वेगवेगळ्या पैलूंसह अनुभवला. कारण श्रावण अनुभवावा तर तो अंत्रूज महालातच. फोंडा तालुक्यात. रसिकतेच्या वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून तो अनुभवावा. अगदी आनंदाने. श्रावणात निसर्ग जणू एका वेगळ्याच जोमाने आणि उमेदीने सृजनोत्सव साजरा करत असतो. ह्या ऋतूत वेगवेगळ्या रंगांची आणि वासांची फुले फुलतात. जाई, जुई, सोनचाफा, पारिजातक आणि इतर अनेक. नागेशी आणि मंगेशीला देवळात श्रावणी सोमवारी होणारे विधी. देवळाच्या पायऱ्यांवर फुले विकणाऱ्या स्त्रिया. पखवाजाचे नाद आणि अभंगांचे सूर. एकुणच सगळ्या आसमंतात सहजपणे, बेमालूमपणे दरवळणारा उदबत्तीचा सुवास. धुपाचा वास. उभ्या प्राकारात पुजेचे पवित्र वातावरण. स्वत:तील जळमटे आणि अस्वच्छता आपोआप नष्ट करून टाकणारा असा तो माहोल. जीवनाचा अर्थ सांगणाऱ्या ध्येयाकडे लक्ष वेधून घेणारे, संतकवींच्या अभंग गायनाचे आणि भजनांचे आध्यात्मिक वातावरण. अंतर्मुख होऊन डोलायला लावणाऱ्या टाळांचा लयदार गजर आणि भजनी ठेका. वाह ! वाती, कापूर, फुले, आणि भक्तिभावाने तसेच शरणागत वृत्तीने अर्पण केलेले ते अर्घ्यच जणू. जीवनाला अर्थपूर्ण बनवणारे. जीवनाच्या नावेला दिशा दाखवणारे. शुद्धपणा, सात्त्विकता, सोवळेपणा आणि पावित्र्य यांनी चिंब भिजलेले श्रावणातील सण

जीवनातील प्रत्येक क्षण, प्रत्येक कण रसपूर्ण आणि अर्थपूर्ण आनंदाने भरून टाकतात. लोकांना एकत्र आणून सामाजिक बांधिलकी साध्य करतात. श्रावणात असले उल्हासपूर्ण वातावरण नेहमीच भरलेले आणि भारलेले असते.

माईची आई म्हणजे माझी आजी श्रावणी रविवाराचे पूजन करायची. रविवार म्हणजे सूर्याचा वार. रविवार पुजणे म्हणजे सगळ्यांची राखण करणाऱ्या, माणसे-जीव-वनस्पतींना उर्जा देणाऱ्या सूर्याची पूजा. आजीची पूजा अगदी साग्रसंगीत असे. श्रावणातल्या सृष्टीतील कित्येक झाडांची आणि वेलींची पाने ह्या पूजेसाठी ती स्वत: गोळा करीत असे. शरवड्याची (विड्याच्या पानांसारखी दिसणारी, पांढरी) पाने असत. ती शोधण्यासाठी फार आटापिटा करावा लागत नसे. सभोवतालच्या हिरव्यागार झुडपांत ती भरलेली असत. दुर्वा असायच्या. बारा-बारा दुर्वांची जुडी असे. सुर्याची नावे बारा म्हणून. पाटावरील केळीच्या हिरव्यागार पानावर ही पूजा सजत असे. बारा फुले असायची. बारा तांदूळ असत. तांदळाचे ते अखखे, सणसणीत दाणे आजी स्वत: वेचून काढायची. त्यात तांदळाचा तुकडा वा कणी आढळलेल्या तिला चालत नसत. हळदीचे कूट आणि लहानशी सुपारी असे. रविवारी सकाळी ही पूजा असे. भल्या पहाटे तिची लगबग सुरू होई. दुपारी नैवेद्य होई. आरत्या व्हायच्या. सायंकाळी घरासमोरील तुळशी वृंदावनात, आजी रविवाराचे विसर्जन करी. त्यावेळी माझ्याकडे एक काम असे. काम म्हणण्याऐवजी सेवा म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल. ही सेवा म्हणजे हातातील, पूजेची, घंटा वाजवणे. पाटावर पुजलेल्या रविवाराची सामुग्री ठेवून आजी बाहेर पडत असे. तिच्यापाठोपाठ घंटानाद करत मी. पुजा झाल्यावर आजी प्रसाद देई. काकडीची गोलाकार फोड 'कॅरम'च्या 'स्ट्रायकर'सारखी दिसे. दर रविवारी आजी वेगवेगळे, गोडाचे पदार्थ करी. पहिल्या रविवारी मुठवे (नारळाच्या खोबऱ्यापासून तयार केलेला गोड पदार्थ). दुसऱ्या रविवारी पातोळ्या असत. हळदीच्या पानात

गुंडाळलेल्या पातोळ्या. हळदीच्या पानाचा वास पातोळीला अर्थ प्राप्त करून देत असे आणि पातोळी खाताना जीव सुखावून जात असे. असे हे श्रावणातले वेगवेगळे गंध. तिसऱ्या रविवारी खिचडीचा बेत असे. त्याला गुळाचा भात असेही म्हणतात. तांदूळ आणि मूगडाळ घालून केलेली ही खिचडी खूपच रुचकर लागत असे. चौथ्या रविवारी पोळ्यांचा बेत असे. एकुणच काय तर, संपूर्ण श्रावणाला संस्कृतीचे विविध रंग आणि आयाम असत.

आजी आषाढापासूनच जंगली भाज्या करायला सुरुवात करीत असे. पुढे संपूर्ण श्रावण महिनाभर या भाज्या आम्हाला खायला मिळत. शिरमंडोळ्याची भाजी, कुड्डुकीची भाजी, तायखिळ्याची भाजी आणि इतर बऱ्याच. सगळीच नावे आज आठवत नाहीत. . .

पण, श्रावणात शेवग्याच्या शेंगांची भाजी खाता कामा नये अशी आजीची सक्त ताकीद होती. श्रावणबाळाने आपली कावड शेवग्याला (म्हशिंग) बांधली होती आणि तो आपल्या आई-वडिलांसाठी पाणी आणायला गेला होता म्हणे. काळीज पिळवटून टाकणारी, रामायणातील ही कहाणी सगळ्यांनाच परिचयाची आहे. तात्पर्य, शेवगा हा शापित असतो असे मानतात. म्हशिंगाची पाने आणून ठेवल्यास ती पानेसुद्धा लगेचच सुटी होऊन एकुण एक पान वेगळे होते असेही आजी सांगत असे.

श्रावणात रानटी फळे खूप पिकतात. काकड्या, घोसाळी (दोडगी), पडवळ, कोकणदुधी इत्यादि. अधुनमधून त्यांचा बहर येतो. 'फागलां' नावाची रानटी फळे मिळतात. बालपणी, फागलांच्या फोडी तळून खायचो त्याची आठवण आणि रूच आजही जिभेवर तशीच रेंगाळतेय. आजीच्या त्या परंपरेची स्मृती म्हणून आजही आम्ही बाजारातून महागडी 'फागलां' विकत आणतो आणि त्याच्या फोडी तशाच तळून खातो.

श्रावणात सण-उत्सव, व्रतांची जणू गर्दीच असते. नागपंचमी येते. नारळी पौर्णिमा (सुताची पौर्णिमा असेही तिला म्हणतात) येते.

वेगवेगळ्या भागांत ती साजरी करण्याच्या पद्धतीसुद्धा वेगवेगळ्या. मासे पकडणारे कोळी बांधव, नारळी पौर्णिमेदिवशी, समुद्राला नारळ वाहून पूजा करतात. मासेमारी सुखरूप पार पडो तसेच खोल दर्यात-समुद्रात आपली राखण होवो ही प्रार्थना केली जाते. मग येते ती गोकुळाष्टमी. अंत्रुज महालात अनेक मंदिरे असल्यामुळे ह्या उत्सवांच्या काळात उमेदीला जणू पूर येतो.

माझे आजोबा श्रावणी सोमवारी नागेशीला जात असत. फर्मागुडीहून आम्ही उतरण चालून जात असू. लांब नळीची एखादी बंदूक खांद्यावर टाकून चालावे त्याप्रमाणे आपली लांब दांड्याची छत्री घेऊन आजोबा चालत. वाटेत दोन्ही बाजूला दाट, हिरवीगार झाडे, झुडुपे, वेली मनाला हिरवे, प्रसन्न आणि टवटवीत करून सोडत. मधुनच पाऊस पडे. रात्रीचा मुक्काम उमाकांत भटजींकडे व्हायचा. देवदर्शन झाल्यावर मी हळूच देवळाबाहेरील हॉटेलात पावभाजी खाण्यासाठी पळत असे. मग देवळासमोरील तळ्याजवळ येऊन, काठोकाठ भरलेल्या तळ्यामध्ये सूर मारून पोहणाऱ्या मुलांना पाहत राही. नागेशीला देवळात क्वचित एखाद्या रात्री संगीत-वादनाचा कार्यक्रम होई. श्रीपाद नागेशकर, विभव नागेशकर की पंढरीनाथ नागेशकर, नीटसे आठवत नाही... पण एकदा जबरदस्त आणि प्रभावी तबला जुगलबंदी ऐकल्याचे आठवते. पावसाच्या सरी बरसत होत्या... नव्हे, कोसळत होत्या. विविध पेशकार, रेले, कायदे, आणि लयीत वेगवेगळ्या समीकरणांनी भरलेली मात्रांची क्रमांतरणे, फटाक्यांच्या आवाजासारखी तणतणत, संगीतवेड्या काळजावर जादू करत असत. लयीच्या त्या आविष्काराची आठवण झाली की आजही अंगावर शहारा येतो. मुंबईत स्थायिक झालेले नागेशकर हे किती थोर तबलापटू होते त्याची जाणीव नंतरच्या जाणत्या वयात झाली. देवळात सेवाभावनेने ते तबला वाजवत. त्या सादरीकरणात एक वेगळाच भाव असे.

शुक्रवारी महालक्ष्मीच्या देवळात श्रावणी सोमवार फुलत

असे. गुरुवारी दत्ताच्या देवळात कार्यक्रम होई. मंगळवारी काहींकडे मंगळागौर असे. केळीच्या वाळलेल्या पानांचे द्रोण, त्या द्रोणातली पंचखाद्य, त्यात शिरा, केळीच्या फोडी आणि अन्य जिन्नस... श्रावणी उत्सवांचे हे अनुभव-घटक. अशा वेगवेगळ्या सण-उत्सवांनी हा श्रावण गजबजून जातो. ''आपण विसरतो म्हणून हे सण पुन्हा-पुन्हा येऊन आपल्याला ईश्वराची आठवण करून देत असतात'' असे कोणा एका संताने म्हटले आहे. जाता-जाता, प्रस्थान करताना हा श्रावण, मग भाद्रपदातल्या गणेश चतुर्थीची चाहूल देऊन जातो.

श्रावण पौर्णिमेला वा त्याच्या आसपास श्रवण नक्षत्र असते. त्यावरून या महिन्याला श्रावण असे नाव पडले आहे असे म्हणतात. श्रावण हा चतुर्मास (चातुर्मास नव्हे) काळातील श्रेष्ठ महिना असे मानतात. श्रावण म्हणजे एक अनुभव. श्रावण हा एक संमिश्र मिलाफ. रंगांचा. फुलांचे, पानांचे, आभाळातल्या ढगांचे वेगवेगळे रंग. श्रावण म्हणजे श्रवणीय नादांचा आनंद देणारा महिना. पखवाज, तबला, टाळ, संवादिनीचे सूर, कीर्तनातील श्रवणभक्तीचे शब्द, संगीत, सप्ताहातील गजर यांचा नादमय आविष्कार म्हणजे श्रावण. शाकाहारी जेवणाला आणि जेवणाच्या चवीला धार आणणारा, जीव तृप्त करून टाकणारा महिना म्हणजे श्रावण. गोडधोड पदार्थ, प्रसादाचे द्रोण, भाज्या... आणि सहसा वर्षभर न केले जाणारे शाकाहारी पदार्थ. आनंदाने भरलेली सृष्टी जीवनालाही आनंदाचा टवटवीतपणा आणते अशी सौंदर्यानुभूती म्हणजे श्रावण.

श्रावणातील या आनंद उत्सवावर आणि निसर्गातील सृजनावर आधारलेली कित्येक गीते कवी आणि गीतकारांनी लिहिलेली आहेत. 'हासरा नाचरा जरासा लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला' हे कविवर्य कुसुमाग्रजांचे गीत. श्रावणातील रंग शब्दबद्ध करणारे हे गीत पद्मजा फेणाणी-जोगळेकर यांनी अत्यंत सुरेल आवाजात गायले आहे. तिलक कामोद रागावर आधारित हे गीत ऐकत असता, श्रावणात अनुभवलेल्या, कित्येक निवडक आनंद क्षणांच्या स्मृती

मनात जाग्या होतात, रुंजी घालू लागतात. काळीज कृतज्ञतेने भरून निघते आणि काळजाच्या गर्भगृहातून नकळत प्रार्थना होते... देवा तुला साष्टांग दंडवत. तुझे उदंड उपकार. आणखीन एक श्रावण या जीवनाच्या झोळीत तू टाकलास. हे जीवन आणखी संपन्न आणि श्रीमंत करण्यासाठी...

□

स्पष्टतेतील स्पष्टता

मूळ लेखक : मुकेश थळी

माणूस जेव्हा बोलतो, तेव्हा आपल्या बोलण्यात स्पष्टता आहे का याचा विचार तो करतोच असे नाही. आपल्याला जे म्हणायचे आहे ते समोरच्याला पूर्णपणे उमगेल की नाही याचाही विचार तो करत असेलच, असेही नाही. आपल्या विचारांत एखादी गोष्ट जरी असली तरी ती आपल्या बोलण्यातून समोरच्या व्यक्तीला समजेलच असे नाही. वास्तविक, आपल्या मनात कितीतरी गोष्टी खदखदत असतात. आपल्याला व्यक्त व्हायचं असतं. त्यासाठी शब्दांच्या वापर आपण केला तर समोरच्याला ते सांगणं सहज शक्य असतं. पण आपण जे सांगितलंय ते समोरच्याला पूर्णपणे समजलंय की नाही याचीही जाणीव बोलणाऱ्याला असणं आवश्यक आहे. एखाद्या आदर्श शिक्षकाचे विचार जसे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतात, त्याचप्रमाणे आपण बोलतानादेखील आपले विचार समोरच्यापर्यंत पोहोचतायत की नाही याचं भान राखणं अत्यंत आवश्यक आहे. मुळात, सर्वप्रथम विचारांतली स्पष्टता गरजेची आहे. त्यानंतर ती आपल्या बोलण्यातून म्हणजेच शब्दांतून क्रमवार, स्पष्ट आणि स्वच्छपणे व्यक्त व्हायला हवी. तेव्हाच त्याचा योग्य परिणाम साध्य होऊ शकतो. मात्र ज्यावेळी हे सगळं घडत नाही, त्यावेळी गोंधळ निर्माण होतो. त्याचप्रमाणे, बोलणारा जरी परिपूर्ण पद्धतीने स्पष्ट व्यक्त होत असला, तरीसुद्धा ऐकणाऱ्याचे जर लक्ष नसेल तर स्पष्टपणे बोललेले त्याला समजणार नाही. ''अत्यंत काळजीपूर्वक लक्ष देऊन ऐकणारा हा सगळ्यात श्रेष्ठ संवादक असतो'' अशा आशयाचे एक इंग्रजी वाक्य आहे.

जगातील अनेक समस्यांच्या मूळ कारणांपैकी एक म्हणजे स्पष्टतेचा अभाव. कोणतीही व्यक्ती वा संघटना जेव्हा एखादी कृती

करते तेव्हा, या कृतीतून काय साध्य होणार आहे, ती कृती कशी करावी, परिणामांना किती महत्त्व द्यावे, आपले उद्दिष्ट काय, आखणी कशी असावी तसेच त्याचा विस्तार केवढा असावा याची स्पष्टता असणे आवश्यक आहे. आयोजनात यासंबंधीची स्पष्टता नसल्यास मात्र फक्त गोंधळ माजतो. हरवलेल्याला आपल्या हरवलेपणाची जाणीवच होत नाही. कधीही न भरून येणारी अशी पोकळी निर्माण होऊन फक्त नुकसानच होत राहते. दिशादर्शकाशिवाय पाण्यात प्रवास करणाऱ्या नावेप्रमाणे, त्या कृतीत मग स्पष्टता उरत नाही. अशा वेळी एकच परिणाम होतो... अपयश.

लेखक, पत्रकार, नाटकातील कलाकार, सिनेमातील नट असो; तो बोलताना त्याच्या बोलण्यात हीच स्पष्टता असली पाहिजे. वकील आणि राजकारणी यांचा समावेश या यादीत न करणेच इष्ट. आपल्याला फायदा होईल अशा कलाने वकील घेतात आणि युक्तीवाद, मखलाशी करताना आपणास हवे त्या पद्धतीने तात्विक आणि वकीलकीचे मुद्दे, एका बोटावरील थुंकी दुसऱ्या बोटावर करावी अशा करामतीने फिरवतात. त्या अस्पष्टतेच्या गुंत्यात खरेपण किती आणि फिरवलेली वकिली किती यातील स्पष्टता शोधणे खरेच कठीण. आपल्या सोयीसाठी म्हणून अस्पष्ट बोलणे हा राजकारण्यांच्याही व्यवसायाचा एक भागच असतो हेही आपण पाहतोच. काही माणसेच मुळात राजकारणी, आतल्या गाठीची वा कपटी स्वभावाची असतात. विचारलेल्या काही गोष्टी ही माणसे सराईतपणे टाळतात. त्यांच्याकडे स्पष्टता नसते असे नाही, पण ती गोष्ट तुम्हाला स्पष्ट झालेली त्या माणसांना नको असते. त्यामागची कारणे मग काही का असेनात.

दुसऱ्याशी बोलताना वा भाषण करताना आपल्या शब्दाचा उच्चार स्पष्ट असावा. शब्द चावल्यास वा गुळगुळीतपणे बोलल्यास ते समजत नाहीत. पाण्यावर जणू 'कॅरम' खेळल्यागत आपल्या तोंडून शब्द बाहेर पडले की अस्पष्टतेमुळे समोरच्याला ते कळत नाहीत

किंवा त्यातून अनर्थ देखील ओढवतो.

आपल्या शब्दांत अर्थाच्या स्पष्टतेचे घनत्व हवे. वक्ता असल्यास, त्याने व्याख्यानातील मुद्दे क्रमवार स्पष्ट मांडणे आवश्यक. वक्तव्य आटोपशीर असावे. बोलणे पाल्हाळ झाल्यास मूळ मुद्दा एकतर अस्पष्ट राहतो वा हरवून जातो. निवेदक असल्यास शब्दांचा उच्चार स्पष्ट हवा. हा निवेदक मग रंगमंचावरील असो वा टीव्ही किंवा रेडिओवरील. साधासा एखादा निरोप दुसऱ्याला देताना देखील, देणाऱ्या किंवा घेणाऱ्याजवळ जर स्पष्टता नसेल तर जो घोळ होतो तो आपण रोजच अनुभवतो. म्हणूनच कोणताही निरोप सांगताना किंवा लिहून पाठवताना मी दोनदा सांगतो वा लिहितो. पुनरुक्तीची आवर्तने घेतो. कारण, ऐकणाऱ्याला निरोपामध्ये अस्पष्टता उरली होती, हे निमित्त उरता कामा नये.

नाटकांत वाचिक अभिनयाकडे बहुतेकदा दुर्लक्ष होते. कलाकार हा बोलताना शब्दांचा, वाक्यांचा, भाषेचा वापर करतो. प्रत्येक भाषेचा स्वत:चा एक ढंग असतो. तिचे स्वत:चे एक वजन असते. प्रत्येक पात्राच्या उच्चारांचा एक स्वभावविशेष असतो. त्या-त्या भूमिकेच्या शब्दांच्या उच्चारांत त्याचे म्हणून एक संगीत असते. आवाजाचे चढउतार असतात. त्यातील नेमकेपणा स्पष्ट होणे आवश्यक आहे. एखादा प्राध्यापक बोलताना ''मला ती जबाबदारी नको'' असे म्हणतो. परंतु ग्रामीण मनुष्य मात्र बोलताना ''मला ती जअबदारी नको'' असे म्हणतो. प्राध्यापकाचा 'जबाबदारी' हा ग्रांथिक विशुद्ध उच्चार आणि ग्रामीण माणसाचा 'जअबदारी' हा ग्राम्य उच्चार त्यातील हेळासह नादमय कसा असतो हे शब्दांनी दाखविणे अशक्य. सांगण्याचा मथितार्थ एवढाच की, स्पष्टतेची जाणीव ही वाचिक अभियनात हवीच. प्रख्यात कान-नाक-घसा तज्ज्ञ आणि महान नट डॉ. श्रीराम लागू यांनी वाचिक अभिनयासंदर्भात कित्येक व्याख्याने दिली आहेत. त्यावरच आधारित एक सुंदर पुस्तक देखील लिहिले आहे. हे पुस्तक वाचनीय तर आहेच पण त्यातून

शिकण्यासारखे देखील बरेच आहे. स्पष्ट असे कवितावाचन ऐकले ते उत्तरेकडील हिंदी कवींचे. कश्मीरमध्ये उर्दू कवींचे. त्यांच्याकडे पिढ्यानपिढ्या चालत आलेली मुशायराची श्रेष्ठ अशी परंपरा आहे. म्हणूनच त्यांच्या सादरीकरणातील बाज आणि खणखणीतपणा स्पष्टपणे उठून, फुलून दिसतो. श्रीराम लागू यांनी पणजीतल्या कला अकादमीत इंदिरा संत यांची कविता एकदा वाचली होती. कविता कशी वाचावी याचा तो एक आदर्श वस्तुपाठ होता. कविता वाचताना भाषा आणि त्यातील अर्थ तसेच भाव समजून त्यात वाचिक अभिनय किती असावा याचे ते एक सर्वांगसुंदर उदाहरण. कविता खूप ऐकल्या. एखादं सुरेल, स्वरेल गाणं ऐकावं तसा स्पष्ट कविता वाचनाचा, आजवरचा तो सर्वात ताकदीचा अनुभव.

साहित्यकारालाही स्पष्टता हवी. त्याच्या प्रकटीकरण आणि अभिव्यक्तीत ही स्पष्टता येणे आवश्यक असते. जेव्हा लेखक स्वत: आपली साहित्यकृती दोन-तीनवेळा वाचून त्यात दुरुस्ती करीत नाही वा आपल्या मित्रांच्या सल्ल्याने त्याचे संपादन करीत नाही तेव्हा तर त्यातील अस्पष्टता अधिकच शिल्लक राहते. प्रादेशिक भाषांतील अनेक मोठमोठ्या प्रकाशनगृहांत आजही दर्जेदार व कुशल संपादकांचा अभाव आहे. साहित्यकृतीतील अस्पष्टता साक्षेपी संपादनाच्या माध्यमातून दूर करता येणे नक्कीच शक्य आहे.

लेखकाने चिंतनातल्या आणि लिखाणातल्या स्पष्टतेचा रियाज करणे आवश्यक आहे. वाचणाऱ्याला डोके खाजवावे पडता कामा नये. लेखकाने स्वत:च स्पष्टतेचा स्वाध्याय करत रहावे लागते. तेव्हाच तो लेखक आटीव, घोटीव, मुद्देसूद, एकजिनसी, प्रभावी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्पष्टतेसह आपले विचार मांडण्यात यशस्वी होऊ शकतो. वाचक दूर जाण्याला खूप कारणे आहेत. आमच्या लिखाणातील स्पष्टता अधूनमधून गायब होणे हे त्यातीलच एक. एकदा का लिखाण क्लिष्ट आणि ओबडधोबड झाले की ,"जाऊ देत, आपण वेळ दवडण्यात काही अर्थ नाही" असे

वाचकाला वाटणे स्वाभाविक आहे.

एखाद्या शिक्षकाला देखील रोजच्या अध्यापनासंदर्भात स्पष्टता असणे आवश्यक आहे. शिक्षक हा सर्वप्रथम एक विद्यार्थी असला पाहिजे. अनेकजण विद्वान असतात. आपापल्या विषयाचे गाढे अभ्यासक व जाणकार असतात. परंतु शिकविण्यातील, म्हणजेच व्यक्त होण्यातील, स्पष्टता नसल्यामुळे ते उत्तम शिक्षक होऊ शकत नाहीत. उदाहरणार्थ, गणित सोडवण्याची कला, शास्त्र वा पद्धत विद्यार्थ्यांना स्पष्टपणे समजावून सांगतो तोच गणिताचा उत्तम शिक्षक. तो स्वत: हुशार असेल तर मग दुग्धशर्करा योगच.

स्पष्टतेविषयी देखील स्पष्टता हवी. स्पष्टतेवर प्रेम हवे. आपल्याजवळ स्पष्टता नाही हे न कळणाऱ्याचे वैयक्तिक नुकसान तर होतेच पण त्याचबरोबर तो आपल्या कार्यक्षेत्राचे देखील नुकसान करीत राहतो.

बातमी लिहिणाऱ्या पत्रकाराला घटनेच्या सगळ्या आयामांची स्पष्टता असणे आवश्यक असते. पक्षपात किंवा स्वत:चे मत वा विचार बातमीत प्रतिबिंबीत होता कामा नये. बातमी आणि भाष्य करणारा लेख यातील फरक त्याला नेमका माहित असणे आवश्यक आहे.

कलाकृती कोणतीही असो. नाटक, सिनेमा, कविता, कथा, निबंध... तिच्या प्रकटीकरणाच्या विकासात रचनकाराची रचनेतील स्पष्टता दिसायला हवी. अथपासून इतिपर्यंत स्पष्टतेचा हा प्रकाश असला पाहिजे. नवकल्पना, अंत:प्रवाह, अलंकार, प्रतिके, प्रतिमा, प्रायोगिकता हे सगळे असले तरीही त्यांच्या जोरावर मार्गक्रमण करताना स्पष्टतेचा अनादर वा गहाळपणा अजिबात नसावा.

मी स्पष्टतेला आपल्या बाहूंत घ्यावे. स्पष्टतेशी माझी मैत्री व्हावी. स्पष्टतेची माझी साधना अशीच चालू रहावी. आकाश हीच त्यासाठीची मर्यादा. मी कायम स्पष्टतेच्या सहवासातच रहावे. मी स्पष्टतेशी एकरूप व्हावे. स्पष्टतेची लांबी, रुंदी, उंची, खोली आणि

उत्कृष्टता यांचा ध्यास मला लागो. मुंग्या येण्यासाठी साखरेचे कण शिंपडावे लागतात त्याच न्यायाने स्पष्टता येण्यासाठी सत्यकणांच्या साखरेवर माझे लक्ष असावे. माझ्यातील स्पष्टतेची विशालता विस्तारण्यासाठी माझ्यामधील सृजनशीलता विस्तारू दे. समुद्रकिनाऱ्यावर पर्यटक ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश अंगावर घेऊन किरणांनी न्हाऊन निघतात त्याचप्रमाणे मीदेखील स्पष्टतेच्या स्वच्छ किरणांनी न्हाऊन निघू देत. सदोदित.

स्पष्टतेच्या उलट अस्पष्टता. गोंधळ वा भ्रम. माणूस त्यात बुचकळत राहतो. बुडण्याचीही शक्यता असते. कवाडे उघडी करून खोलीतील काळोख बाहेर उपसून टाकता येत नाही. अस्पष्टतेचा काळोख नष्ट करण्यासाठी देखील स्पष्टतेचा उजेड आत येणे आवश्यक.

'मी' म्हणजे काय याची स्पष्टता असली पाहिजे. माझ्या अस्तित्त्वाची स्पष्टता मला असली पाहिजे. 'मी' म्हणजे शरीर, की त्याच्याही पलिकडे मन, बुद्धी, इंद्रिये यांच्या पार आणखी काही तरी, याच्या स्पष्टतेचा रियाज हवा; अन्यथा वाहून जाण्याचा धोका संभवतो. ही स्पष्टता नसेल तर आयुष्याच्या लहानग्या वादळात देखील आपल्याला जलसमाधी लाभू शकते. जीवनाविषयी आणि जीवनातील ही स्पष्टता ज्याच्याठायी असते तो चळत नाही, ढळत नाही, हलत नाही.

आपण का जगतोय याची स्पष्टता नसणारा स्वत:चे नुकसान तर करतोच परंतु जगण्याच्या प्रयोजनामागील अस्पष्टतेमुळे तो चुकीच्या मार्गाने गाडी हाकून सभोवतालच्या स्पष्टतेच्या महामार्गावरील पथिकांना अकारण अडथळा निर्माण करतो. जीवनाचे उद्दिष्ट आणि अर्थ यांची स्पष्टता समजणे या गोष्टीला प्रथम प्राधान्य दिल्यास सर्व काही सुरळीत होऊ शकते.

जीवनाचा हेतू स्पष्टपणे समजणाऱ्याला, स्वत:ला सत्याच्या नांगराशी कामयचे बांधून ठेवावे लागेल. मन आणि काळीज

सत्याच्या निर्मळ साबणाने कायम धुवत रहावे लागेल. स्पष्टतेचे मोठमोठे पंख लावण्याचा खटाटोप तर त्यासाठी करावा लागेलच. त्याचप्रमाणे अडकलेले अस्पष्टतेचे पाश स्पष्टपणे समजून घेऊन ते तटातट कापून टाकण्याचा उद्योग नित्यनेमाने करावा लागेल. सत्याला आपण शरण जाऊ तेव्हाच स्पष्टतेचा लख्ख, परम प्रकाश आपल्याला लाभेल. अंतर्गत आणि बाह्य स्पष्टता प्राप्त होईल. चोवीस तास दिवे घेऊन प्रकाशमान करणारी, प्रज्ज्वलित करणारी दिवाळी अवतरेल. आणि तेव्हाच, स्फटिकाच्या पारदर्शकतेलाही लाजवेल अशी परम स्पष्टता प्राप्त होईल. बाहेर आणि आतही. त्याचीच तर गरज आहे. मलाही. . .

□

जीवनाचा रियाज

मूळ लेखक : मुकेश थळी

वेगवेगळ्या माध्यमांसाठी अनेक लेखकांच्या मुलाखती घेण्याचा योग आला. त्यातील प्रत्येकाला एक प्रश्न मी नेहमीच विचारला, ''तुम्ही का लिहिता ? लिहिण्यामागची तुमची प्रेरणा काय ?'' या प्रश्नाला वेगवेगळी उत्तरे मला मिळालीत.

'शतकातील मान्यवरांच्या मुलाखती' नावाचे एक पुस्तक पँग्वीन प्रकाशनने काही वर्षांआधी प्रकाशित केले होते. जगातील काही महान साहित्यिक आणि कवींच्या मुलाखती त्यात होत्या. मी का लिहितो या प्रश्नाची वेगवेगळी उत्तरे त्यात मान्यवरांनी दिलेली होती. आजही, वेगवेगळ्या नियतकालिक आणि मासिकांतून लेखकांचे अनुभव वाचायला मिळतात. त्यातही, प्रत्येक लेखक या प्रश्नाचे उत्तर आपापल्या पद्धतीने देण्याचा प्रयत्न करताना दिसतो.

आज हा प्रश्न मी स्वत:लाच विचारला. आणि काही क्षण मी गप्पच राहिलो. ''मी का बरे लिहितो ?''

बालपणापासूनच मी लेखन करीत होतो. शाळेत असताना, मी लिहिलेल्या गोष्टी व कथा नियतकालिकांतून छापून येत असत. त्या वयात, आपले नाव छापून आलेले पाहून, खूप आनंद होई. पण माझ्या मित्रांनी कधीच लेखन केले नाही. आपलेही नाव छापून यावे असे त्यांना कधीच वाटले नसावे का ?

त्याचे कारण म्हणजे, लेखन ही एक कला आहे. लिहिता येणे म्हणजे लेखन करता येणे नव्हे. ताल शिकविता येतो, लय नाही. गाणे शिकविता येते, सूर नव्हे. लेखन करणे म्हणजे, वाङ्मयीन मूल्ये असलेले साहित्य निर्माण करणे. त्यासाठी आवश्यक असते ती प्रतिभा. . . अंगभूत. . . जात्याच. . . उपजत. परंतु, आपणाजवळ ही देणगी असल्याचे कळल्यावर मात्र नेमाने साधना करावी लागते.

मी सातत्याने का लिहितो? ''लेखन कर, नाहीतर तुला सुळावर चढवू'' असे सतत कुणीतरी मला म्हणत असते का? लेखन केले नाही तर काय होईल ? कशासाठी हा खटाटोप आणि कशासाठी हे उपद्व्याप ?

लेखन केल्यावर आनंद मिळतो. एक अनामिक शांती लाभते. लिहिताना एक प्रकारची डोकीफोड आणि सृजनाच्या कळा, दगदग सहन करावी लागते. ती कथा असो वा निबंध, तयार होत असता एक प्रकारचा त्रास नक्कीच होतो मात्र त्याचबरोबर एक अवर्णनीय आनंद देखील लाभत असतो. ताण आणि आनंदाचे कारंजे एकाच वेळी मनात उसळत असतात. आपण काहीतरी पाहिलेय, अनुभवलेय, कसल्यातरी अनुभवाने आपण तिरमिरून निघालोय, दुसऱ्याचे दुःख पाहून आपण कळवळून निघालोय आणि ते दुःख समानुभूतीने (ॲम्पथी) आणि सहानुभूतीने (सिम्पथी) स्वतःचेच असल्यागत समजून घेण्याचा प्रयत्न मी करतो, आजुबाजूची भकास यंत्रणा पाहून चिडून उठतो, तणतणतो, फणफणतो, व्यथित होतो, आतल्या आत पेटून उठतो आणि मग मला बंड करावेसे वाटू लागते. भावनांना, उमाळ्यांना, संतापाला वाट करून देण्यासाठी मी लेखणीचा आधार घेतो. कागदावरच मी लेखन करतो असे नाही. मनाच्या पटलावर देखील माझे लेखन झरझरपणे चालूच असते.

अंतर्मनात खोल कुठेतरी, काहीतरी खदखदत असते, उसळत असते. कसले तरी रवंथ चालूच असते. काही तरी पिकत असते. एकावर एक अनुभव साचून त्याला एक प्रकारचा आकार येत राहतो आणि आतल्या आत त्याचा त्रास होऊ लागतो. बाहेर पडण्याची उत्कंठा त्या अनुभवांना लागते. आपणाला हवे असणाऱ्या साहित्यप्रकाराचा पोषाख परिधान करून हे अनुभव उफाळून बाहेर येतात. त्यावेळी, मनातील ही प्रक्रिया, हातात लेखणी घ्यायला मला भाग पाडते. अनुभव कागदावर उतरवताच मला आनंद होतो. मोकळे वाटते. माझ्यात काही 'टॅलन्ट' आहेत, परंतु लेखक ही माझी ओळख

मला सर्वात जास्त आवडते. लेखक म्हणून मी स्वत:चा स्वीकार केला आहे. लिहिणे हा माझा स्वधर्म. पक्षी का उडतात? तसे न केल्यास कुणी त्यांना शिक्षा देणार आहे का? एखादा गायक का बरे गातो? एखादा गायक फक्त मैफिलीच्या वेळीच गातो असे नाही. जेव्हा तो रियाज करत नसतो तेव्हा देखील आतल्या आत त्याचे गायन चालूच असते. आतल्या आत त्याचे गुणगुणणे सुरूच असते. त्या संगीतात, त्या सागरात बुडून जाणे त्याला आवडते. त्यातील लहानसहान सूक्ष्मत्त्वांचा ठाव आणि वेध घेण्याचा त्याचा प्रयत्न सतत चालूच असतो. सुरांच्या अगदी समीप असणाऱ्या श्रुतींविषयी तो अत्यंत जागरुक असतो. त्याच्यासाठी स्वर हा ईश्वर. आणि लेखकासाठी ? त्याच्यासाठी शब्द हा ईश्वर. लौकिक अर्थाने पैशांची वा अन्य कोणत्याही भौतिक गोष्टीची प्राप्ती व्हावी म्हणून ही धडपड नसतेच मुळी. एखाद्या गायकाचा प्रवास कशासाठी चालू असतो? ही प्रक्रिया त्याला आकाशाएवढा आनंद देत असते, म्हणून. हा कलानंद जीवनाला एक वेगळीच 'क्वॉलिटी' प्राप्त करून देत असते.

कवी आरती प्रभू लिहितात,

''तो न गातो,
तो आतून ऐकतो''

लेखकही असाच असतो. अमर्याद अशा यात्रेचा तो एक प्रवासी. त्यात साध्य असे काहीच नसते. असतो तो फक्त यात्रेचा एक आगळावेगळा आनंद. जीवनाची साधना हा लेखक करीत असतो. जीवनाच्या सत्याशी तो निष्ठा बाळगून असतो. आपल्या आसपासचा परिसर सूक्ष्मपणे, तो न्याहाळतो. भोवतालची माणसे आणि स्वत:लाही वाचण्याचा प्रयत्न तो करतो. त्यांना आणि स्वत:लाही कायम 'अण्डर ऑब्झर्वेशन' ठेवतो. जीवनाच्या वेगवेगळ्या आयामांना, पैलूंना मोकळेपणाने आणि उत्कटपणाने तो भिडतो. स्वत:ला त्यात झोकून देतो. आंघोळीनंतर अंग पुसून झाले तरी, पाण्याचे काही थेंब मागे बाकी राहतात त्याचप्रमाणे लेखक,

जीवनाच्या रियाजातील काही थेंब, काही शब्द कागदावर ओतून रसिक वाचकांना उत्स्फूर्तपणे देतो. त्याने खूप काही अनुभवलेले असते. खूप काही सांगण्याची इच्छा त्याला असते. परंतु, कित्येक अनुभव हे शब्दांच्या पलिकडले, शब्दातीत असतात. त्या अनुभवांना शब्दबद्ध करणे लेखकाला जमत नाही. सांगण्यासारखे असे बरेच काही राहून गेले आहे ही खंत लेखकाला कायम सलत राहते. ही बोचरी, त्रासदायक अतृप्ती आणि आपण जे सांगितले आहे त्याचा आनंद या संमिश्र मनोवस्थेत लेखक उरतो. तो लिहीत नाही. तो फक्त जीवनाचे सूर ऐकत असतो. हीच प्रेरणा त्याला सुचवत असते. . . ''लिहीत रहा.'' अमुक काहीतरी आवडले असे कधीतरी एखादा वाचक मनापासून सांगतो त्यावेळी लेखकासाठी तोच खराखुरा पुरस्कार असतो.

इतरांनी लिहिलेले देखील लेखक वाचतो. उत्तम असे वाचल्यावर, आपणही त्याच दर्जाचे आणि चिरंतन मूल्य असलेले, अभिजात तसेच टिकून राहणारे साहित्य निर्माण करावे असे लेखकाला वाटते. जगभरातील जुने आणि समकालीन साहित्य, त्यांचे भाषांतर लेखक वाचत असतो. जेव्हा तो लिहीत नसतो तेव्हा तो वाचत असतो. हा रियाज चालूच असतो. या वाचन व्यासंगातून लेखकाची वाढ होत असते. माणूस या नात्याने तो आतूनही वाढणे आवश्यक असते. तसा प्रयत्न त्याने केला पाहिजे. दर दिवशी. वैचारिक प्रगल्भता आणि परिपक्वता वाढत राहिली पाहिजे. अन्यथा, एक प्रकारचे साचलेपण येते. आपले अनुभवविश्व, आपली शैली आणि ज्या मुळांनी आपल्याला घडविले त्या गोष्टींशी लेखकाने प्रामाणिक राहिले पाहिजे.

अन्य लेखकांच्या साहित्यकृतींविषयी, नव्या नाटकांविषयी, नव्या चित्रपटांविषयी, अद्ययावत माहिती आनी बातम्या नियतकालिकांमधून वाचायला मिळतात. हे भान आणि ही जाणीव लेखकाजवळ हवीच. गिरीश कर्नाड यांची दीर्घांक रूपातील नाटके

आणि त्यांचे विचार वाचायला मिळतात. नाटक कसे सादर करावे याचा वस्तुपाठ घालून देणाऱ्या एका बंगाली नाटकाचे परीक्षण एका दैनिकाच्या रविवारच्या अंकात वाचले. खूप काही शिकायला मिळाल्याच्या आनंदात मी तरंगू लागलो. उदय प्रकाश या नामवंत लेखकाविषयी तसेच त्याच्या साहित्याविषयी मी वाचले. या लेखकाच्या साहित्याविषयी प्रेक्षकांत अज्ञान असल्याने त्याच्याविषयी जाणून घेण्याची उत्सुकता वाढली. त्यानंतर उदय प्रकाश यांची २० पानी इंग्रजी मुलाखत मी वाचली.

ज्ञानपीठ संस्थेचे 'नया ज्ञानोदय' हे मासिक मी विकत घेतो. साहित्य अकादमीतर्फे, दोन महिन्यांतून एकदा प्रकाशित होणारे, 'समकालीन भारतीय साहित्य' हे हिंदी मासिक येते. प्रादेशिक भाषांतील भारतीय साहित्याची भाषांतरें त्यात वाचायला मिळतात. 'नया ज्ञानोदय'ने 'नया पीढी' विशेषांक प्रकाशित केला होता. त्यात उगवत्या युवा हिंदी लेखकांचे साहित्य समाविष्ट केले होते. बिहार आणि अन्य परिसरात, कल्पनेच्या पलिकडील गरिबी, दारिद्र्य तसेच भूक, उपासमार, मागासलेपण यांनी पोळून निघालेल्या युवकांनी लिहिलेले साहित्य वाचले. अगदी ज्वलंत. त्यात तेजस्वी असा सच्चेपणा दिसला. 'बैल कसा विकत घेतात या संदर्भात उत्तर प्रदेशमधल्या एका तरुणाने लिहिलेली कथा, हिंदीतली या विषयावरची आजवरची सर्वात श्रेष्ठ कथा आहे' असा उल्लेख संपादकीय लेखात वाचला आणि मी आश्चर्यचकित झालो.

जागतिक ख्यातीचे भारतीय कादंबरीकार भैरप्पा यांच्या कादंबऱ्या वाचताना जी विश्वें पाहिली ते लिहून संपणार नाही. अलिकडेच त्यांची 'मंद्र' कादंबरी वाचली. एका गायकावर केंद्रित असे कथानक त्यात आहे.

'रीडिंग एण्ड रायटिंग' हे नायपॉलचे पुस्तक दहावेळा वाचले. विजय तेंडुलकर तसेच दि. बा. मोकाशींच्या कथा मी पुन्हा पुन्हा वाचतो. काही साहित्यकृती वारंवार वाचाव्यात अशा असतात.

दर्जेदार साहित्याची हीच तर जादू. मी जे लिहितो ते पुन्हा पुन्हा वाचावे असे वाचकांना कधी वाटेल ? त्या दर्जाचे लेखन माझ्या हातून व्हावे असे पोटतिडकीने मला वाटू लागते आणि हीच गोष्ट मला उत्तमोत्तम लिखाण करण्याची प्रेरणा देत राहते.

'ज्ञानोदय'चा ताजा अंक सध्या मेजावर आहे. नामवंत उर्दू कथाकार 'मंटो' यांच्यावर आधारित हा विशेषांक. 'मंटो' फक्त ४२ वर्षे जगले. परंतु त्यांच्या कथा जागतिक पातळीवर किती श्रेष्ठ दर्जाच्या आहेत तसेच 'चेकोव' आणि 'मोपासा' यांच्या लेखनाइतक्याच तोलामोलाच्या त्या कशा आहेत हे वर्णन करणारे महान समीक्षकांचे लेख या विशेषांकात आहेत.

मी काव्यलेखन केलेले नाही परंतु श्रेष्ठ काव्य वाचण्याचा आणि समजून घेण्याचा प्रयत्न मी नक्कीच करतो. कलात्मक चित्रपट मी पाहतो. नाट्यगृहातील नाटकें पाहतो आणि वाचतोही. त्याचबरोबर सभोवतालची नाटकेही तटस्थपणे न्याहाळतो.

सखोलपणा आणि सूक्ष्मपणा ह्या महत्त्वाच्या दोन बाबी. निरीक्षण करताना, अनुभव घेताना वा जगताना, पुस्तके वा माणसे वाचताना, सूक्ष्मपणा हवा. परिस्थिती वा घटना यांच्या कारणांचा वा उगमाचा ठाव घेताना हा सूक्ष्मपणा आवश्यक असतो. जी साहित्यकृती कागदावर उतरते त्यात लांबी, रुंदी, खोली तसेच प्रवाही शैली, सुटसुटीत वाक्ये असली पाहिजेत. जीवनाच्या ज्या कटू सत्याविषयीची अस्वस्थता आपण भोगत आहोत ती अस्वस्थता वाचकाला भोगायला लावून त्याला चिंतन करण्याची, समस्या हाताळण्याची, स्पष्टता देण्याची क्षमता लेखकाजवळ असली पाहिजे. आपण अनुभवलेला आनंद दुसऱ्याला देऊन समोरच्या व्यक्तीचीदेखील रसिकता वाढवण्याची कला लेखकामध्ये असली पाहिजे. विनोदी शैलीने वाचकाला हसवत असताना, सत्याचे चिमटे काढत, समोरच्या व्यक्तीने जीवनातील न पाहिलेल्या सत्याचे दर्शन

त्याला करवून, दृष्टांत घडविण्याचे कसब लेखकाकडे असणे गरजेचे असते.

लेखकाकडे प्रज्ञा आणि प्रतिभा ह्या दोन्ही गोष्टी उपजत असल्यास, संतुलित प्रमाणात म्हणजेच साहित्यकृतीच्या गरजेप्रमाणे, त्या प्रतिबिंबित होऊन एक वेगळीच चकाकी आणि चमक त्याला येते. साहित्यकृती म्हणजे एक सुंदर शिल्प झाले पाहिजे. त्या सहित्यकृतीत काय आहे, विषय वा आशय कोणता आहे, सुखाचे वर्णन आहे का दु:खाचे यापेक्षाही ते साहित्यशिल्प कलात्मक पद्धतीने तंत्राच्या चौकटीत कसे मांडले आहे हे पाहणे जास्त महत्त्वाचे ठरते. वाचकाच्या हृदयात आणि मेंदूत तो खोल भिडणे आवश्यक. त्याच्या स्मरणात ते उरले पाहिजे.

लेखनामध्ये एकही सूर बेसूर लागता कामा नये. एखादे वाक्यच नव्हे, तर एखादा शब्दही अकारण आला आहे असे होता कामा नये. कसलाच पसरटपणा, पाल्हाळपणा येता कामा नये. ज्यावेळी दर्जेदार असे काही मी वाचतो त्यावेळी, ''असे दर्जात्मक लेखन माझ्या भाषेत कधी येईल बरे?'' हा प्रश्न मला भेडसावू लागतो. ज्या दर्जाचे, उंचीचे लेखन मला आवडते आणि जे वाचल्यावर मला अवर्णनीय आनंद होतो तसे लेखन माझ्या हातून कधीतरी व्हावे ही प्रेरणा मला कसदार लेखन करण्याचे बळ देत राहते. माझ्या लेखनात निश्चितपणा आणि नेमकेपणा असावा, ते आटीव-घोटीव, एकजिनसी आणि आखीव-रेखीव असावे, प्रवाही आणि धारदार असावे, त्यात सूचकपणा असावा; पावसात जशी ओल येते तसा अंत:प्रवाह त्यात असावा, आशयघनता असावी आणि गरज वाटल्यास शैलीचे प्रायोगिक नाविन्य असावे ही माझी तळमळ आहे.

ओजस्वी साहित्य माझ्या चिमुकल्या हातांतून घडो वा अन्य कुणाच्याही. माझी भाषा आणि त्यातील साहित्य जगभर चमकत रहावे हाच माझा ध्यास. भोवतालचा आर्थिक, नैतिक भ्रष्टाचार, दांभिकपणा, नाटकीपणा, खोटारडेपणा, बुरसटलेली यंत्रणा,

झुंडशाही आणि धाक-दपटशाही, कोसळणारी मूल्ये, मोडकळीला आलेली समाजव्यवस्था, निष्क्रीयता, आतंकवाद, ऊग्रवाद, पिळवणूक, वेगवेगळ्या प्रकारचे राजकारण, शोषण, सुशिक्षित असूनही अशिक्षिताप्रमाणे वागणारे लोक आणि या सर्व गोष्टींना कारणीभूत असणारे सर्व घटक पाहून मी तडफडून उठतो. कितीतरी पात्रे वादळ बनून माझ्यात थैमान घालू लागतात. एकांकिका, नाटक, कथा, कादंबरी अशा माध्यमांतून अमूर्त गोष्टी मूर्त स्वरूपात आकाराला येऊ पाहतात. कितीतरी ज्वालामुखी माझ्यात खदखदत असतात. हीच ऊर्जा माझ्यातील लेखकाला जिवंत ठेवते.

मासे पकडण्यासाठी गळ टाकून बसतात तसेच लेखकाचेही असते. मासा गळाला कधी लागेल याची वाट जशी पाहत बसावे लागते तसेच लेखकालाही धीर ठेवावा लागतो. नेहमीच मोठा मासा गळाला जरी लागला नाही, नेहमीच 'मास्टरपीस' घडला नाही तरीसुद्धा काहीतरी वेगळे असे गळाला लागतेच.

लेखकाने नेहमीच विद्यार्थीपण बाळगावे. वाचक हा आपल्यापेक्षाही अधिक हुशार, सूज्ञ आणि बुद्धीवान आहे असे समजणारा लेखकच आधीच्या लेखनापेक्षा अधिक दर्जेदार निर्मिती करतो आणि एके दिवशी त्याच्या हातून 'मास्टरपीस' घडतो.

एके दिवशी मी माझ्या मूळ गावी - चोडणला - जात होतो. आषाढ की श्रावण ते नीटसे आठवत नाही. परंतु, अचानक एका निर्जन स्थळी पाऊस सुरू झाला. स्कूटर थांबवली. जवळच्याच एका झाडाच्या आडोशाला थांबलो. शेजारच्याच एका टेकडीवरील हिरव्यागार कुरणात, पिसारा फुलवून, आपल्याच तंद्रीत, आनंदाने बेभान होऊन एक मोर नाचत होता. कुठल्यातरी रागदारी रचनेच्या तालासुरावर, लयीत त्याची पावले थिरकत होती. तो अनुभव मी आयुष्यभर विसरू शकणार नाही. सोनेरी उन्हात पडणारा पाऊस, आभाळातील इंद्रधनुष्य, त्या इंद्रधनूसारखा फुललेला मोराचा पिसारा पाहून माझ्याही मनाचा पिसारा खुलला. त्या मोराला कुणी नाचायला

सांगितले होते का ? मी 'वन्स मोअर' म्हणालो म्हणून का तो मोर नाचत होता ?

लेखक या नात्याने मोराकडून एक गोष्ट मी शिकलो. सृजनाचे अभ्र मनात येताच, शब्दांच्या आणि विचारांच्या पावसात मनाचा पिसारा फुलवून नाचत रहावे. जीव ओतून. बेधुंद होऊन. फक्त आनंदासाठी. . .

मी का लिहितो ? याचे उत्तर देणे सोपेही आणि कठीणही. कदाचित काही वर्षांनंतर याच प्रश्नाची उत्तरे अधिक विस्तृत आणि स्पष्टपणे मिळतीलही कदाचित.

तुर्तास तरी मला एवढेच वाटते आहे. एखाद्या घोणीसारखे. ह्या घोणीला कुणीतरी एकदा विचारले, ''अग घोणी, तुला तर शंभर पाय आहेत. चालताना सगळ्यात आधी तू कोणता बरे पाय उचलतेस?'' तर ती विचारातच पडली. चालता चालता प्रश्नाचे उत्तर ती शोधू लागली. आधी हा पाय, का तो पाय का दुसरा एखादा... ? असा विचार करतच राहिली आणि शेवटी चालूच शकली नाही. म्हणूनच वाटते, आपण लिहीत राहिलेले बरे. नाहीतर या घोणीसारखी आपली गत व्हायची.

मी सगळ्याच गोष्टी 'सिरियसली' घेतो. लिहिणे हा माझा छंद असला तरी मी त्याचा गांभिर्याने विचार करतो. साहित्याचे वाचन आणि लेखन या दोन गोष्टींनी मला जीवनाच्या वाटेवर मौल्यवान सोबत केली आहे. जीवनाच्या सखोलतेत आणि अर्थ शोधत, जीवन सफल करण्याचा प्रयत्न मी करतो. प्रत्येक क्षण मधाप्रमाणे चाटून तो खऱ्या अर्थाने जगण्याची कला मी रुजवत आहे. माझ्या हातांनी लिहिला गेलेला एकेक शब्द 'अक्षर' होऊन कसा टिकून उरेल हा पूर्णत्त्वाचा ध्यास आणि त्या सृजन आनंदाची ओढ मला सदासर्वकाळ लिहिता ठेवते.

□

श्री. संजीव वेरेंकार

जन्म : २८ ऑगस्ट १९५९
पत्ता : चित्रंगी रेसिडेन्सी, मंगेशी,
फोंडा, गोवा. ४०३४०४
संपर्क : ९४२२६४३६२९
ई-मेल : verenkar.sanjiv@gmail.com

कार्यानुभव :
कवी, लेखक आणि ज्येष्ठ पत्रकार

प्रकाशित साहित्य :
भावझुंबर, मुंबर, गांवांतली सांज, पडवेवयली संवणी, चैतन्याच्यो पावळ्यो, अस्वस्थ सूर्य, सांज सुलूस (कवितासंग्रह)
हाडामासाचीं देवळां (व्यक्तिचित्रें)
यादीचें कुरकूट (निबंध)
सुमिरन (कवितासंग्रह) (अनुवाद)
कवितांचा इंग्रजी तसेच अन्य भारतीय भाषांत अनुवाद

पुरस्कार :
विश्वकोंकणी केंद्रातर्फे विमला पै विश्व कविता कृती पुरस्कार
कोंकणी भाषा मंडळ पुरस्कार
अखिल भारतीय आकाशवाणी पुरस्कार
अस्मिता प्रतिष्ठान पुरस्कार

□

गावाकडे

मूळ लेखक : संजीव वेरेंकार

अंदाजे १६-१७ वर्षांआधी, सावईवेरे या माझ्या मूळ गावाहून मी पणजीत स्थायिक झालो. बारा-तेरा वर्षे पणजीतल्या आल्तिन भागात वास्तव्य केल्यानंतर आता मी मंगेशीत स्थिरावलोय. वाहतुक आणि दळणवळणाच्या सोयीसुविधा वगळता मंगेशी हा गाव माझ्या सावईवेरे गावासारखाच. आताशा त्याला शहरीकरणाचे वेध लागू लागलेत. कुंडई आणि मडकई ह्या औद्योगिक वसाहती तर अगदी शेजारीच, त्यामुळे अनोळखी चेहऱ्यांची गर्दी गावात वाढू लागलीय. अगदी शहरांप्रमाणेच इथेही कचऱ्याच्या प्रदूषणाचा भस्मासूर मान वर काढू पाहतोय. फ्लॅट संस्कृती हळुहळू मूळ धरू पाहतेय. आल्तिनप्रमाणेच इथेही माझे वास्तव्य फ्लॅटमध्येच आहे. फ्लॅट संस्कृती माझ्या स्वभावाशी अजिबात मेळ खात नाही. पण परिस्थितीला पर्याय नसतो. गावातील माणूस फ्लॅटमध्ये रहायला येताच आपली मूळ जीवनशैली त्यागून कृत्रिम जीवनपद्धत जगू लागतो, ती त्याच्या अंगवळणी पडते. मी मात्र असे करायला तयार नाही. माझी जीवनशैली पाहता लोकांना मी एखाद्या हेंगाड्यासारखा, अडाण्यासारखा वाटतो. आज माझ्या कपाटात कितीतरी महागड्या बॅगा आहेत, परंतु पणजीला जाताना देखील, एखाद्या गड्याप्रमाणे मी तागाचीच पिशवी घेऊन निघतो. ''ही असली पिशवी घेऊन जायला तुम्हाला लाज वाटत नाही का हो आबा?'' असे, आमच्याकडील घरकाम करणारी, छाया जेव्हा मला विचारे तेव्हा मी नुसता हसे. ह्या अशा पिशवीमुळे माझे जीवन किती सोपे, सुटसुटीत होत असे ते माझे मलाच ठाऊक.

मंगेशीतील अनेकांना, माझ्या या जीवनशैलीचे भारी कुतुहल.

इथे मी जरी फ्लॅटमध्ये राहत असलो तरी श्री मंगेश आणि श्री महालसेच्या देवळातल्या भजनांचे गोड सूर रोज रात्री माझ्या कानावर पडतात. तेव्हा मात्र मला, जणू मी सावईवेऱ्यातील माझ्या मूळ घरी असल्याचा भास होतो आणि दुधाची तहान ताकावर भागते. आजच्या बदलत्या परिस्थितीत तेवढंच काय ते समाधान.

बालपण आणि युवावस्थेतला बहुतांश काळ मी सावईवेरे गावातच घालवला. माझ्यातील कविप्रतिभेचे बीज देखील तिथेच अंकुरले. म्हणूनच की काय, रात्री झोपेत मला स्वप्ने पडतात ती देखील घराकडील आणि गावचीच. सातेरीच्या देवळातील बालवाडीत, पितळीच्या लखलखणाऱ्या पेल्यातून, गरम दूध आणि गोलाकार गोड बिस्किटचा खाऊ आम्हाला मिळत असे. त्याची चव आजही जिभेवर रेंगाळतेय. आजकाल मिळणाऱ्या पिशवीतील, गाई-म्हशीच्या वा पावडरच्या दुधाला त्या चवीची सर अजिबात नाही. माणसांप्रमाणेच गुरांचाही आहार आता बदललाय. आज गुरे प्लास्टिकच्या पिशव्या देखील खाऊ लागलीयत, त्याचाच हा परिणाम. रायकरांच्या माडीवर विलास मास्तर हातात खडू घेऊन शिकवत असता, त्यांनी आपल्या कपड्यांवर शिंपडलेल्या अत्तराचा सुगंध आजही माझ्या आठवणीत दरवळतोय. दुसऱ्या इयत्तेपर्यंतचे माझे शिक्षण त्याच माडीवर झाले. त्यावेळेस सोबत शिकणाऱ्यांची आठवण करण्याचा प्रयत्न मी अधुनमधून करतो. ''ते आता कुठे असतील? त्यांनाही माझी अशीच आठवण येत असेल का?'' या प्रश्नांचे उत्तर शोधण्याचाही प्रयत्न मी क्वचित करतो.

गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांच्यामुळे सड्यावर पहिली शाळा सुरु झाली आणि रायकरांच्या माडीवरील शाळेच्या अस्तित्वाला पूर्णविराम मिळाला. सड्यावरच्या शाळेत चौथीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर पुढील शिक्षण इंग्रजी माध्यमातून घेण्याचा हट्ट मी धरला आणि घरापासून सुमारे दोन किलोमिटर अंतरावर असलेल्या, धुप्यातील उत्कर्ष विद्यालयात प्रवेश घेतला.

आज आम्ही आमच्या मुलांना गाडीने शाळेत नेऊन पोचवतो. त्या काळात मात्र आजच्यासारख्या बसेस, गाड्या नव्हत्या. दप्तर पाठीला लावायचं आणि पायी चालत शाळेत ये-जा करायची. वाटेत मिळणारा रानमेवा चाखणे, मोसमामध्ये खडकावर फोडून अननस खाणे हे आमचे शाळेत ये-जा करतानाचे उद्योग. खडकांवर आपटून फोडलेले अननस खाल्ल्यास पोटदुखी होत नाही असे घरातील वडीलधारी मंडळी म्हणत असे. आमच्या बालपणीच्या त्या आनंदाची कल्पना आमच्या मुलांना येणे निव्वळ अशक्य. माझ्या मुलींना जेव्हा मी ह्या गोष्टी वर्णन करून सांगतो तेव्हा त्यांना त्याचे भारी अप्रूप वाटते व त्या चकितच होतात. मराठी माध्यम सोडून इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याचा निर्णय घेणे म्हणजे त्या काळातील जणू एक बंडच. मी केले त्यालादेखील बंडच म्हणावे लागेल.

नाही म्हटले तरी, चौथीच्या वर्गात असताना मी एक बंड केले होते खरे. पानेरी नावाचे एक उर्मट मास्तर आम्हाला शिकवत असत. त्यांचे स्वत:चे शिक्षण किती झाले होते कुणास ठाऊक. हे मास्तर वर्गातल्या मुलींशी गैर चाळे करीत. त्यामुळे त्या मुली रडत. आम्ही सगळेच निरागस, निष्पाप. त्यांच्या 'त्या' वागण्याचा अर्थ त्यावेळेस मला कळत नसे पण संताप नक्कीच येई. त्या काळात पठाणसूट की काय नावाचे, नवीन प्रकारचे बूट बाजारात आले होते. अंदाजे दोन-अडीच रुपये त्यांना पडत. आमच्यासाठी ते भारी महागडे आणि उंची. माझ्यासाठीही हे बूट आणले होते. महागडे आणि उंची असल्यामुळे ते वर्गाबाहेर काढायची भीती. चोरीला जाण्याचा संभव असे. हे बूट घालून मी वर्गात गेलो. त्या काळात चपला वर्गाबाहेर काढाव्या लागत. मास्तर मात्र लोखंडी पत्र्याचा तळ असलेल्या, चामड्याच्या करकरत्या वहाणा घालून वर्गात येत. मास्तरांनी मला बूट वर्गाबाहेर काढायला सांगितले. साहजिकच, मी स्पष्ट नकार दिला. मी म्हणालो, ''मी बूट काढणार नाही. आधी तुम्ही तुमच्या चपला बाहेर काढा.'' माझ्या आगाऊ वागण्याचे फळ म्हणून मला चांगलेच धपाटे

मिळाले, वळ उठले. ''माझ्या वहाणा माझ्यासाठी पत्नीसमान आहेत'' असे ते म्हणाले. स्वत: एक शिक्षक असून देखील स्वत:च्या पत्नीकडे मास्तर ज्या दृष्टीने पाहत त्याचा विचार करता आजही माझ्या तळपायाची आग मस्तकाला भिडते. मास्तरांच्या मनात काय आले कोण जाणे, त्या दिवसापासून त्यांनी सगळ्याच विद्यार्थ्यांना चपला घालून वर्गात बसायची मोकळीक दिली. माझ्या आयुष्यातील हे नक्कीच पहिले बंड असले पाहिजे.

सड्यावरच्या शाळेत लताबाई नावाच्या एक शिक्षिका आम्हाला शिकवायच्या. अधुनमधून त्यांची आठवण मला येते. कुठे असतील त्या आता ? पत्ता मिळाला असता तर नक्कीच एखादे वेळेस मी त्यांना भेटलो असतो. शाळेच्या आवारात वेगवेगळ्या प्रकारची झुडपे होती. ह्याच झुडपांच्या झोपड्या करून आम्ही खेळायचो. आता त्या झुडपाळ प्रदेशाची जागा घरांनी घेतलीय. सडा म्हणजे खडकाळ प्रदेश. मोठ्याल्या खडकांना आम्ही किल्ले म्हणायचो. मग कुणी मराठा होई तर कुणी मोघल. मराठ्यांनी मग मोघलांवर चढाई करायची. शिवाजी बनण्याची हौस प्रत्येकालाच. अशा या खेळात खूप मजा येई.

उत्कर्ष विद्यालयात (आजचे के. आर. एस. एस. विद्यालय) माध्यमिक शिक्षण सुरु झाले आणि अंगातील बालीशपणा हळुहळू दूर होऊ लागला. घरातल्या गरिबीचा आता अंदाज येऊ लागला होता. नवे मित्र, नवे शिक्षक, नवे वातावरण याचबरोबर नवे प्रश्न निर्माण होऊ लागले होते. अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची वृत्ती, नवी विचारधारा विकसित होत होती. माझ्या आजवरच्या जीवनसप्रवासाचा मागोवा घेताना, त्याचे सिंहावलोकन करताना आयुष्यातील तो टप्पा, काळ मला खूप महत्त्वाचा वाटतो. आयुष्यातील अनेक चढ-उतार, टक्केटोणपे याच काळात मी अनुभवले.

सुट्टी पडली की आम्ही मैदानावर क्रिकेट खेळत असू. कधी

क्रीडाकेंद्रात जाऊन कॅरम खेळत असू, बाजारात गोट्यांचा खेळ रंगवत असू तर कधी घामाने डबडबलेलं अंग घेऊन थेट अनंताच्या देवळासमोरील तळीत जाऊन सूर मारत. भटांच्या घरातील नरसिंह, घनश्याम, प्रशांत, श्रीकांत ह्या, त्यावेळच्या सवंगड्यांसमवेत नाना तऱ्हेच्या जलक्रीडा केल्या. देवळात कधीतरी भजनी सप्ताह असे. चोवीस तास अखंड भजन. अशा वेळी रात्रभर आमचा मुक्काम हा देवळातच असे. पहाटेच्या वेळी दादा भटांच्या हातातल्या उसळीच्या प्रसादाचा द्रोण हातावर पडल्यानंतरच आम्ही घरी परतत असू. देवळातल्या भजनाला मात्र मी कधीच हजेरी लावली नाही. आत भजन चालू असे आणि आम्ही मात्र बाहेर मंडपात खेळत असू. मध्येच कधीतरी दादा भट येऊन आमच्यावर ओरडायचे, रागवायचे. मला त्यांचा राग येई पण उसळीच्या द्रोणापायी संयम बाळगावा लागे. पण काहीही म्हणा, त्या उसळीची चवच काही और होती. आजच्या मुगांनाच ती चव राहिली नाही मग ती उसळ रुचकर होण्याचा सवालच राहत नाही. म्हणतात ना, आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार ?

अनंताच्या काल्याचा (म्हणजे जत्रेचा) दिवस जवळ येऊ लागताच आम्ही मोठ्या आतुरतेने, चातकाप्रमाणे त्याची वाट बघत असू. काला म्हणजे आनंदाचा उत्सवच. आजही, काल्याकडे पाहण्याची माझी नजर, भावना तीच आहे. जीवनात याव्यतिरिक्त देखील अन्य काही असू शकते असा विचार त्यावेळी मनात जणू येतच नसे. सगळ्या रात्री आम्ही देवळाजवळच घालवायचो. खिशात फारतर आठ आणे किंवा एखादा रुपया असे. छोट्या छोट्या दुकानांत फिरत असायचो. चावीची विमाने, मोटारी तिथे विक्रीसाठी असत. मला विमान घेण्याची इच्छा होई. त्यावेळी विमानाला ३ रुपये पडत. एवढे पैसे कोण देणार होतं ? काल्याच्या निमित्ताने म्हणून एखादा रुपया हातावर पडायचा. काला संपेपर्यंत तो रुपया पुरला पाहिजे. एकुण काय तर, काल्याच्या उत्सवात विमान खरेदी करायचे

मात्र राहूनच गेले.

वर्षे सरली. बालपण कुठल्या कुठे विरून गेले ते कळलेच नाही. ते पुन्हा मिळाले असते तर आज एखाद्या मॉलमध्ये जाऊन चावीचे ते विमान मी विकत घेतले असते.

माणसाचे भवितव्य आधीच ठरल्यानुसार घडत असते. गणित हा माझा अत्यंत नावडता विषय. नववीपर्यंत तर या विषयात मी उत्तीर्णच झालो नाही. बालमित्र बभ्रुवानच्या प्रयत्नांमुळे दहावीच्या वर्गाचे दार माझ्यासाठी उघडले आणि म्हणुनच, आजही, तो दिसला तरी माझी पावले आपसूक थांबतात. आपल्या आयुष्यात जे-जे घडते ते भल्यासाठीच घडते असे भारताचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ अब्दुल कलाम यांनी एके ठिकाणी लिहून ठेवले आहे. मीदेखील अशा गोष्टींकडे सकारात्मक दृष्टीकोनातूनच पाहतो. एक वर्ष नापास झालो आणि माझ्या आयुष्यात मला उदय म्हांब्रे हा मित्र लाभला. माझ्या काळजातल्या कवितेच्या बियाण्याला त्यानेच खतपाणी घातले. तो भेटला आणि जणू आयुष्यच पालटून गेले. आज स्नेहा आणि समिधा या माझ्या दोन्ही मुली त्याच्याकडे आणि त्याच्या कुटुंबाकडे ज्या आदराने पाहतात ते पाहिल्यावर खरोखरीच मला आनंद होतो. माझ्या आईला मी 'बाय' म्हणत असे. तिलाही उदयबद्दल माया वाटे. त्या काळात माझे मित्र सर्व प्रकारचे होते. दारू पिणारे, जुगार खेळणारे, उनाडक्या करणारे. सगळ्यांना माझी चिंता वाटे. पण त्यांनी चिंता करून काय होणार होते ? कारण माझ्यासाठी तर तेच जीवन सुंदर होते. माझ्या आईला माझ्यापेक्षा चांगले लिहिता-वाचता येई. आईला इंग्रजी वाचताना पाहून तर मी आश्चर्याने थक्क होई. आज दहावी उत्तीर्ण झालेल्या भल्याभल्यांनाही धड वाचता येत नाही. बभ्रुवान आणि उदय हे अभ्यासू वृत्तीचे असल्याचे आईला वाटे. म्हणुनच की काय, ''संगत धरावी तर अशाच मुलांची'' असा उपदेश ती मला वारंवार करी. तिच्या ह्या उपदेशाचा मला खूप फायदा झाला आणि हळुहळू उनाड मुलांच्या संगतीतून मी दूर जाऊ लागलो.

कालांतराने सर्वांच्याच दिशा, वाटा वेगळ्या होत गेल्या. बी. ए. चे शिक्षण पूर्ण करून मी पत्रकार झालो. आयुष्याचा एक वेगळा टप्पा सुरू झाला पण घर आणि गाव सोडून अन्य ठिकाणी जाण्याची इच्छा झालीच नाही. आपल्याला काय वाटते किंवा नाही याला काहीही अर्थ नसतो. परिस्थितीला वाटताच सगळे आपसूक घडते. मग त्यामागचे निमित्त काहीही असो.

कुटुंबासह जड अंत:करणाने मी पणजीत आल्तिनला रहायला गेलो तेव्हा कितीतरी महिने मी अस्वस्थच होतो. स्वभावातही चिडचिडेपणा येऊ लागला होता. घर, घरातील माणसे आणि गाव सोडून आपण दूर कोठेतरी वास्तव्याला आलो आहोत ही कल्पनाच मला बोचत होती. परंतु, काळ हे प्रत्येक गोष्टीवरचे औषध असते हे मात्र खरे. हळुहळू शहरातल्या त्या फ्लॅटमधल्या जीवनशैलीशी मी जुळवून घेऊ लागलो. माझी मुलगी स्नेहा शहरातल्याच शाळेत शिकू लागली. तिला चांगली शाळा लाभली याचे मात्र अपार समाधान वाटते.

'बाय' हयात असेपर्यंत, घर पुन्हा पुन्हा जणू मला साद घालीत होते. काही ना काही निमित्त करून मी घरी जाई आणि ताजातवाना होऊन परतत असे. मनाला एक वेगळाच आराम लाभे, मन हलके होई. संवेदनशील माणसाला हे एवढेच पुरेसे असते. आता घरात भाऊ, भावजय, पुतण्या सगळे आहेत. 'बाय' मात्र नाही ! घराला घरपण नाही. जुने जिवंतपण नाही. घरी जाताना वाटेवरला पारिजातक आणि इतर फुलझाडे, घराच्या भिंती, कौले, घरातल्या सामानाने भरलेल्या खोल्या मला पाहून आनंदाने न्हाऊन निघतात, गतस्मृतींच्या आठवणी गाऊ लागतात. ती ऐकत असता घर आणि गाव मला भूतकाळात फेरफटका मारून आणतात. बालपणी ज्या शाळेत मी शिकलो, वाढलो, खेळलो त्या शाळेत सगळ्या सवंगड्यांना मी शोधत राहतो. बाजारात गोट्या खेळणारे, पत्त्यांचे डाव मांडणारे, दिवसभर कॅरमवर वेळ घालवणारे, क्रिकेट खेळणारे,

सप्ताहाच्या वेळी लपंडाव खेळणारे, तळीतल्या जलक्रीडा करणारे यांना माझ्या नजरा शोधत राहतात. पण आठवणींशिवाय दुसरे काहीच हाती लागत नाही. आता सगळा गावच बदललाय, माणसे बदललीत. बाकी आहेत त्या फक्त आठवणी. त्याच मला वारंवार गावाकडे येण्यासाठी साद घालतायत. आणि फक्त तेवढ्याचसाठी आजही मी पुन्हा पुन्हा जातो, गावाकडे . . .

□

खुबे

मूळ लेखक : संजीव वेरेंकार

खुब्यांचे नाव उच्चारता क्षणीच माझ्या तोंडाला पाणी सुटते. खुबे म्हणजे शिंपल्याच्या आकारातील मासे. माझा गाव सावईवेरे. मांडवी नदीच्या कडेवर वसलेला. माड, पोफळ्या, कुळागरे, डोंगर आणि नदी. पलीकडे लोहखनिज मातीच्या राशी. शेजारच्या वळवई, बेतकी, उसगाव परिसरातल्या नदीत काळे खुबे सापडत. पावसात मात्र ते मिळत नसत. कोकणीत ''खुबे पडणे'' (म्हणजे खुबे सापडणे) असा शब्दप्रयोग आढळतो. खुबे पडणे म्हणजे खुबे काही आकाशातून नदीत पडतात असे नव्हे. प्रत्येक भाषेत काही गोष्टींचे, वस्तूंचे, पदार्थांचे वर्णन करणारे काही विशिष्ट वाक्प्रचार, शब्दप्रयोग आढळतात. ज्या-ज्या वर्षी खुबे खूप मिळत त्या वर्षी यंदा खुबे खूप पडले अशा आशयाची वाक्ये वडिलधाऱ्यांच्या तोंडी ऐकू येत. आंबे, काजू यांचेही वर्णन करताना अशाच तऱ्हेची वाक्ये वापरायची पद्धत. उदाहरण द्यायचे झाल्यास, ''यंदा काजू खूप लागला'' किंवा ''यंदा आंबा खूप चवरला'' अशी वाक्ये सर्रास वापरलेली दिसतात. ही वाक्ये ऐकल्यावर, काजूचे वा आंब्याचे एकच झाड आहे की काय, असा प्रश्न आजच्या पिढीला कदाचित पडेल. खुब्यांच्या बाबतीतही तसेच.

खुब्यांपासून वेगवेगळे पदार्थ करतात. शेवग्याच्या शेंगा घातलेले खुब्यांचे हुमण, मसाला घालून केलेल्या शिपया, तोंडी लावायचे कालवांचे पदार्थ, डांगर असे कितीतरी. आमच्या भागात मिळत ते काळ खुबे. पांढरे खुबे अनेक ठिकाणी सापडत. आजही मिळतात. पण सावईवेरेच्या काळ्या खुब्यांच्या चवीची सर अन्य खुठल्याच खुब्यांना नाही. या गोष्टीचा आमच्या परिसरातील लोकांना

अमाप अभिमान होता. आजच्या काळात एखादा पाहुणे घरी आल्यास 'चिकन'चा बेत केला जातो. त्या काळात मात्र क्वचित, सहा महिन्यांतून एकदा 'शागोती' (कोंबडीच्या मांसापासून तयार केलेला पदार्थ) खायला मिळायची. देवाला कोंबड्याचा बळी दिलेला असला तरच 'शागोती' खायला मिळायची. त्या काळात पाहुणे आले असता खुब्यांचा बेत केला जाई. पाहुण्यांसाठी खुबे करणे म्हणजे जणू पक्वान्नच करून वाढणे. बऱ्याचदा, येणारा पाहुणा देखील खुबे खायला मिळतील या आशेनेच येत असे. ''खुबे मिळतात ना?'' असे पाहुणे विचारत. एवढेच नव्हे, तर, नातलागांकडे जातानादेखील खुबे घेऊन जायची पद्धत होती. भेट म्हणून सुद्धा खुबेच दिले जात. एखादे वेळेस खुबे न घेता गेल्यास नातलगच विचारीत, ''खुबे का नाही आणलेत?'' आज एकमेकांच्या घरी जाताना शेव, चिवडा, बिस्किट, फळे असे जिन्नस घेऊन जातात. त्या काळी मात्र लोक खुबेच घेऊन जात असत. नातलग शहरी भागातला असल्यास, घरातील बायकांना खुब्यांचे शिंपले बहुतेकदा काढता येत नसत. अशावेळी खुब्यांचा एखादा पदार्थच करून घेऊन जावा लागे. तिसऱ्यांचे (तिसऱ्या म्हणजे शिंपले असलेले मासे) शिंपले काढणे तुलनेने सोपे. तिसऱ्यांची तोंडे काहीशी उघडलेली असतात. खुब्यांची तोंडे घट्ट असतात. त्यामुळे खुब्यांचे शिंपले काढणे कठीण. त्यासाठी एक वेगळे कौशल्य असावे लागते. ग्रामीण बायकांजवळ ते कौशल्य असे. ग्रामीण भागातील एखादी मुलगी लग्न करून शहरात गेलेली असल्यास त्यांच्या घरात ही अडचण येत नसे.

'खुबे' म्हणजे 'शॅल फिश'. ते जास्त प्रमाणात खाल्ल्यास कॉलेस्ट्रॉल खूप वाढते असे म्हणतात. हृदयविकाराचा झटका येण्याचेही एक कारण. त्यामुळे आता खुबे खायची भीती वाटते. त्या काळात मात्र आमचे लोक नेहमीच खुबे खात असत. परंतु, त्यामुळे कोणताही विकार वा मृत्यू झाल्याचे आमच्या ऐकिवात कधीच आले

नाही. यामागे आमचे अज्ञानही असू शकते म्हणा. ते काहीही असो, काही घरांत शेवग्याची सुकवलेली फुले खुब्यांच्या पदार्थांत घालत. या फुलांमुळे भाजीला वेगळाच स्वाद येत असे, ती अधिकच चमचमीत होई. या फुलांचीदेखील भाजी केली जाते. खुब्यांत घालण्यासाठी ही फुले खास वाळवून ठेवली जात असत. शेवग्याची फुले खातात ही गोष्ट आजच्या पीढीला ठाऊक आहे का नाही देव जाणे. माझ्या मुलांना तरी हे ठाऊक नाही. त्यांनी कधी खाल्लेलीच नाहीत. शेवग्याच्या फुलांमुळे खुबे रुचकर लागत म्हणून त्या काळी आम्ही मुलेच सकाळी-सकाळी शेवग्याच्या मुळात जाऊन फुले गोळा करत असू. आजही माझ्या स्मरणात त्या खुब्यांचा वास आणि जिभेवर त्याची चव आहे. खुबे आणि त्याचे तोंडी लावायचे आम्ही मिटक्या मारून खूप खाल्ले आहे.

खुबे खाऊन झाल्यावर त्याचे शिंपले टाकण्यासाठी मागीलदारी एक खास कोनाडा राखून ठेवलेला असे. त्या ठिकाणी शिंपल्यांची रास तयार होई. रास खूप मोठी झाल्यावर त्याची विक्री केली जाई. आठ आण्याला एक 'बुट्टी' या दराने विक्री होई. बुट्टी म्हणजे एका ठराविक आकाराची एक टोपली. त्या शिंपल्या नेण्यासाठी गिऱ्हाईकच दारी येई. या शिंपल्यांचा चुना केला जात असे. चुन्याला किंमत चांगली मिळे. पान खाण्यासाठी या चुन्याचा वापर केला जाई. पानाला लावायचा चुना खुब्यांपासून बनवलेला असतो याचा विचार, मासे न खाणारे देखील करत नसत. खुबे किंवा तिसऱ्या खूप खाल्ल्यावर शिंपल्या कुठे टाकाव्या असा प्रश्न फ्लॅटमध्ये राहणाऱ्यांसमोर उभा राहतो. गावात ही अडचण नसे. सावईवऱ्याला, माझ्या गावात खुबे खाण्याचा आनंद मी बालपणी लुटला.

आता आमच्या भागात खुबे खूपच दुर्मिळ झालेत. जरी मिळाले तरी देखील पुर्वीप्रमाणे ते खाता आले नसते. नव्या सुनांना त्यांचे शिंपले काढणे कळत नाही. म्हणूनच चुकून कधी बाजारात खुबे दिसले तरी खुब्यांच्या टोपलीच्या दिशेने पाय वळत नाहीत. जीभ मात्र

वळवळत राहते. जुने दिवस आठवू लागतात. मुंबईहून आमची मावशी येई तेव्हा सगळ्यात आधी खुबे आणायला सांगायची. वांग्याच्या फोडी घालून चमचमीत खुबे खायची तिला लहर येई. जेवणाआधीच तिला ते हवे असत. तिच्यासोबत मीही खुबे खात असे. माझी आई विळीवर बसून खुब्यांचे शिंपले काढताना ते पाहण्यात मोठी गंमत असे. खुब्यांसाठी म्हणून एक वेगळी विळी असे. कधी एकदा ते खुबे चुलीवरून खाली काढू असे होई. तोंडाला पाणी सुटे. आजही ते वर्णन लिहिताना माझ्या तोंडाला पाणी सुटते आहे.

तोंडातल्या त्या लाळीबरोबरच, त्या काळातल्या प्रेमळ, आपुलकी असलेल्या वडिलधाऱ्यांच्या आठवणीने देखील डोळ्यांतून आसवे गळू लागतात. सावईवेरे गावतील खुब्यांप्रमाणेच आपुलकीची ती माणसेही आज दुर्मिळ झालीत. खुबे खायला येणारे ते नातलगही आता राहिले नाहीत. काळ किती वेगाने बदलला ते कळलेच नाही. काळाप्रमाणे आमची खाद्यसंस्कृती देखील बदलली. आजच्या मुलांसाठी या सर्व गोष्टी म्हणजे जणू एखाद्या कहाणीगत झाल्यात. या बाबतीत मी कधीकधी खूप 'नॉस्टॅल्जिक' होतो. भूतकाळातल्या आठवणींच्या लाटांवर तरंगू लागतो. त्यातून आनंद मिळवण्याचा प्रयत्न करतो. दुधाची तहान ताकावर भागवण्यासारखाच प्रकार म्हणा. जरा हायसे वाटते. स्वत:च्या वेदनेवर मी स्वत:च फुंकर घालण्याचा प्रयत्न करतो.

खुबे खाणे हे जरी आमचे काम असले तरी काही कुटुंबे मात्र नदीतून खुबे काढण्याचा पारंपरिक व्यवसाय करत. 'खुबेकर' अशीच गावात त्यांची ओळख होती. होडी घेऊन खुबेकर समुद्रात जात असत. काठीला बांधलेली एक जाळी असे. 'खुबेकर' होडीवर उभा राहत असे. काठीला बांधलेली जाळी समुद्राच्या पाण्यात घुसवायची, जोर लावून खुबे काढायचे आणि होडीत ओतायचे. खुबे काढताना ते पाहण्याची खूप उमेद आम्हाला असायची. मुंबईहून पाहुणे आल्यास

आम्ही त्यांना नदीच्या तीरावर घेऊन जाऊन, खुबे कसे काढतात ते दाखवायचो. आताच्या भाषेत सांगायचे तर खुबे काढायची जागा म्हणजे एक पर्यटन केंद्रच होते. मुंबईकरांना त्या गोष्टीचे भारी अप्रुप. खुब्यांसोबत दगड, रेती, चिखल हे देखील वर येई. काठावर बसून मग 'खुबेकर' त्यातून खुबे वेचून काढत असे. काहीवेळा खुबे वेचण्यासाठी होडीतच एखादा कुणी असे. खुबे वेचून झाल्यावर ते विक्रीसाठी बाजारात आणले जात. लोक वाट बघत. या व्यवसायावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह चाले. मोठ्या आकाराचे खुबे रुपयाला पन्नास या दराने तर, एक पड (मोजमापाचे एक जुने प्रमाण) खुबे चार आण्याला मिळत असत. आता चार आणे चलनातच नाहीत त्यामुळे चार आणे म्हणजे काय हेदेखील आजच्या मुलांना ठाऊक नाही. हळुहळू या खुब्यांचे दर वाढत गेले पण म्हणून खुबे खायचे कुणी कमी केले नाही. जिभेला मसाला तिखट लागला तरी लोक खात असत. काही 'खुबेकर' गोणपाट भरून फोंडा आणि बाणस्तारीला आठवड्याच्या बाजारात खुबे विकत असत. सावईवेऱ्याचे खुबे म्हणून कळताच लोक हातोहात ते विकत घेत असत.

खाण व्यवसायात आधुनिकीकरण आले आणि नदीपात्रातून लोहखनिजाची माती भरून नेणाऱ्या बार्ज बोटींचा सुळसुळात खूप वाढला. खुबे काढणाऱ्या लोकांनाही या बोटींचा अडथळा होऊ लागला. खनिज माती धुणारे प्रकल्प उभे राहिले. अहोरात्र या प्रकल्पांवर काम चालू. त्यामुळे घाणेरडे पाणी, माती नदीच्या पात्रात येऊ लागली. बार्ज बोटीच्या जळक्या तेलाचे थर, तवंग नदीच्या पाण्यावर तरंगू लागले. पाहता-पाहता खुब्यांची चव बदलू लागली. पुर्वीप्रमाणे खुबे रुचकर लागत नाहीत अशा तक्रारी लोक करताना दिसू लागले. माझी आई तर खाताना तोंड वेडेवाकडे करीत असे. हळुहळू खुबे मिळणे कठिण होऊ लागले. किंमती देखील वाढू लागल्या. खुबे घेऊन न गेल्यास नातलग नाराज होऊ लागले. काही काळानंतर खुबे अगदीच दुर्मिळ झाले. आत तर ते मिळेनासेच

झालेत. चुकून कधीतरी सावईवेऱ्याच्या बाजारात कुणीतरी खुबे घेऊन आल्याचे ऐकिवात येते. आताच्या काळात खुबे जरी मिळाले तरी त्यांचे शिंपले काढू शकणारी माणसे मात्र आज नाहीत. 'कॉलेस्ट्रॉल वाढते, व्याधी होतात' या विचारांनी आम्ही तिसऱ्याच खाणे देखील बंद केले आहे. आमच्या मांडवी नदीतील खुबे नाहीसे का झाले हा एक गंभीर प्रश्न आहे. काहींच्या मते बार्ज बोटींच्या जळक्या तेलामुळे खुबे नाहीसे झाले, तर औषधांच्या कारखान्यातून सोडलेले रसायन नदीत मिसळल्यामुळे खुबे मेले असे काहींचे मत आहे. हा खरे म्हणजे संशोधनाचा विषय. कारण काहीही असो, सावईवेऱ्याचे प्रसिद्ध खुबे नाहीसे झाले हे मात्र खरे.

खुबे म्हणजे माझ्या गावच्या संस्कृतीचा एक पैलू. आपुलकीचा धागा विणण्याचे एक अत्यंत प्रभावी माध्यम. माझ्या गावाचे ते वैशिष्ट्य. ते नाहीसे झाले आणि त्यासोबत कितीतरी गोष्टी नाहीशा झाल्या याचे शल्य मला अनेकदा बोचत राहते.

□

कुठे गेली ती प्रेमळ मने ?

मूळ लेखक : संजीव वेरेंकार

नाते... एक संवेदनशील शब्द. श्रावण महिन्याच्या दुसऱ्या रविवारी, नैवेद्यासाठी 'मुठले' करण्याची पद्धत आहे. आधुनिक काळात ही परंपरा लुप्त होत चालली आहे. त्यामुळे, शहरातल्या फ्लॅट संस्कृतीत वाढलेल्या बहुतेक मुलांना, 'मुठले' म्हणजे काय हे माहित असणे कठीण. नारळाचा कीस आणि गुळाचे पुरण करून त्याला बाहेरून पिठाचे आवरण लावायचे. याचा आकार एखाद्या अंड्यासारखा. नात्यांचेही तसेच. नात्यांच्या आवरणात प्रेमभावनेचे पुरण भरलेले असते. बदलत्या, अतिव्यवहारी काळात हे पुरण आटत चालले गेले आणि आज शिल्लक राहिलेय ते फक्त या शब्दाचे आवरण. हल्लीच्या काळात, जे नाही ते नाते असे म्हणत या सुंदर शब्दाची टवाळी उडवण्याचा प्रकार दिसतो. मी मात्र या शब्दाकडे संस्कृती म्हणूनच पाहतो.

आई-वडील, आजी-आजोबा, पणजी-पणजोबा, मुलगा-वडील, भाऊ-बहीण, काका-काकी, मामा-मामी, भाचा-भाची, चुलतभाऊ, मावसभाऊ, आतेभाऊ अशी कित्येक नाती. ही सगळी नाती प्रेमाच्या गुंत्यात गुंफलेली असत. प्रत्येक जण एकमेकांच्या सुखदु:खात समरस होऊन जात असे. कोणीही कोठेही असो. प्रत्येकाला प्रत्येकाच्या कुटुंबियांची काळजी असे. मुद्दाम भेटून असो वा पत्र लिहून, एकमेकांची खुशाली जाणून घेण्याची सुंदर पद्धत होती. अशी माणसे आजही आहेत परंतु पुढारलेला समाज त्यांना गावंढळ लेखतो.

कारणे काहीही का असेनात, एकत्र कुटुंबे विभक्त झाली. त्याचबरोबर अनेक प्रश्नही निर्माण झाले. घरात एखादी वयस्कर,

म्हातारी, वृद्ध व्यक्ती असेल व ती खोकू लागल्यास सुनेला आणि नातवंडांना त्याची लाज वाटू लागते. त्यांना लागलीच वृद्धाश्रमाची गरज भासू लागते. वास्तविक, पूर्णपणे अनाथ लोकांना खऱ्या अर्थाने असल्या आश्रमांची गरज असते. त्यातूनच वृद्धाश्रमाची संकल्पना निर्माण होऊन ते उभे राहिले. परंतु, 'घरातील वृद्ध व्यक्ती म्हणजे अडचण' असे मानून त्यांना वृद्धाश्रमात नेऊन ठेवणे असा विचार मनात येणे म्हणजेच पाप आहे. वृद्धाश्रम संस्कृती आल्यामुळे नातवंडांना आजी, आजोबा, नाती यांचे महत्त्व कळेनासे झाले आहे. सूख म्हणजे काय? सूख नेमके कशात असते? तेच आम्हाला कळेनासे झालेय. अती सूख भोगण्याच्या डोहाळ्यांमुळे स्वार्थाचा धागा अधिक मजबूत झाला आणि नात्यांची वीण झिरझिरीत झाली.

लग्न, मृत्यू अशा बऱ्यावाईट प्रसंगी नात्यांचा खूप उपयोग होई. आपुलकी, प्रेम, कळवळा, नाराजी, जिव्हाळा हे नात्यांचे भावरंग. हे रंग नसल्यास नाते हा फक्त एक शब्दच राहतो. आजच्या काळात नाते हे फक्त नावापुरतेच शिल्लक राहिले आहे. या शब्दातला रंग हळुहळू फिकट होऊ लागला आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या विकासामुळे अनेक चांगल्या गोष्टी झाल्या. त्याचप्रमाणे, नाती दूर जाण्यास कारणीभूत ठरणारी अनेक नवी उपकरणेसुद्धा आली असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. रक्ताच्या नात्याची माणसे देखील 'वॉट्सॲप, फेसबूक' या माध्यमांतून मुक्या माणसाप्रमाणे गरज तेवढेच बोलू लागलीत. त्यात कसल्याच प्रकारचा जिवंतपणा नाही. माणसाला माणसाशी बोलणेच नकोसे झालेय. माझ्या पिढीला याचेच दुःख वाटते परंतु नव्या पिढीला ते समजतच नाही. म्हणूनच त्यांच्यावर विशेष परिणाम देखील होत नाही.

माझ्या बालपणी मासे भारी रुचकर लागत. त्या चवीची जाणीव आजच्या पिढीतल्या मुलांना मुळीच नाही. जन्माला आल्यापासून त्यांनी प्रदूषित समुद्रातलेच मासे खाल्ले आहेत. त्यामुळे, त्यांच्या जिभेवर ती रूच नाहीच मुळी. माशांची चव अशीच असते

की काय असेच त्यांना वाटते. नात्यांचेही असेच. आम्ही नाती पाहिली, अनुभवली आहेत. नात्यांच्या प्रेमरसात न्हाऊन आम्ही लहानाचे मोठे झालो आहोत. त्यामुळेच आजच्या काळातील निर्जीव आणि पूर्णपणे संवेदनारहित अशी ही शोभेची नाती पाहून माझ्यासारख्या व्यक्तीला प्रचंड दु:ख होते.

घरात लग्नकार्य असता, ते जुळवण्यापासून लग्न सोहळा पार पडेपर्यंत नात्यातील सगळीच माणसे त्यात गुंतून जात असत. प्रत्येकाला विश्वासात घेऊनच निर्णय घेतले जात. बोलणी होत. एकमेकांविषयीच्या आपलेपणातून रुसवे-फुगवे देखील घडत. परंतु, हे सगळे प्रेमातून घडत असे. हे सगळे मतभेद तेवढ्यापुरतेच असत. घरातील कार्याचा रथ ओढण्यासाठी सगळेच प्रेमाने काम करीत. आजही, लग्नकार्याच्या प्रसंगी लोकांची-नातेवाईकांची गर्दी असते परंतु त्यात प्रेम असतेच असे नाही. तिथे असतो तो फक्त एक सोपस्कार, एक उपचार, देखावा आणि ओठांवर कृत्रिम स्मित. लग्नासाठी कपडे खरेदी करताना सर्वांसाठीच खरेदी केली जात असे. लग्न जमवण्यापासून ते लग्नसोहळा पूर्ण होईपर्यंत घरच्या सर्वांसाठी लग्न हा एक चैतन्यसोहळा असे. आता तर, अनेकदा लग्नाची तारीख फोनवरूनच कळवली जाते. होणारी सून वा होणारा जावई यांचे तपशील लग्नाची पत्रिका वाचल्यावरच कळतात. त्यामुळे अशा सोहळ्यांतील जिवंतपणाच हरवून गेलाय. लग्नातील जेवणावळींचेही कंत्राट दिलेले असते. जुन्या काळी लग्नघरातच जेवण तयार केले जाई. नात्याची सगळीच माणसे त्यासाठी वावरत. आजच्या काळात चुलीवर भांडे चढतच नाही त्यामुळे उतरवण्यासाठी देखील माणसांची गरज पडत नाही. लग्नातल्या जेवणावळींच्या पद्धतीमुळे का होईना, काही कारणामुळे पातळ झालेले, नात्यांचे बंध पुन्हा एकदा घट्ट होत असत. आपलेपणाच्या गाठी घट्ट करण्याची ही सुंदर माध्यमे होती. तीच नाहीशी झाली आणि माणूस माणसापासून दुरावला. जुन्या काळी घरातील कुणीही निधन पावल्यास, घरातील जवळच्या

नात्याची माणसे, मग ती कितीही दूर राहणारी असेनात का, बाराही दिवस घरातच राहत. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. स्मशानात सरण पेटण्याआधीच माणसे निघून जातात आणि त्या भयाण दिवसाची रात्र, घरातील एखाद् दुसऱ्या माणसालाच घालवावी लागते हे केवढे दुर्दैव ? त्यावेळी रक्ताच्या नात्यांपेक्षा शेजाऱ्यांचे नाते अधिक जवळचे वाटू लागते. फ्लॅटमध्ये राहणाऱ्यांना असले शेजारीच नसतात. हल्ली ''सांत्वनपर भेटीसाठी येऊ नये'' अशा आशयाच्या जाहिरातीही दैनिकांतून दिल्या जातात. काही दिवसांपूर्वी आमच्या एका नातेवाईकाचा मृत्यू झाला. अंत्यसंस्काराच्या तासभर आधी मला बातमी कळली. त्याला कोणता आजार झाला होता हेही त्याच दिवशी कळाले. विचारपूस केल्यावर, ''आम्ही कुणाला कळूच दिले नव्हते'' असे मला सांगण्यात आले. मनाला खूप वाईट वाटले. भविष्यात, कुणीही मरण पावल्यास, कदाचित थेट पालिकेलाच कळवण्यात येईल. पालिकेचे कर्मचारी घरी येऊन मृतदेह घेऊन जातीलही. कुणाचे कुणाकडे येणे-जाणे राहिलेच नाही म्हटल्यावर, कुणाला कुणाची खबरबातही कळणार नाही.

एके दिवशी, माझ्या एका मित्राच्या जवळच्या नातलगाचे निधन झाले. बातमी कळताच तो आणि त्याची बायको सांत्वनासाठी गेली. दारातच, घरातील मोलकरणीने विचारले, ''तुम्ही नक्की कुणाला भेटायला आला आहात?'' वास्तविक, त्यांना घरातील सर्वांनाच भेटायचे होते. त्यांच्यावर मोठा पेचप्रसंग ओढवला. त्यांनी म्हटले, ''आम्हाला घरातील वृद्ध बाईला भेटायचे आहे.'' त्यासरशी ती मोलकरीण त्यांना घरातील वृद्धेजवळ घेऊन गेली. घरातील अन्य सर्व माणसे आपापल्या खोल्यांत, नेहमीप्रमाणे वावरत होती. कुणीही बाहेर आले नाही. माझा मित्र आणि त्याची बायको घरातील वृद्धेला भेटून घराबाहेर पडली. करपलेल्या भावनांचा दुर्गंध घेऊन. हा वृत्तांत माझ्या मित्राने मला सांगितला तेव्हा, काही क्षणांसाठी माझ्या मेंदूने आपल्या क्रियाच जणू बंद केल्या. मन सुन्न झाले. अशा कितीतरी

अनुभवांमुळे, माझी घुसमट होत आहे. माणूस नावाच्या यंत्राबरोबर जगणेच मला असह्य वाटू लागले आहे. नव्या पिढीच्या शब्दकोषातून 'नाते' हा शब्दच नाहीसा होईल की काय अशी भीती आता मला वाटू लागली आहे.

एके दिवशी सहज, बोलता-बोलता माझा भाऊ म्हणाला, ''आजकालची मॉडर्न मुले नाती वगैरे फारशी मानत नाहीत रे. त्यांना जी व्यक्ती जवळची वाटते, त्यांच्याचजवळ ती जातात.'' त्याचे हे वाक्य ऐकून मी विचारात पडलो. माणसाच्या जन्माची आणि वाढीची प्रक्रिया, आजही, जुन्यासारखीच आहे. जन्माला येताच मुले रडू लागतात, रांगू लागतात, उभी राहतात, बोलू लागतात, शिकून मोठी होतात. संसार करतात आणि एके दिवशी मरून जातात. मनुष्यकुळीच्या उत्पत्तीपासून, माणूस याच प्रक्रियेतून चालत आलेला आहे, तर मग 'मॉडर्न' म्हणजे नेमके काय हेच मला कळेनासे झाले आहे. माझीही मुले अशीच होतील की काय याची मला भीती वाटू लागली आहे. या असल्या विषयांवर, मी माझ्या मुलांशी जेव्हा बोलतो तेव्हा माझी मुलगी मला म्हणते, ''बाबा, मी काही तेवढी बिघडली नाहीये.'' तिचे हे शब्द ऐकून माझ्या मनाला काहीसा दिलासा मिळतो.

दसरा, दिवाळी, जत्रा, पाडवा हे आमच्या संस्कृतीतील उत्सव. वेगवेगळ्या परिसरात वेगवेगळ्या नावांनी हे उत्सव साजरे केले जातात. त्यांचे रूप वेगवेगळे असले तरी त्यांचा हेतू मात्र एकच असतो. माणसाला माणसाशी जोडण्याचा. पूर्वजांनी त्याचसाठी असल्या उत्सवांची रचना केली होती. आजच्या काळात, असले उत्सव साजरे करणाऱ्यांना 'गावंढळ' म्हटले जाते. या उत्सवांच्या निमित्ताने, घराबाहेर असणारी माणसे घरी येत असत. नोकरी, शिक्षण, व्यवसाय यांमुळे वेळ मिळत नाही, अशा सबबी देत मूळ घरी येणे हळुहळू बंद होत चालले आहे. गोव्यात, गणेश चतुर्थी हा सगळ्यात मोठा सण. जुन्या काळी, गावाबाहेर राहणारे लोक या

सणांच्या निमित्ताने आपल्या मूळ घरी येत, पाच-पाच दिवस राहत.

आजही येतात. आज बहुतेकांकडे गाड्याही आहेत. फ्लॅटमध्ये चोरी होऊ शकते असे भीतीचे निमित्त करून, देवासमोरील वाती जळून संपायच्या आत, बरेच जण गाड्या घेऊन शहरातल्या आपल्या फ्लॅटकडे निघूनही जातात. वास्तविक, खरे कारण काही वेगळेच असते. बायका-मुलांना फ्लॅटमध्ये जाऊन 'एसी' लावून झोपायचे असते, शॉवरखाली वा टबमध्ये आंघोळ करायची असते. गावाकडील आपल्या जुन्या घरात त्यांना झोपच लागत नाही.

खूप लोक असलेल्या घरात राहणे मला आवडते, आनंद मिळतो. नव्या बायका-मुलांना त्या यातना वाटतात. ह्यामुळेच चतुर्थीसारख्या सणावेळीदेखील, माणसे दोन दिवससुद्धा घरात राहीनाशी झालीत. नात्यांचा रंग फिकट होण्यामागे हेही एक कारण आहे. आम्हीच आमच्या सोयीसाठी ही कारणे निर्माण केली आहेत. हे सण-उत्सव देखील, जो मूळ घरी राहतो त्याच्यापुरत्याच मर्यादित राहू लागल्या आहेत. मीही फ्लॅटमध्ये राहतो. पौर्णिमा, अष्टमी, शिवरात्र कधी येऊन जाते, मलाही कळत नाही. मीदेखील ह्याच परिस्थितीचा बळी आहे. वास्तविकपणे सण-उत्सव म्हणजे नाती समृद्ध करण्याची आणि घट्ट टिकवून ठेवण्याची सुंदर माध्यमें. आम्ही तीसुद्धा दुर्बळ करून टाकली आणि नाती पातळ झाली.

बदलत्या काळात भौतिक विकास मोठ्या प्रमाणात झाला परंतु मानसिक विकासाचे काय? व्यवहार आणि स्वार्थाच्या राक्षसाने माणसातील माणुसकीच गिळून टाकली. नात्यांची राखरांगोळी केली. संवेदनाशून्य बेधुंद माणूस यंत्रागत घणघणू लागला. असे का बरे घडले असावे? कुठे गेली ती जुनी, प्रेमळ माणसे आणि त्यांची ती मने?

☐

सायकल

मूळ लेखक : संजीव वेरेंकार

आज माझे वय ५५ वर्षे आहे. एका प्रकारे वृद्धापकाळाच्या उंबरठ्यावर मी उभा आहे. माणूस वयाने कितीही वाढला तरीही त्याला वेगवेगळ्या प्रसंगी आपले बालपण आठवतेच. तसे होणेही स्वाभाविकच आहे म्हणा. त्याला 'नॉस्टाल्जिया' म्हणतात. माणूस त्यातून आनंद घेतो. दु:खातही मनाचे समाधान करून घेतो. अती 'नॉस्टाल्जिक' होणे माणसाच्या विकासाच्या दृष्टीने वाईटच. बालपण हे निरागस असते. त्याला कपट कळत नाही. घरातील तसेच बाहेरच्या लोकांनी आपणावर प्रेम करावे असे त्याला वाटते. परिस्थितीचा अंदाजही असत नाही. ओरडल्यास रडावे आणि हसवल्यास हसावे. मुलांचे मन कधीही दुखावले जाऊ नये असे मला वाटते. बालपणी मुलांना कुठलीही वस्तू हवीहवीशी वाटते. त्या वस्तूचे सूख वा आनंद उपभोगता न आल्यास त्यांच्या मनावर त्याचा खूप परिणाम होतो. मुलांना सर्व गोष्टी आपल्या वडिलधाऱ्यांकडूनच मिळणे शक्य असते असे नाही. ज्यांना शक्य असते तेसुद्धा मुलांच्या मनाचा विचार करतातच असे नाही. ''असल्या वस्तू स्वत: कमवायला लागल्यावरच घ्यायच्या असतात'' असले तत्वज्ञान सांगून ती माणसे मोकळी होतात. स्वत: कमावता झाल्यावर मात्र तो वयाने लहान राहत नाही, तो मोठा होतो. ती वस्तू त्यावेळी त्याला नकोशी झालेली असते. परंतु बालपणी ती वस्तू न मिळाल्याचे शल्य, त्याची खंत मात्र कायमची मनात असते.

माझ्याही बाबतीत असेच घडले. लुटुलुटू पॅडल मारीत सायकल चालवणारी मुले दिसताक्षणी, मी क्षणार्धात भूतकाळात जाऊन पोहोचतो. माझ्या बालपणाची आठवण मला होते. बालपणी

मला सायकल खूप आवडायची. आधी तीनचाकी आणि मग दोनचाकी. परंतु त्यापैकी कुठलीच, मला कधीच मिळाली नाही.

बालपणी गणेश चतुर्थीच्या दिवसांत गणपतीच्या आरत्यांना आम्ही बहुतेक मित्र सरदेसाईंच्या घरी जायचो. त्यांचे घर राजांगण पद्धतीचे. त्यांचे नातू त्या राजांगणाभोवती लुटुलुटू पॅडल मारत सायकल चालवत असत. ते पाहून मलाही सायकल हवीहवीशी वाटे. त्याकाळी तीनचाकी सायकलला किती पैसे पडत असत ते काही ठाऊक नाही. पण ती सायकल पाहताच माझ्या मनाला वेगळीच हुरहुर लागे. मला ती सायकल कितीही हवीहवीशी वाटली तरीही आम्ही ती विकत घेऊ शकत नाही या गोष्टीची कल्पना त्या बालवयातही मला होतीच. सावईवेरेच्या श्री अनंताच्या काल्यात (काला म्हणजे जत्रा) एक रुपयाचे खेळण्यातले विमानसुद्धा कुणी घेऊन देत नसे, तर ही सायकल कोण घेऊन देणार होते ? आजकाल मात्र कोणाही मुलाचे आई-वडील वा इतर कुणी नातलग वाढदिवस किंवा अन्य समारंभाप्रसंगी अशा सायकली भेट देतात. आज मात्र त्यात अप्रूप असे काहीच राहिलेले नाही. ज्यांना अगदीच गरीब म्हणता येईल अशा लोकांच्या घरांतदेखील तीनचाकी सायकल मुलांना आणून दिलेली दिसते. त्या बाबतीत आजची मुले नशीबवान.

तो काळ मात्र काही वेगळाच होता. बालपण सरले आणि तीनचाकी सायकलचा ध्यास मनातून पुसला गेला. मी देखील वयाने मोठा झालो. शाळेत पोचलो तेव्हा दिलीप वळवईकरला चार आणे भाडे देऊन दोनचाकी सायकल मी शिकून घेतली. हाताशी दहा-पंधरा पैसे साठले की दिलीपची सायकल घेऊन वेऱ्याहून चढ काढत, धापा टाकत, मी वळवईला जात असे आणि कामतांच्या दुकानावर जाऊन, दहा पैसे देऊन फ्रिजमधला सोडा पीत असे. त्यावेळी सहसा कुणाजवळ फ्रीज नसत. पैसेवाल्यांकडेही नाही. खास कामतांच्या दुकानावर जाऊन सोडा पिण्यासाठी म्हणूनच मी सायकल घेऊन वळवईला जात असे. 'च्युवंक' असा आवाज करत बूच उघडलेल्या

त्या बाटलीतला सोडा पिण्यात जो आनंद त्यावेळी मिळे तो आनंद आजच्या कुठल्याच पेयात नाही. हळुहळू सायकलची आवड वाढत गेली. मी साधारणपणे आठवी-नववीत असतानाची गोष्ट.

दत्तगुरू देऊलकर नावाचा माझा एक मित्र होता. तो मूळचा डिचोलीचा. पण तो सावईवेऱ्याला, धुप्यातल्या उत्कर्ष विद्यालयात शिकत असे. अभ्यासात फार हुशार नसला तरी खेळात मात्र अगदी पटाईत. सायकलपटू. डिचोलीच्या आपल्या मित्रांसोबत तो बंगळूर, म्हैसूर या ठिकाणी सायकल भ्रमण त्याने केले होते. त्या काळात सायकलवरून एवढ्या लांब प्रवास करणे म्हणजे मोठे जिकीरीचे आणि धाडसाचे मानले जाई. मलाही सायकल घेऊन असले धाडस करावेसे वाटले. परंतु त्यासाठी सायकल चालवण्याचा सराव आवश्यक असतो. पायांना व्यायाम होणे गरजेचे असते. सराव करायचा तर स्वत:ची सायकल हवी. परंतु माझ्याकडे स्वत:ची सायकल नव्हती.

त्या काळात 'रायली' आणि 'आर्मी' कंपनीच्या सायकली मिळायच्या. सायकलला त्याकाळी सुमारे अडीजशे रुपये पडत. त्यासाठी पैसे कोणी दिले असते? घरची परिस्थिती बेताचीच. त्या काळात माझा भाऊ 'कुवेट'ला नोकरी करत होता. खूप विचार आणि धाडस करून त्याला पत्र लिहिले. ''कोणालाही काहीही आयते मिळता कामा नये'' असे त्याचे मत होते. मला हे ठाऊक नव्हते. माझे बालमन ते. असले तत्त्वज्ञान काही ठिकाणी लागू पडते तर काही ठिकाणी नाही. काही गोष्टी दूर झटकण्यासाठी काही लोक आपल्या सोयीप्रमाणे असल्या तत्त्वांचा आधार घेतात. भावाने काही सायकल घेण्यासाठी मला पैसे पाठवले नाहीत. नवी सायकल घेईन, ती घेऊन धुप्यातल्या शाळेत जाईन, सरावासाठी माशेल किंवा फोंड्याला जाईन अशी अनेक स्वप्ने मी रंगवली होती. ती सर्व कुठल्या कुठे भंगली, खूप वाईट वाटले. सायकल-भ्रमण करण्याचे स्वप्न कोणत्याही परिस्थितीत भंग पावू देणार नाही असा निर्धार त्याच क्षणी

मनातल्या मनात केला. दिलीप वळवईकरकडे सायकलसाठी शब्द टाकला. मी वयाने लहान होतो तरीही त्याने माझ्यावर विश्वास ठेवला. सायकल देण्याचे वचन दिले.

माझा उत्साह वाढला. भाड्याचे काय ते नंतर पाहू असेही त्याने सांगितले. माझ्या तळमळीची पुरेपूर जाणीव असल्याने एवढ्या दूर जाण्यासाठी सायकल मला देण्याचे त्याने मान्य केले. आजही जेव्हा त्याची आठवण येते तेव्हा मला त्याचे कौतुक वाटते. दत्तगुरु आणि नागेश शेट वेरेकर या त्यावेळच्या दोन मित्रांना तयार केले. नववीची परीक्षा नुकतीच उत्तीर्ण झालो होतो. गाठीशी तीही उमेद होती. गोवा ते बिजापूर असे भ्रमण निश्चित केले. पणजीला 'सायकल असोसिएशन' होते. आज ते आहे की नाही कोणास ठाऊक. 'माधवाश्रम'चे माधव धोंड असोसिएशनचे अध्यक्ष होते. त्यांचे प्रमाणपत्र असल्यास लायन्स, रोटरी, जेसी अशा संस्था यासारख्या उपक्रमांना सहकार्य करतात असे अनेकांनी सांगितले होते. एखाद्या सरकारी नोकरीसाठी जसे मंत्र्यांच्या घराचे उंबरठे झिजवावे लागतात तशा खेपा त्यावेळी पणजीला माधवाश्रमात मी मारल्या. प्रमाणपत्राच्या आशेने दुपारच्या वेळी न जेवता बसून राहिलो. प्रमाणपत्र द्यायला ते एवढा उशीर का करत होते हे मात्र मला कळत नसे.

माधवरावानी मला एखाद्या दिवशी संध्याकाळी यायला सांगितले. मी दुसऱ्याच दिवशी संध्याकाळी पणजीला गेलो. त्याकाळी पणजीहून सावईवेऱ्याला येणारी शेवटची बस साडे सहा वाजता असे. ती चुकली तर माशेलपर्यंतच जाणे शक्य होत असे. तिथून पुढे सहा-सात रुपये देऊन भाड्याच्या मोटरसायकलने जायचे, अन्यथा चालत जाण्यावाचून दुसरा पर्याय नसे. माधवाश्रमात बसल्या ठिकाणी एकीकडे घड्याळाचे काटे धावत होते तर दुसरीकडे बस सुटेल म्हणून मनातली धडधड वाढत होती. कोणत्याही परिस्थितीत प्रमाणपत्र तर हवेच होते म्हणून संयम बाळगावा लागत होता. रात्र

झाली तसे माधवराव येऊन म्हणाले, ''असोसिएशनचे सचिव मोहन देशप्रभू उद्या येणार आहेत.'' हे ऐकून मी अगदी हताश झालो. ते म्हणाले, ''आता जेऊनच जा.'' परंतु 'फुकट की पैसे देऊन' हे मात्र मला कळेना. खूप विचार केला. समजा पैसे द्यावे लागले तर ? खानावळीत जेवणाला किती पैसे पडतात याचीही मला अजिबात कल्पना नव्हती. जेवण झाल्यावर जर पैसे मागितले तर ? या विचाराने मी जेवण न करताच निघण्याचा निर्णय घेतला. बस-स्टॅण्डवर आलो आणि माशेलला जाणारी बस पकडली. माशेलला पोचलो तर सगळीकडे काळोख.

आज रस्त्यावर विजेचे दिवे आहेत मात्र त्यावेळी तसे ते नव्हते. काळोखात मी चालत राहिलो. रात्री दहाच्या सुमारास मी सावईवेऱ्याला पोचलो. दुसऱ्या दिवशी सकाळी, मातीत गाडून ठेवलेला, पैसे साठवण्याचा मातीचा गोळा फोडला. तीन-चार रुपये घेऊन पुन्हा पणजीला गेलो. मोहन देशप्रभू नावाची व्यक्ती माधवाश्रमात आली. ते मला घेऊन कुठेतरी गेले. कुठे ते नीटसे आठवत नाही. चार ओळींचे एक प्रमाणपत्र हातात दिले. गगन ठेंगणे झाल्याचा आनंद मला झाला. दत्तगुरु आणि नागेशला ते दाखवले. त्यांचाही उत्साह वाढला.

या प्रमाणपत्राच्या आधाराने लायन्स, रोटरी आणि जेसीसारख्या संस्थांची पत्रे मिळविली आणि देणग्या गोळा करण्याची धावपळ सुरू केली. त्या काळच्या देणग्या म्हणजे आजच्यासारख्या हजारोंच्या घरात नव्हे. एकुण साडेआठशे रुपये जमा करून आम्ही तिघेही अनमोडमार्गे बिजापूरला जायला निघालो. ते दोघेही सायकल चालवण्यात पटाईत. त्यांच्याजवळ त्यांच्या स्वत:च्या सायकली होत्या. माझी सायकल भाडेपट्टीवर आणलेली होती. दिलीप वळवईकरची चार नंबर 'रायली' सायकल. सायकल वाटेत पंक्चर झाल्यास ते काढता यावे यासाठी तेही साहित्य सोबत घेतले. आम्ही सायकली घेऊन निघालो त्यादिवशी सावईवेऱ्याला 'मदनंत क्रिकेट

क्लब'चे स्नेहसंमेलन होते.

''आमच्या क्लबचे सदस्य सायकल भ्रमणासाठी बाहेर पडलेत'' असे मोठ्या अभिमानाने त्यादिवशी मंडळींनी जाहीर केले म्हणे. एरव्ही आम्हाला कसलीही मदत त्यांनी केलेली नव्हती. प्रमाणपत्र द्यायलाही त्यांनी कुरकुर केली होती. ती गोष्ट माझ्या मनाला खूप लागली. तेव्हापासून मी क्लबशी काही प्रमाणात फारकत घेतली. नंतरच्या काळात मी क्लबपासून अगदीच दूर कधी गेलो ते आता आठवतही नाही. आता गावच्या नवतरुणांनी या क्लबला नवी उभारी आणली आहे. त्यांना यातले काहीही ठाऊक नसेल. माझे लिखाण वाचल्यास कदाचित त्यांना हसू येईल.

सात दिवसांची सायकल भ्रमंती करून आम्ही गोव्यात परतलो. दोडामार्गच्या वाटेने आम्ही डिचोलीला आलो. दिलीपची सायकल परत दिली. सुमारे वीस रुपये भाडे त्याने घेतले. माझ्या भरवशावर त्याने आपली सायकल मला दिली हेच माझ्यासाठी खूप होते. वाटेत खूप अनुभव आले. बरे-वाईट सगळेच. ते लिहून काढू न शकल्याची खंत तर आहेच. परंतु एक धाडसी भ्रमण केल्याचे समाधान आजही मनाला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्या भ्रमंतीनंतर कधीच सायकल चालवावीशी वाटली नाही. आजतागायत मी सायकल चालवलेली नाही. पण माझ्या मुलांना मात्र, त्यांनी न मागता, मी सायकल घेऊन दिली. बालपणी माझ्या उमेदीच्या काळात मला सायकल मिळाली नाही याचे दु:ख माझ्या मनात कायम राहील. आज माझ्याजवळ गाडी आहे, तरीही ते शल्य मात्र सरत नाही एवढे खरे.

□

व्यवस्था आणि अवस्था

मूळ लेखक : संजीव वेरेंकार

हल्लीच्या काळात जिथे जावे तिथे गर्दीच गर्दी असते आणि त्यामुळे रांगेत उभे रहावे लागते. सरकारी कार्यालये, देवळे, इगर्जी, मशिदी, सर्वत्र. रांगेत उभे राहिल्याने सगळी कामे शिस्तीत होतात हे मात्र खरे. रांगेत उभे राहण्याचा सल्ला आपण भले दुसऱ्याला देत असू परंतु रांगेत उभे राहणे मात्र कोणत्याही व्यक्तीला व्यक्तिश: आवडत नाही हेही तेवढेच खरे. कोणत्याही ठिकाणी रांगेत उभे राहण्याचा प्रसंग आल्यास माझ्या कपाळाला आठ्या पडतात. कोणत्याही दुकानात सामान आणायला गेलो असता, रांगेत ताटकळत उभे राहणे मला अजिबात आवडत नाही. जीवनातील अन्य सर्व बाबतींत मी खूप संयमी आहे. माझ्या या संयमी स्वभावाचे सर्वांनाच भारी अप्रुप. वय वाढते तसे काहीजणांचा संयम कमी होतो जातो. माझ्या बाबतीत मात्र नेमके उलटे आहे. परंतु रांगेत उभे राहण्याची सहनशक्ती मात्र माझ्यात नाही. रांगेत उभे रहावे लागेल म्हणून मी कितीतरी गोष्टींना नकार देतो आणि स्वत:चे नुकसानही करून घेतो. शिर्डी, तिरुपती, महाकालेश्वर अशा मंदिरांत देवदर्शनासाठी तासंतास रांगेत उभे रहावे लागते हे ऐकल्यापासून अशा देवळांत जाणेच मी टाळत असे. अशा टिकाणी जाण्याचा प्रसंग कशाप्रकारे टाळता येईल याचाच विचार मी करत असतो. औषधांच्या दुकानात देखील गर्दीत तळमळावे लागते परंतु आरोग्याचा प्रश्न असल्याने त्यावेळी ते सहन करावे लागते. देवदर्शनासाठी रांगेत उभा राहिलो असता, मंदिराबाहेर काढून ठेवलेली चप्पल कोणी चोरून नेईल की काय याचीच भीती मला अधिक असते. देवदर्शनापेक्षा चपलेवरच आपले लक्ष अधिक असते. अनेक तास रांगेत उभे राहिल्यावर जेव्हा आपण देवाच्या मूर्तीसमोर पोचतो त्यावेळी तिथे उभा असलेला शिपाई आपल्याला एक

क्षणभरदेखील निवांत दर्शन घेऊ देत नाही. ''चला, चला'' असे म्हणत तो आपल्यावर खेकसतो आणि मग तिथेच, देवळात जाण्याच्या आपल्या भावनेला सुरुंग लागतो. मोठमोठ्या देवळांत, तिथल्या सुरक्षा रक्षकांचाच माज अधिक असतो.

मुळात, देवाच्या रक्षणासाठी सुरक्षा रक्षकांची गरजच काय ? याचा विचार अनेकदा मी करतो. मला हा प्रकारच असह्य. म्हणुनच रांगेत उभे राहून देवदर्शन घेणे मी टाळतो. परंतु, स्त्रियांना देवदर्शनाचे भारी वेड. माझ्या पत्नीने, शिर्डीला जाण्याचा प्रस्ताव माझ्यापुढे ठेवला. तास-तास रांगेत उभे रहावे लागेल या कल्पनेने माझे अवसान गळाले. पैसे भरून किंवा वशिल्याने दर्शन सोपेपणी लाभते असे मी ऐकले होते. माझ्या एका पत्रकार मित्राकडे हा विचार मी बोलून दाखवला. अमुक एका माणसाशी संपर्क केल्यास, रांगेत उभे रहावे न लागता, तुला दर्शन मिळेल असे त्याने मला सांगितले. ते ऐकून मला हायसे वाटले. मी त्या व्यक्तीशी संपर्क साधला. देवदर्शनाचीच नव्हे तर राहण्याचीही व्यवस्था करतो असे आश्वासन मला त्याने दिले. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन असेच काहीसे झाले.

मला हॉटेल व्यवस्थेची कसलीही चिंता नाही. हजार-दोन हजार रुपये खर्चून हॉटेलात राहण्याची माझी तयारी. रांगेत उभे राहण्याचे संकट आता नाही याचाच मला आनंद झाला. माझ्या एका मित्रानेही आपल्या कुटुंबासह आमच्यासोबत शिर्डीला येण्याची तयारी केली. कुठल्याही दूरच्या प्रवासाला जाताना कुणीतरी आपल्यासोबत असणे यात एक वेगळाच आनंद असतो आणि प्रवासातले अडथळे दूर करण्यासाठीही त्याची खूप मदत होते.

गोव्याहून शिर्डीला जाण्यासाठी तशा खूप रेल्वेगाड्या नाहीत. गोवा एक्सप्रेस ही रेल्वेगाडी महाराष्ट्रातल्या कोपरगाव या खेड्यातून जाते. कोपरगाव हे तसे लहानसे स्थानक. तिथे या गाडीचा थांबा असतो. या स्थानकाहून १३ -१५ किलोमिटर अंतरावर शिर्डी. या स्थानकावर उतरताच, लहानमोठ्या रिक्षा-टॅक्सी मिळतात. आमची

शिर्डीतील व्यवस्था कशी काय केली आहे त्याबद्दल, कोपरगावला पोहोचेपर्यंत, एस.एस.एस.च्या माध्यमातून कळवितो असे त्या ओळखीच्या व्यक्तीने मला सांगितले होते. व्यवस्थेच्या बाबतीत मनात धाकधुक होतीच. असल्या बाबतीत, मी सहसा कोणावरही पूर्णपणे अवलंबून राहत नाही. कधीकधी माणसे विसरतात आणि त्यामुळे अडचणी निर्माण होऊ शकतात या शक्यतेसाठी माझे मन तयार असते. अडचण होईल या भीतीने, मी नेहमीच पर्यायांचा विचार करत असतो. त्यामुळेच माझ्या बायका-मुलांना माझा स्वभाव काहीसा गोंधळी वाटतो परंतु त्यामुळे अनेक अडचणी कमी होतात हे मात्र खरे.

सकाळी सव्वानऊ वाजता रेल्वेगाडी कोपरगावला पोचली. त्याच क्षणी माझ्या ओळखीच्या त्या माणसाचा एस.एम.एम. आला. हॉटेलचे नाव सन अॅण्ड सॅण्ड. ट्रॅक्टरसारखी दिसणारी एक भलीमोठी रिक्षा मिळाली. दोन्ही कुटुंबे मावतील अशी ती रिक्षा शिर्डीच्या मार्गावर धावू लागली. शिर्डीला पोचताच आम्ही दोघेही खिडकीतून डोके बाहेर काढून हॉटेलांची नावे वाचू लागलो. आम्हाला सांगितलेल्या हॉटेलचे नाव काही केल्या दिसेना त्यासरशी आमची भीती वाढत गेली. या भागात हॉटेल्स तशी खूप आहेत हे पाहिल्यावर आमची चिंता काहीशी कमी झालीच होती. आमची रिक्षा एका आडवाटेतून आत शिरली आणि एका भव्यदिव्य हॉटेलासमोर उभी राहिली. आम्हाला काही आत जाण्याचे धाडस होईना. तिथले सुरक्षा रक्षक आम्हाला पाहू लागले आणि आम्हीही काहीसे गांगरलो. काय करावे कळेना. माझ्यासोबत आलेला माझा मित्र एका तारांकित हॉटेलात नोकरीला होता. तो म्हणाला, ''हे तर पंचतारांकित हॉटेल आहे. आपली राहण्याची व्यवस्था या हॉटेलात केलेली असणे शक्यच नाही.'' मी माझ्या त्या ओळखीच्या माणसाला फोन केला. तो म्हणाला, ''याच हॉटेलात तुमची व्यवस्था केलेली आहे.'' बहुधा, पर्यटकांना घेऊन असली रिक्षा प्रथमच त्या हॉटेलात आलेली

असावी. या हॉटेलात रहायला येणारे सर्वजण आलिशान गाड्यांतूनच येत असावेत. तेथील सुरक्षा रक्षक आम्हाला आत जाऊ देईनात. माझ्या हृदयाची धडधड वाढू लागली. मी विनंती केल्यावर त्यांनी मला स्वागत कक्षात जाण्याची परवानगी दिली. आत जाऊन चौकशी केली, तेव्हा, आमच्या नावाने खोल्या आरक्षित केल्या आहेत अशी माहिती मिळाली. परंतु, एवढे पैसे होते कुठे ? तारांकित हॉटेलच्या दोन खोल्यांचे भाडे एवढे होते, की तेवढ्या पैशांत आम्हा मंडळींचा आठ दिवसांचा प्रवास झाला असता. त्या हॉटेलात राहण्याचे धाडस आम्हाला काही केल्या होईना. खोलीभाड्याचे पैसे किती होतील याची विचारणा मी करताच, खोलीचे पैसे त्या ओळखीच्या माणसाने आधीच भरले आहेत असे मला सांगण्यात आले.

माझ्या जिवात जीव आला. मी माझ्या ओळखीच्या माणसाला फोन लावला आणि विचारले तसा तो म्हणाला, ''पैशांची चिंता करू नका. तुम्ही रहा, एन्जॉय करा. सगळी व्यवस्था केलेली आहे.'' दुपार होत आली होती. मुलांची उत्सुकता शिगेला पोचत चालली होती. कानात वारे शिरताच वासरे जशी नाचू लागतात तशी, स्विमिंग पूल पाहून, माझी आणि माझ्या मित्राची मुले नाचू लागली. बालपण रम्य असते असे म्हणतात ते याचसाठी. हॉटेल दिसताच मुलांना भूक लागली. रेस्टॉरंटमध्ये जाऊन 'मेन्यू' पाहिला. हॉटेलचे भाडे जरी भरले गेलेले असले तरी अशा ठिकाणची जेवणे प्रचंड महाग. पुढील प्रवासच रद्द करावा लागला असता. खोली सोडताना हातात बिल आले तर ? तारांकित हॉटेलात रहायचे आणि जेवणासाठी बाहेर जायचे हेही योग्य नव्हते. विचारांची गाडी धावतच होती. माझ्या मित्रावरही तसाच बाका प्रसंग आलेला होता. आकाशातून थेट जमनीवर पडणे एकवेळ बरे परंतु, ''आसमान से टपके और खजूर में अटके'' असे झाल्यावर ज्या वेदना होतात त्या अवर्णनीयच. तारांकित हॉटेल्स तशी माझ्यासाठी नवी नाहीत. पत्रकारितेच्या व्यवसायामुळे अशा हॉटेलातली ऊठबस माझ्यासाठी

सवयीचीच आहे. परंतु, त्यावेळी खिशात हात घालण्याचा प्रश्नही येत नाही आणि चिंताही असत नाही. आत्ताचा प्रसंग मात्र वेगळा होता. इथे मी एक सामान्य पर्यटक होतो. फार तर दोन हजार रुपये खर्च करून हॉटेलात राहणारा.

कोणताही पदार्थ खावासा वाटल्यास त्याचा दर विचारूनच खरेदी करणाऱ्या संस्कृतीतून मी आलेलो आहे. अंथरुण पाहून पाय पसरावेत ही आमच्या पूर्वजांची शिकवण. या शिकवणीचा आयुष्यात नेहमीच उपयोग झाला आहे. मनातील धाकधुकीसह, मुलांच्या आवडीचे पदार्थ मागवले. शहरातील माझ्या नेहमीच्या हॉटेलात भाजी-पावसाठी जेवढे पैसे पडतात त्या तुलनेत इथली पाण्याची बाटलीही महाग. आम्ही आमची तहान कशीबशी भागवली. काही काळ विश्रांती घेतली. दर्शनासाठी घेऊन जायला बाहेर गाडी आली आहे असा निरोप आला. हे सर्व कसे काय घडत होते कुणास ठाऊक. आम्ही लगबगीने बाहेर पडलो, गाडीत बसलो. गाडी घेऊन आलेला माणूस आम्हाला मागीलदारातून देवळात घेऊन गेला. साईबाबांचे दर्शन घडले आणि माझ्या बायकोला समाधान वाटले. बाहेर पाहतो तर दर्शनासाठी लोकांची प्रचंड गर्दी. या रांगेत उभा राहिलो असतो तर काय झाले असते या कल्पनेनेच मी हादरलो.

साईबाबांचे दर्शन झाल्यावर सभोवतालच्या परिसरात मी फेरफटका मारला. साध्या हॉटेलात जाऊन भूक भागवली. आल्या गाडीतून हॉटेलात परतलो. तीन्हीसांज झाली. मुले हॉटेलातील सुखसोयींचा उपभोग घेत होती. रात्री पुन्हा एकदा जेवणाचे संकट समोर आले. शक्य त्या काटकसरीचा विचार करून जेवण घेतले. तारांकित हॉटेल म्हटल्यावर खोलीत ड्रायफ्रूट्स-बदाम-काजू-जरदाळू अशा सगळ्याच सुखसोयी. मुलांनी त्यावर यथेच्छ ताव मारला. दुसऱ्या दिवशी महाबळेश्वरला जाण्याचा बेत होता. खोलीत सगळ्या प्रकारची सुखे होती, मात्र मला ती कडूच लागत होती. मानसिक स्वास्थ्य उत्तम असेल तरच या सुखांची गोडी. उद्या सकाळी

निघताना किती रुपयांचे बिल हातात पडेल याची मला चिंता लागून राहिली होती. निजल्या ठिकाणी मला आणि माझ्या मित्राला काटे बोचत होते. तारांकित हॉटेलातील ही सुखे माझ्यासाठी दुःख बनत चालली होती. रात्र सरता सरेना. सर्वजण आरामात झोपले. कसाबसा दुसरा दिवस उजाडला. न्याहारी केली. असल्या हॉटेलात राहणाऱ्यांसाठी सकाळच्या वेळी ब्रेकफास्ट ची व्यवस्था असते. त्याचेही शुल्क खोलीभाड्यात समाविष्ट असते याची मला कल्पना होती. म्हणुनच, मुक्तपणे जिव्हेला पुरेपूर स्वातंत्र्य देत ब्रेकफास्ट केला. काही वेळाने हॉटेल सोडण्यासाठी आम्ही स्वागत कक्षाकडे गेलो. सुंदर अशा दोन तरुणी तिथे उभ्या होत्या. आमच्याकडे पाहून त्या गोड हसल्या. जणू जन्मजन्मांतरीची ओळख असल्याप्रमाणे. आम्हीही स्मित केले. त्या तरुणींना स्मितहास्य करण्यासाठीच पगार देतात. घाबरत-घाबरत आम्ही बिलाची चौकशी केली. तेव्हा, ''बिल आधीच भरले गेले आहे''असे आम्हाला सांगण्यात आले. ते ऐकून मनातील धडधड थांबली. मी आणि माझा मित्र हसत-हसत बाहेर पडलो. माझी बायको फिरून-फिरून मला बिलाविषयी विचारू लागली. ''नंतर सांगतो'' असे म्हणत आम्ही महाबळेश्वरला जायला बाहेर पडलो.

महाबळेश्वरच्या प्रवासात मी विचार करीत होतो. . . माझ्या ओळखीच्या त्या माणसाने केलेल्या माझ्या व्यवस्थेचा आणि अवस्थेचाही.

□

सौ. शीला कोळंबकार

जन्म : ११ मार्च १९४५
संपर्क : ९८१९३१५३०७

शिक्षण :
बी. ए. (ऑनर्स) (मुंबई विद्यापीठ), हिंदी पंडित - गोमंतक राष्ट्रभाषा, हिंदी सभा (१९६८)

कार्यानुभव :
शालेय स्तरावर अध्यापन (१९६६-७२), मुंबई/पणजी
आकाशवाणीवरून नियमित साहित्य, नाट्यछटा प्रसारित
तेलगू, मराठी, हिंदी, बंगाली, इंग्रजी, पोर्तुगीज आणि फ्रेंच भाषेतील कथांचे अनुवाद
सदस्य, कोकणी भाषा मंडळ, महाराष्ट्र (२००३-२००७)
सदस्य, कोकणी सल्लागार मंडळ, साहित्य अकादमी, नवी दिल्ली(२००२-२००७)

प्रकाशित साहित्य :
ओली सांज (कथासंग्रह) (कोकणी), १९७३
भुंयचाफी (कथासंग्रह) (कोकणी), १९९४
तेजस आनी ओजस (बालसाहित्य) (कोकणी), १९९६/१९९८
परजळती धोल (बंगाली अनुवाद), १९९६
भांगराचें सुकणें (डोगरी अनुवाद), २००४ पंकज (बालसाहित्य) (कोकणी), २००५
कथाशील (कथासंग्रह) (कोकणी), २००७
कावळ्या काव्या रे (बालसाहित्य) (कोकणी)
गॅर (कथासंग्रह) (कोकणी)

पुरस्कार :

‘ओली सांज’ पुस्तकासाठी ‘गोवा कला अकादमी’ पुरस्कार (१९७५)

१४ व्या अखिल भारतीय कोकणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष (१९९७)

‘भुंयचाफी’ पुस्तकासाठी ‘साहित्य अकादमी’ पुरस्कार (१९९७)

‘भांगराचें सुकणें’ पुस्तकाला ‘साहित्य अकादमी’ (अनुवाद) पुरस्कार

तिसर्याग आंतरराष्ट्रीय मैथिली भाषा संमेलनात ‘मिथिलारत्न’ अतिविशिष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार (२००६)

‘गॅर’ पुस्तकासाठी सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सचा ‘टागोर’ पुरस्कार.

□

गुलमोहर

मूळ लेखिका : शीला कोळंबकार

डोंबिवलीला जयमाला दणायतच्या घरी जातानाची गोष्ट. मे महिन्याचा काळ. दुपारची तीनची वेळ. रणरणीत ऊन. कळवा स्थानक मागे टाकून ट्रेन पुढे निघाली. सहज बाहेर डोकावून पाहिले. एका ओळीत उभी असलेली गुलमोहराची झाडे दृष्टीस पडली. लालभडक फुलांनी भरगच्च बहरलेली. अधुनमधून क्वचित हिरवीगार पाने डोकावत. रतन आबोलीच्या वेणीत झिप्रीची पाने फुले गुंफल्यागत ती दिसत होती. चालत्या ट्रेनमधून पाहताना ही झाडेच जणू धावत असल्याचा भास होई. मला तर वाटले जणू काही ही झाडे नाचत असावीत. जणू काही नाचता नाचता ती लग्नाची गाणी म्हणत असावीत,

''फुले माळून आम्ही लग्नाला जाऊया
मनसोक्त, मनमुरादपणे तेथे नाचूया
नाचताना आम्ही फेर धरुन, गिरक्या घेउया
आणि वरासंगे लगीनघाई फुलवूया
नवरा आहे लुकडा
पण नवरी आहे जाडजूड
नवरानवरी आहेत दोघेही गुटगुटीत
नाच तर दोघांचा अगदी मस्त
नवरीसाठी लुगडीं जांभळी जांभळी
नवरीच्या गाली गुलाबी लाली
कुणबी जातीचा लग्नसोहळा खुललाय
नवऱ्याला पंधरा हजाराचा हुंडा मिळालाय''

(फुलां मावोनू वयतां काजराकू आमी काजराकू,
नाचतेली बोरीं तिङा दांसाकु ।। चे चै।।
दांसाकु नाचतना आमी भोंवरे मारोया
आनी नवऱ्याच बाराबोरू आमी काजार फुलोवया ।।१।।
व्हॊंकलेकु घोव मेळ्ळा तारवोटी बाये तारवोटी
व्हॊंकोल आंगानु आसा जोबोर मोटी
व्हॊंकोल नोवरो आसा दोगांय कार्यी
आनी व्हॊंकोल नोवरो नाचिता दांसाक बोरीं ।।२।।
व्हॊंकलेक कापोड हाडिलां जांबयें जांबयें
व्हॊंकलेन पोल्याकु लायलां तांबडें तांबडें
कुणब्या जातीचें आमचें फुल्लांय काजार
आनी न्होवऱ्याकु दोत मेवल्या पोंधरा हजार ।।३।।)

गुलमोहर माझा सर्वात आवडता वृक्ष. कधीकधी, का कोण जाणे, मी अकारण उदास होऊन जाते. अशा वेळी या वृक्षाला पाहते आणि माझे औदासिन्य कुठल्या कुठे विरून जाते, नाहिसे होते. हे झाड मला नेहमीच आनंद देत आले आहे. मुळात याची ठेवणच नागमोडी वळणाची. साधे, सरळ उभे राहणे जणू त्याला जमतच नाही. ओडिसी नृत्य करणारी एखादी नृत्यांगना साधी सरळ उभी राहताना देखील शरीराला एक प्रकारे बाक देऊन, मान वेळावून उभी राहते त्याचप्रमाणे हा गुलमोहर देखील एखाद्या नृत्यांगनेप्रमाणे उभा असतो. गुलमोहराची पाने अगदी इटुकली, पिटुकली. ह्याच छोट्या छोट्या पानांच्या ओळी मग एक मोठ्ठालं पान तयार करतात असे वाटते. त्यांचा तो रंग. दुरून पाहता हिरवीगार वाटणारी ती पाने, झाडाखाली राहून पाहिल्यावर मात्र पोपटी रंगाची भासतात. गुलमोहराची पाने पाहता क्षणी, का कोण जाणे, मला मोरपिसांची आठवण होते. भव्य आणि विशाल मोरपिसे जणू या झाडाला

चिकटवलेली असावीत असे वाटत राहते.

याच्या छायेत उभे राहून, कधी निळ्या तर कधी शुभ्र आकाशाच्या कॅनव्हासवर रेखाटलेली, गुलमोहराच्या पानांची नक्षी पहायची मला भारी हौस. जेव्हा ही पाने पिकून गडद हिरव्या रंगाची होतात, तेव्हा तर हीच नक्षी, कुणी आकाशावरच जणू मेंदी चितारल्यासारखी मला भासते. हा वृक्ष मनाला किती भुलवतो, किती ओढ लावतो म्हणून सांगू ? तिन्हीसांजेला आकाश गडद काळसर निळे असते. अशा वेळी याची मधली काही पाने मिटलेली तर समोरची काही पाने उघडी असतात. जणू काही एखाद्या चिमण्या बाळाने डोळे किलकिले उघडे ठेवून जणू झोपेचे सोंग घेतले आहे की काय असे वाटत राहते. त्यावेळची ती नक्षी वेगळीच. मध्यान्हकाळी ह्या पानांच्या जाळीतून आभाळ पाहण्याची गोष्टच निराळी. गडद निळ्याशार आकाशाखालून ह्याची पाने मोजावी. पौर्णिमेच्या चांदण्यातला गुलमोहर तर वेगळाच. त्याची पाने झाकलेली. त्यावरून चांदणे जणू निथळत असते. चांदण्यात लखलखणारा गुलमोहर पाहिल्यावर एक अवर्णनीय भावना मनात दाटून येते. असे वाटते, जणू त्याच्या अंगावरून हात फिरवावा. मग तो पानापानातून सळसळून उठेल, रंध्रारंध्रातून फुलेल.

पावसात गुलमोहराचे रूप तर काही औरच. पाऊस बरसत असतो. . . त्या पावसाचा वर्षाव हा गुलमोहर आपल्या अंगावर घेतो. . . ते पाहून वारा चवताळून उठतो. मग हा वाऱ्यासोबत डोलतो. डोलताना त्याची पाने वरखाली होतात. अशा वेळी त्याची पाने कधी पोपटी, कधी हलकी पांढरी तर कधी गडद हिरवी दिसतात. त्यावरून पाण्याचे थेंब पडतात. पाण्याचे हे थेंब खाली पडण्याची वाट पाहत असता, लहानलहान पानांवरून चकाकतात तेव्हा हा वृक्ष थेंबांनी बहरलेला, डवरलेला वाटतो आणि नकळत ओठांवर कवितेच्या ओळी रेंगाळू लागतात,

''रिमझिम रिमझिम पाऊस गळे

पानापानावर थेंबांचे कळे
थेंब्यांचे कळे चांदण्याचे
पाणी माझ्या मायेचे''

पाण्याच्या थेंबांनी भरलेले, गुलमोहराच्या झाडाचे पान गालाला लावताना किती मजा येत असेल नाही ?

शिशिर ऋतू येताच तर आपल्या हा वृक्षाचे रूपच पालटू लागते. ह्याच्या पानांचा रंग बदलू लागतो. एखाद्या प्रौढेच्या काळ्या केसांत मधुनच एखादा पांढरा केस दिसावा त्याप्रमाणे याच्या हिरव्या पानांत एखादे लहानसे पिवळे पान दिसू लागते. पाहता पाहता याची सगळीच पाने पिवळी गळू लागतात आणि गुलमोहर सोनेरी वृक्षागत दिसू लागतो. सोनेरी झाड, गाणारा पक्षी यासारख्या, बालपणी वाचलेल्या गोष्टीतल्या सोनेरी वृक्षाप्रमाणे. अशावेळी या झाडावर बुलबुल पक्षी येऊन बसू लागतात आणि बालपणीच्या गोष्टींचा पुन:प्रत्यय येऊ लागतो.

बघता बघता पिवळी पाने गळून पडतात. काही गळून पडलेली, काही झाडावर अजूनही असलेली. उरलेल्या पानांची आकाशावरची नक्षी पाहण्यासाठी मी त्या वृक्षाच्या सावलीत जाते. तिथे गेल्यावर दिसते, त्या पिवळ्याधमक पानांची झाडाखाली साचलेली रास. काहीशी चुरगळलेली कुरकुरीत पाने. मी चपला हातात घेते. त्या पानांवरून अनवाणी चालू लागते. त्या कुरकुरीत पानांचा नाजुक स्पर्श माझ्या पावलांना होतो. मिटल्या डोळ्यांनी तो स्पर्श मी अनुभवते आणि माझ्या अंगावर आनंदाचे रोमांच उठतात !

आणि मग एके दिवशी, सगळी पाने झडून गेलेला तो वृक्ष नजरेस पडतो. अगदी निष्पर्ण, उघडा. त्या वृक्षाचे शरीरच जणू उघडे होऊन दिसू लागते. तेही सरळ नव्हे. बाकदार. आकाशाच्या कॅनव्हसवर आताची त्याची ही छबी म्हणजे जणू ब्रशने फक्त रेघोट्या मारल्यागत भासते. माझे काळीज पुन्हा उदासीन होते, ओठात गीत दाटून येते, ''विकल मोरा मनवा तुमबिन हाये... ''

गीत गुणगुणत असता संधीप्रकाश होतो. आत तर हा वृक्ष कमालीचा सुंदर दिसू लागतो. गुलमोहराला वसंत ऋतूची चाहूल कशी लागते कोण जाणे. अधुनमधून पाहता कुठेतरी एखाद्या शेंड्यावर एखादी पालवी दिसून येते. हळुहळू अशा पालव्यांतून हा वृक्ष बहरू लागतो. आणि मग एके दिवशी याची एकेक फांदी लाल, केशरी, पिवळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या फुलांनी बहरून जाते. उन्हाची तिरीप जसजशी वाढत जाते तसा त्याचा रंग अधिकच गडद होत जातो. आत मात्र तो आपल्याच धुंदीत. स्वत:मध्येच मग्न. आता त्याला कोणाचीही तमा नाही. माझीही नाही. त्याचे ते सौंदर्य पाहून मलाही वाटू लागते की त्याच्यासारखे विशाल व्हावे, दोन्ही हातांनी त्याला आपल्या कवेत घ्यावे आणि हलकेच आपल्या ओठांचा स्पर्श त्याला करावा, आणि त्याच्या तांबूस रंगाने माझे ओठ रंगवून घ्यावे.

नेहमीप्रमाणे, गुलमोहराच्या फुलांनी आभाळाच्या कॅनव्हासवर रेखाटलेली नक्षी पहायला मी त्याच्या मुळाशी गेले. पाहते तर वृक्षाखाली दीडेक फुटाचे दुसरेच एक झाड होते आणि त्यावर फुलांचा एक गुच्छ डवरला होता. मला वाटले, मोठ्या झाडाच्या फुलांचा शिडकाव कदाचित ह्या छोट्या झाडावर होऊन ती फुले त्यावर पडली असावीत. ती काढायला म्हणून मी गेले तर काय आश्चर्य ! ती फुले वरून पडली नव्हती तर ह्या मोठ्या झाडाखाली एक नवीन झाड उगवले होते आणि ही त्याच झाडाची स्वत:ची फुले होती. मी वृक्षाएवढी मोठी होऊ शकत नव्हते, म्हणूनच की काय ते छोटे झाड फुलांचा बहर घेऊन माझी वाट पाहत होते. . . कधी मी येईन आणि कधी त्याला कवेत घेईन म्हणून ! आणि मग मी त्या मोठ्याल्या वृक्षाच्या मुळासकट त्या झाडालाही मिठी मारली आणि कुणी बघत नाही ना याचा अंदाज घेत हलकेच माझे ओठ त्या फुलांवर टेकवले.

□

छिमकणी

मूळ लेखिका : शीला कोळंबकार

त्याला मी प्रथम पाहिले ते म्हार्दोळला. रवींद्रजींच्या (ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र केळेकार) घराच्या दारात. तिथे उभा होता तो. देखणा, राजबिंडा. त्याला त्या ठिकाणी पाहून मी आश्चर्यचकित झाले. 'आ' वासून, श्वास रोखून व डोळे विस्फारून मी त्याला पाहतच राहिले. त्याला पाहताच त्याच्या प्रेमात पडले.

तीन्हीसांजेची उन्हे त्यावर पडली होती आणि त्याची ती पिवळी पाने खरोखरीच सोन्याची असल्यागत वाटत होती. रवींद्रजींना त्या झाडाचे नाव विचारले. बंगालीत त्याला 'अमलतास' म्हणतात असे त्यांनी सांगितले.

त्या झाडाविषयी अधिक माहिती गोळा केल्यावर असे कळाले की त्या वृक्षाला हिंदीत 'अमलतास' म्हणतात. मराठीत 'बहावा' किंवा 'बोया'. गुजरातीत 'गरमालो'. पंजाबीत 'गिर्दनली'. सिंधीत 'छिमकणी'. बंगालीमध्ये 'सोंदाल'. ओरियात 'संदारी' तर तामिळमध्ये 'कोंड्रे, इराधविरुठ्ठम, कावनी, रासाकोन्नाई'. मल्याळी भाषेत 'कणिकोन्ना' तर तेलगु भाषेत 'आरग्वधमु, सुवर्णम, रीलाचेट्टू'. कानडीत 'कक्के, फलूस' तर आसामी भाषेत 'हीनातु, सोनारी' म्हणतात. कोकणीत त्याला 'बाळो' म्हणतात. इंग्रजीत purging cassia.

एवढ्या सुंदर वृक्षाचे नाव 'बाळो' असे ऐकल्यावर कसेतरीच वाटले. या वृक्षाच्या शेंगा बाळ्याप्रमाणे (बाळो हे एका माशाचे कोकणीतील नाव) दिसतात म्हणून त्याचेही नाव बाळो. शेवटी गोवेकरांची बुद्धी ती ! माशांपर्यंतच धावणारी. एवढ्या सुंदर वृक्षाचे नाव बाळो ?

मला सहज आठवले, मुंबई आकाशवाणीवर एक मुलगी येई. सुंदर, नाजुक, गोड हसणारी, गोड बोलणारी. तिचे आडनाव होते 'वाघ'. मी तिला म्हणाले, ''बाई ग, तू लवकरात लवकर लग्न कर आणि तुझे हे आडनाव बदलून टाक.'' तसेच काहीसे या वृक्षाबद्दल मला वाटले. या वृक्षाचे नाव बदलले पाहिजे.

या वृक्षाचा रंग, कांती आणि त्याचे गूण दर्शविणारा एक श्लोक संस्कृत भाषेत आहे,

''आरग्वधो राजवृक्ष: शम्पाकश्चतुरंगुल:
आरेवतो व्याधीघात: कृतमाल: सुवर्णक:
कर्णिकारो दीर्घफल: स्वर्णांग स्वर्णभूषण:''

'आरग्वधो' म्हणजे सर्व रोगांतून मुक्त करणारा. या झाडाला पिवळ्या फुलांचे गुच्छ लगडतात आणि हे झाड सोन्याचे दागिने घालून उभे राहिल्यासारखे वाटते. म्हणून तो 'राजवृक्ष'. हा वृक्ष औषधी असल्यामुळे वेगवेगळ्या व्याधी आणि विकारांचा नाश होतो. म्हणून त्याचे नाव 'शम्पाक' व 'व्याधीघात'. याच्या पानांमध्ये चार बोटांचे अंतर असते म्हणून तो 'चतुरंगुल'. याच्या शेंगा लांब. त्यातला गर खाल्ल्यास पोट साफ होते. शरिरातील घाण काढून टाकणारा म्हणून तो 'आरेवत'. फुलांचे गुच्छ अंगावर माळतात म्हणून तो 'कृतमाल'. त्याच्या फुलांची तुलना फक्त सोन्याशीच केली जाऊ शकते म्हणून 'सुवर्णक' कानातले घालणारा तो 'कर्णिकार'. त्याच्या अंगावर सोन्याचे दागिने म्हणून तो 'स्वर्णभूषण'. त्याची फळे म्हणजेच लांब शेंगा म्हणून 'दीर्घफल'. त्याची कांती सोनेरी म्हणून तो 'स्वर्णांग'.

एरव्ही पाहता हा वृक्ष अगदीच सामान्य. एप्रिल महिन्यात याला फुले येतात. ही फुले फुलल्यावर याचे रूप अगदीच पालटून जाते. सोनेरी रंगाची फुले. झुंबराप्रमाणे दिसणारी. वरती रुंद तर खाली निमुळत जाणारी. या वृक्षाला फुलांचे घोस बहरल्यावर अगदी सोन्याने मढवलेला, गालातल्या गालात हसणारा, राजबिंडा राजकुमार

असावा तसा हा दिसतो. सोनेरी फुलांत मधुनच काही हिरवी पाने डोकावतात. झाड लहान आकाराचे असेल तर हिरव्या पानांत मध्येच पिवळे झुंबर डोलताना दिसतात.

अधुनमधून वारे वाहू लागते. या फुलांच्या गुच्छांच्या पाकळ्या हळुहळू हलतात. हलताना त्या एकमेकांवर आदळतात आणि मला त्या पाकळ्यांतून होय–नाहीशी, चिमुकल्या घुंगरांची किणकिण ऐकू येते. सिंधी भाषेत या वृक्षाला दिलेले नाव आठवते. 'छिमकणी'. या वृक्षाला हे नाव दिले ज्या कोणा व्यक्तीने दिले असेल ती व्यक्ती किती कल्पक असेल, नाही का ? मी तर या वृक्षाला त्याच्या कोकणी नावाऐवजी छिमकणी हेच नाव दिले आहे. छिमकणी ! छिमकणी !! छिमकणी !!!

ह्या झाडाच्या फुलांचे गुच्छ जमिनीकडे पाहतात. इतर सगळ्या झाडांची फुले आकाशाकडे नजर लावून असतात. यालाच आपल्या मुळाची ओढ का असते कोण जाणे. खरे तर अनेक वर्षांपुर्वी याची फुले पाहिली होती. परंतु त्यावेळी ती लक्षात आली नाहीत. मद्रासी आणि मल्याळी लोक या फुलांना 'विशु–पुअ' म्हणतात.

१४ एप्रिलला मल्याळी लोकांचा 'विशु' असतो. विशु म्हणजेच नवीन वर्ष. या नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी त्यांना ही फुले लागतातच. हे लोक आपल्या नव्या वर्षाची सुरुवात विशिष्ट पद्धतीने करतात. आदल्या रात्री ते देवासमोर एक पाट मांडतात. त्यावर 'गुरुवायुर'ची तसबीर ठेवतात. त्या तसबिरीला सोन्याची माळ घालतात. त्याच्या शेजारी एक आरसा ठेवतात. एका भांड्यात तांदूळ घालून ठेवतात. नारळ फोडून ठेवतात. त्यात पैसे घालतात. आंबा आणि चिबुड यासारखी फळे ठेवतात. फणस ठेवतात. एक कोरा पंचा घडी करून ठेवतात. पिवळी फुले ठेवतात. ही फुले छिमकणीचीच असावी लागतात. या संपूर्ण सजावटीला 'विशुकणी' म्हणतात. या विशुकणीतल्या बहुतेक वस्तू पिवळ्या असतात.

घरातील वडीलधारी मंडळी सर्वप्रथम विशुकणीजवळ दिवा–

समई लावतात. घरातील व्यक्तीला डोळे बंद करून विशुकणीसमोर नेऊन स्वत:चा चेहरा पहायला लावतात आणि प्रथम विशुकणीवर नजर टाकायला लावतात. त्या दिवशी सकाळी उठल्या-उठल्या आपला चेहरा आपण पाहिला तर वर्ष चांगले जाते अशी त्यांची समजुत.

त्या दिवशी एक पिवळा पक्षी येतो. त्याला 'विशुपक्षी' म्हणतात. तो पक्षी 'वित्तुम कायकोट' 'वित्तुम कायकोट' असे गातो अशी त्यांची समजुत. 'वित्तुम कायकोट' म्हणजे ''शेते लावायला सुरुवात करा.'' तो पक्षी दिसला की लोक खरोखरीच शेताची कामे करायला सुरुवात करतात.

हा विशुपक्षी, विशुदिवसाला त्या विशुपुअवर बसून गाऊ लागल्यावर किती सुंदर दिसेल ? वाटेल की जणू ते झाडच गाते आहे की काय ?

छिमकणीचे हे वृक्ष भारतभर आढळते. हिमालय ते कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र हा आढळतो. म्हार्दोळला रविंद्रजींच्या घरासमोरील वृक्ष कोसळून पडला. पणजीत सांतइनेज भागात स्टेट बँकच्या क्वार्टर्समध्ये तो मला दिसला. मुंबईत याची खूप झाडे आहेत. मुलुंडमध्येही आहेत. विक्रोळीला गोदरेज कंपनीच्या आवारात ही झाडे ओळीत उभी असलेली दिसतात. थोडीथोडकी नव्हे, चांगली वीसेक आहेत. सोन्याचे दागिने घातलेले वृक्ष जणू एका ओळीत उभे असलेले किती सुंदर दिसतात म्हणून सांगू ?

पिवळ्या छिमकणीप्रमाणेच पांढऱ्या छिमकणीचेही झाड असते असे म्हणतात. पांढऱ्या छिमकणीचे झाड मुंबईतच जिजामाता उद्यानात असल्याचे वाचले होते. या झाडाची मुळे, पाने, साली, शेंगा; संपूर्ण झाडच औषधी असते असे म्हणतात. या झाडाच्या सालीला 'सुमारी' म्हणतात. या सालीने चामडे रंगवतात. याच्या शेंगातला चिकट गर माकड, कोल्हे, अस्वल वगैरे खातात. बिया आणि पाने वाटून त्याचे सरबत करतात. राजस्थानातल्या आदिवासी

स्त्रिया अंगावरून जाण्याच्या व्याधीवर उपाय म्हणून बियांची पूड वापरतात. याचे लाकूड देखील खूप उपयोगी. फर्निचर, बोटी, बैलगाड्या वगैरे करण्यासाठी त्याचा उपयोग करतात.

गोव्यात गुलमोहराची झाडे तशी खूप आहेत. छिमकणीचीही झाडे तशीच लावली तर किती छान होईल, नाही ?

□

मिकी

मूळ लेखिका : शीला कोळंबकार

शुक्रवारचा दिवस होता. त्या दिवशी तीन्हीसांजेला आमची शेजारी मारयानीन घरी आली होती. तिच्या हातात एक पिटकुले मांजर होते. ती माझ्या आईला म्हणाली, ''काकू, तुम्हाला मांजर हवे होते ना? हे बघा, मी मांजर आणले आहे तुमच्यासाठी.''

आम्ही अभ्यासाला बसलो होतो. आम्ही जाऊन पाहिले, तर ते मांजर आपल्या भिरभिरत्या डोळ्यांनी इकडे-तिकडे पाहत होते. मारयानीन आपल्या घरी निघून गेली. आईने त्या मांजराला उचलून घेतले आणि म्हणाली, ''मी हिला बोका हवा म्हणाले होते, तिने आणून दिलीय मांजरी.'' मी म्हणाले, ''मग तू तिला ती मांजरी नको म्हणून का नाही सांगितलेस?'' आई म्हणाली, ''शुक्रवारी तीन्हीसांजेला घरात आलेले मांजर आल्या पावली असं परत पाठवू नये म्हणून राहू दिले.''

आम्ही त्या मांजराचे नाव ठेवले मिकी ! मिकी अगदी हुशार आणि चुणचुणीत होती. ती आमच्या सोबत खेळायची. जेवढी खेळकर तेवढीच मिजासखोर सुद्धा. ती कधीच जमनीवर बसायची नाही. एकतर खुर्चीवर किंवा खिडकीत चढून बसे. झोपेचेही तसेच. बाबांच्या खाटेवर ती निजे. तेही त्यांच्या उशीवर डोके ठेवून.

मिकी मिजासखोर असली तरी ती इतर मांजरासारखी नव्हती. चुकुनही तिने कधीही चोरून दुधाला तोंड लावले नाही. तळलेले मासे कधीही चोरून खाल्ले नाहीत. तिला रोज सकाळी सात वाजता दूध हवे असे. आई तिला दूध देत असे. एखाद्या वेळेस आई घरी नसल्यास व आम्हाला उठण्यास उशीर झाल्यास मिकी गुर्रगुर्र आवाज करून आम्हाला उठवत असे. तिची बशी चांगली धुवूनच त्यातून तिला दूध

द्यावे लागे. आदल्या रात्रीचे शिळे दूध घातल्यास ती दूध न पिता तशीच चालू लागे. त्यानंतर बटर लावलेला अर्धा पाव किंवा एखादी चपाती ती खाई आणि मग घराच्या व्हरांड्यातल्या खुर्चीवर बसे. कुणीही अनोळखी व्यक्ती घरात शिरताना दिसल्यास गुरगुरून, डोळे वटारून व शेपटी फुगवून ती पाहत राही. घरात येणाऱ्या व्यक्तीला आत येण्याचा धीर होत नसे.

त्यानंतर ती बाहेर जाऊन बसे व थेट दहा-साडे दहाच्या सुमारास, मासे घरात आणताच पुन्हा आत येई. माशांचा वास येताच मिकी अगदी घायकुतीला येऊन आईच्या पायाशी घोटाळत राही. आई मग लगबगीने मासे चिरायला घेई. कधीकधी आईला राग येई आणि ती रागाने मिकीच्या पुढ्यात मासे आपटून म्हणे, ‘‘घे, खा मासे.’’ पण आईने रागाने पुढ्यात आपटलेल्या माशांना मिकी चुकुनही तोंड लावत नसे.

कधीकधी आम्ही आईला म्हणायचो,‘‘आई मिकीच्या पुढ्यात मासे जोरात आपटून टाक ना.’’ आई तसे करी. मात्र मिकीला ते कळत असे आणि मग अशावेळी कोणाचीही तमा न बाळगता ती माशांवर तुटून पडे. मासे साफ करायला घेतले आणि आईला उठावं लागलं तर आई माशांचे भांडे तिथेच ठेवून जात असे. अशावेळी मिकी भांड्यातील मासे खात नसे. उलट, कावळे येऊन मासे पळवून नेतील म्हणून ती भांड्याच्या पुढ्यात बसून राही.

घरात उंदीर खूप झाल्यावर आई तणतणून म्हणायची, ‘‘घरात उंदीर फार झालेत. मिकी घरात आहे पण तिचा काडीमात्र उपयोग नाही. खाऊन खाऊन माजलीय नुसती ! तिचं पोट चांगलं भरतं आहे मग ती कशाला उंदीर मारून कशाला खाईल ! उपाशी ठेवायला हवं तिला.’’

आई असं बोलल्यावर मिकी मग घरभर उंदीर शोधत बसे आणि किमान एक तरी उंदीर मारून आईच्या पुढ्यात आणून टाकी. मग म्यांव म्यांव करत आईच्या पायाशी घोटाळत राही. ते पाहून

आम्ही आईला सांगायचो, ''आई, तू मिकीकडे लक्ष नको देऊस! पाहू तरी काय करते!'' आईदेखील मिकीकडे दुर्लक्ष करत असे आणि मग मिकी त्या मारलेल्या उंदराला घेऊन, आई जिथे जाईल तिथे तिथे तिच्या मागोमाग हिंडत असे. ते पाहून आईला हसू फुटे. ती म्हणे, ''पाहिला बरे तुझा पराक्रम. जा आता आणि खाऊन टाक ती तुझी शिकार.'' आईने असे म्हटल्यावरच मिकी उंदराला घेऊन बाहेर जाई आणि खाऊन फस्त करे.

कधीकधी मिकी दोन-तीन दिवस गायबच होई. मग अचानक घरी परतत असे. रात्रीच्या वेळेस मिकी घरी येई. घराचे दार बंद असल्यास मिकी दारावर नखांनी दरवाजा ओरबाडून आवाज करे. त्यावर आई विचारे, ''कोण आहे?'' त्यावर मिकी आवाज काढून म्यांव करे. आई विचारे, ''मिकी का ग?'' त्यावर ती पुन्हा म्यांव करे. मग आई दार उघडत असे. मिकी हलके पावलांनी आत येऊन गपचुप झोपी जात असे.

मांजरे बेईमान असतात, असे म्हणतात. पण मिकी मात्र त्याला अपवाद. मिकीने चुकुनदेखील आमच्याशी कधी बेईमानी केली नाही. इतर लोकांकडे मात्र ती हमखास तशी वागत असे.

एकदा, मिकी व्हरांड्यात बसली असता एक विदेशी बाई रस्त्यावरून जात होत्या. त्यांना मिकी फारच आवडली. तिने मिकीचे फोटो काढले, केक खाऊ घातला. मिकीने केक फस्त केला. त्या बाईंनी थोडासा धीटपणा दाखवत मिकीच्या डोक्यावरून हात फिरवला. मात्र मिकीने क्षणात पंजा मारलाच.

मिकी ही मांजरी असल्यामुळे ती पिलांना जन्म देईल आणि मग घरात खूप मांजरे होतील या कल्पनेने आई घाबरून जाई. पण मिकी खूप हुशार होती. ती कुत्र्यांनादेखील हुसकावून लावत असे. तिचे ते पराक्रम पाहून लोकांनी मिकीची पिल्ले आग्रहाने मागून नेली आणि आईची चिंता मिटली.

मिकी दहाएक वर्षे जगली. कधीकधी ती घरातून गायब होई.

मग दोन–तीन दिवसांनी घराकडे परतत असे. परंतु एके दिवशी मिकी घरातून निघून गेली ती पुन्हा कधी दिसलीच नाही. ती कुठे गेली हेदेखील शेवटपर्यंत कळले नाही. मग कुणीतरी म्हणाले, ''मुकी जनावरे खूप हुशार असतात. माणसांनी त्यांना माया लावली तर तीदेखील माणसांवर तेवढेच प्रेम करतात. जनावरांना आपल्या मृत्यूची चाहूल लागते. आपल्या माणसांना आपल्या मृत्यूचे दुःख होऊ नये म्हणून ती दूर जाऊन मरतात.''

–आणि मग उरतात त्या फक्त त्यांच्या आठवणी.

□

कारवार : एक अनुभव

मूळ लेखिका : शीला कोळंबकार

माझे सासर कारवार-कोडीबागचे. माझे लग्न मुंबईत झाले. गणेश चतुर्थीच्या निमित्ताने मी पहिल्यावेळी कोडीबागला गेले. त्यावेळेस कोकण रेल्वे नव्हती. कारवारपर्यंतचा प्रवास बसनेच करावा लागे. गोव्यातील बसची तिकिटे मिळाली नाहीत. कर्नाटक एस.टी. बसची तिकिटे मिळाली. कोडीबागला जाताना माझ्या सासुबाई आमच्यासोबत होत्या. कोडीबागच्या अनेकांना देण्यासाठी त्यांनी बऱ्याच वस्तू घेतल्या होत्या. सुमारे दहा-बारा पिशव्या याच सामानाने भरलेल्या होत्या. सर्व सामान बसच्या टापावर चढवले. बस कारवारच्या दिशेने धावू लागली. बसमधील बहुतेक लोक कारवारचे होते. वाटेत बस बंद पडली. दुसरी आली. सर्व पुरूष खाली उतरले आणि त्यांनी सर्व सामान भराभर बसवर चढवले. माझे-तुझे असा भेदभाव तिथे नव्हता. कारवारच्या लोकांचा हा गुण मला खूपच भावला.

दुसऱ्या दिवशी सकाळी बस गुड्डेहळ्ळीला पोचली. मी बाहेर पाहिले. ते दृष्य पाहताच मी कारवारच्या प्रेमातच पडले. कारवार हा एक सुंदर गाव. काळी नदी समुद्रात विलीन होते त्या संगमावर हा गाव वसलेला आहे. आईच्या कुशीत एखादे तान्हे बाळ असावे त्याप्रमाणे समुद्राच्या कुशीत पहुडलेला हा गाव. शेजारीच असलेला हिरवागार डोंगर पित्यासमान जणू या गावाचे रक्षण करतोय असेच वाटते.

इथली घरेही अगदी सुंदर. एका परसात एकच घर. घराभोवती कुंपण. समोर अंगण. अंगणात तुळस. तुळशीभोवती रांगोळी. कुंपणाशेजारी फुलझाडे. पोफळी, माड, आंबा यांच्या जोडीलाच नीरफणसाचे एक झाड. जणू घरादाराची राखण करणारा

रखवालदारच जणू ! दोन-तीन घरांआड एक विहीर. विहिरीशेजारी पिंपळ, वड वा रुमडाचे एक झाड. त्याच्याभोवती बांधलेला पार. पारावर असलेली एक छोटीसी घुमटी. सांजवेळेला त्या घुमटीत लागणारा दिवा. काळोखाला भेदून मंगलमय वातावरण निर्माण करणारा. तीन्हीसांजेला तुळशी वृंदावनासमोर लावलेले निरांजन. त्याचा मंद उजेड. माडाच्या झावळ्यांतून, नीरफणसाच्या पानांतून निथळून जमनीवर आलेले चांदणे. समुद्राची गाज. लाटांच्या जोडीला चमचमणारे चांदणे. कारवारचे हे वातावरण गूढ, रम्य आणि अद्भुत करून सोडत असे. ही गोष्ट ३०-३५ वर्षांपूर्वीची. आता विजेचे दिवे आले. सगळेच बदलले. तरीही, पौर्णिमेच्या रात्री विजेचे दिवे मालवून चांदण्यात भिजलेले कारवार पहावेसे वाटते; सदाशिवगडाच्या माथ्यावर बसून !

१९९७ साली मला साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. त्याची दखल आमच्या ज्ञातीबांधवांनी घेतली. ज्ञातीची वार्षिक पुस्तिका प्रकाशित करतात. त्यात माझे अभिनंदन केले. कारवारहून मुंबईला आलेल्या, दीपक गावकर या व्यक्तीच्या हातात ही पुस्तिका पडली. दीपक गावकर हा एक मनस्वी, कलंदर माणूस. कारवार आणि कोकणी भाषेवर त्याचा भारी जीव. माझे मूळ कारवार आणि मला पुरस्कार मिळालाय या गोष्टींचा त्याला भारी आनंद झाला. माझा पत्ता शोधून तो आमच्या घरी आला. माझे अभिनंदन केले. एवढे करून तरी शांत बसावे की नाही? तो कारवारला जाऊन कोडीबागच्या लोकांना भेटला आणि माझा सत्कार घडवून आणला.

त्यानंतर, दीपक गावकर सभासंमेलनातून दृष्टीस पडे. कोकणी भाषेच्या कार्यक्रमांना हजेरी लावत असे. कोकणी भाषेवरील प्रेम आपल्या कृतीतून त्याने व्यक्त केले. त्याचा एक छापखाना होता. जुन्या काळात छापला गेलेला "ओवळां" हा ललितलेख संग्रह त्याने पुन्हा एकदा छापून आणला. कोणत्याही फायद्याची अपेक्षा न धरता.

फायदा म्हणताच एक आठवले. १९७४ साली माझे पहिले

पुस्तक 'ओली सांज' छापून आले. प्रचंड आनंदाने मी ते घेऊन मुंबईला माझ्या नणंदेच्या घरी गेले. त्यांनी पुस्तक पाहिले आणि विचारले, ''किती पैसे मिळाले?'' मी म्हणाले, ''काहीही नाही.'' त्यावर ती म्हणाली, ''मग पुस्तक छापून फायदा काय?''

मी अगदीच खिन्न झाले. त्यावेळी माझे पती म्हणाले, ''आमच्या लोकांची सवयच ती ! गावातील लोक गरीब. पोटापाण्यासाठी ते मुंबईला येतात. जास्तीत जास्त पैसे कमावून गावी पाठवणे, राहते घर सुधारावे, घरच्या लोकांना सुखी करणे हे त्यांचे ध्येय असते. त्यामुळे प्रत्येक गोष्टीत आपला काय फायदा होईल याचाच विचार ते करत राहतात. तू त्यांच्या वागण्याचे वाईट वाटून घेऊ नकोस.''

परंतु, आज ही परिस्थिती बदलली आहे. १२ जून २०१२ रोजी मला रवीन्द्रनाथ टागोर लिटरेचर पुरस्कार मिळाला. त्यावेळेस कोळंबकार आडनावाच्या एक बाई मला म्हणाल्या, ''तुम्हाला पुरस्कार मिळाल्याचा आम्हाला खूप आनंद झाला हो. कोळंबकारांचे नाव काढलेत तुम्ही!''

कुरुमगडच्या जत्रेला जाण्यासाठी म्हणून मी कारवारला गेले होते. जत्रेच्या आदल्या दिवशी माझ्या सासूचे आणि तिच्या मोठ्या मुलाचे कडाक्याचे भांडण झाले. दुसऱ्या दिवशी बोटने कुरुमगडावर गेलो. त्यावेळी तेथे धक्का बांधला नव्हता. तेथे पोचताच ढोपरभर पाण्यात उडी मारावी लागे. त्यावेळी दिराने आपल्या आईला त्याच्या पाठीवर बसण्यास सांगितले. तीही, उडी मारून त्याच्या पाठीवर बसली. रात्रीच्या भांडणाचा जराही मागमूस तिथे नव्हता. नात्यांतली हीच गुंतागुंत काळजाला स्पर्श करून गेली.

सुरुवातीला कारवारची कोकणी समजायला वेळ लागला. गोव्यात आम्ही ''करपाक जाय, खावपाक जाय, हाडपाक जाय'' असे म्हणतो. कारवारला मात्र ''करच्या जाय, खावच्या जाय, हाडच्या जाय'' असे म्हणतात. पुढे तर हेच शब्द ''करका, खावका,

हाडका'' असे होत जातात. कोकणीच्या क्षेत्रातला हा शब्दांचा खेळ खूपच मौजेचा.

कारवारच्या म्हणी तर मला वेडच लावतात. वास्तविक ह्या म्हणी म्हणजे कोकणी भाषेचा अलंकार. त्या एकत्रित करून साठवून ठेवणे आवश्यक आहे.

एकदा कोडीबागला असता आमच्याकडे एक नवश्रीमंत आला. पायाला माती लागेल म्हणून चप्पल घालूनच तो आत आला. ''मला हे आवडत नाही, ते आवडत नाही'' असेच म्हणत होता. तो गेल्यावर माझी सासू म्हणाली, ''याच मातीत हा लहानाचा मोठा झाला. आता हीच माती याच्या पायाला बोचू लागलीय का? काही दिवसांनंतर याला चांदण्यात फिरण्यासाठीही छत्रीची लागेल कदाचित.'' चांदण्यात छत्री लागणे ही म्हण मला जणू एखाद्या कवितेसारखी वाटली.

हल्ली कारवारमधील परिस्थिती बिघडत चालली आहे. तरूण दारूच्या आहारी गेलेत. रगडा जाऊन 'मिक्सर' आला. विहिरी जाऊन नळ आले. शेतांच्या जागी घरे उभे राहिली. कैगा अणुऊर्जा प्रकल्प आलाय. यामुळे कारवारच्या अस्तित्वालाच तर धोका निर्माण होणार नाही ना ?

कारवारची व्हर्जिन ब्यूटी. देवा, त्याला कोणाची दृष्ट न लागो!

□

लोणचे

मूळ लेखिका : शीला कोळंबकर

''लहान मुले, चालायला शिकण्याआधीच धावणे शिकतात'' असे म्हणतात. त्याचप्रमाणे, मी स्वयंपाक करायला शिकण्याआधीच लोणचे करायला शिकले. एकप्रकारे, लोणचे करायला शिकून, स्वयंपाक शिकण्याचा श्रीगणेशा मी केला.

लोणचे माझ्या आवडीचे. बालपणी, पणजीला बाजारात जाऊन एका आण्याच्या कैऱ्या आणत असू. त्यांचे तुकडे करून, मीठ लावून ठेवत. दुसऱ्या दिवशी त्यात लालभडक मिरच्यांची पूड भरत. आईचा सल्ला घेऊन मेथी, हिंग, मोहरी, हळद घालत असत. मेथी, हिंग हे आधी तेलात तळून काढत. त्यानंतर त्याच तेलात मोहरी आणि हळदीची पूड घालून त्याची फोडणी तयार करत. त्याकाळी काळा हिंग मिळत असे. चार कैऱ्यांसाठी हिंग किती घालू असे विचारल्यावर आई म्हणे, ''माशीच्या डोक्याच्या आकाराएवढा हिंग घाल. दोन आण्यांच्या कैऱ्यासांठी तूरडाळीच्या आकाराएवढा तर चार आण्यांच्या कैऱ्यांसाठी चणाडाळीच्या आकाराएवढा हिंग घाल'' असे आई सांगत असे. अशावेळी माझ्या मनात विचार येई, 'माशीच्या डोक्याएवढा' असे म्हणण्याऐवजी 'मुगाच्या डाळीएवढा हिंग' असे आई का बरे म्हणत नसे ?

अशा तऱ्हेने, कैऱ्यांच्या फोडीचे लोणचे करायला मी शिकले. न पिकलेल्या कैऱ्यांचे लोणचे आई करीत असे. हे लोणचे करण्याचा खटाटोप, व्याप खूप मोठा असे. न पिकलेल्या कैऱ्या आणायच्या. भरली वांगी करताना वांगी चिरतात त्याप्रमाणे कैऱ्या चिराव्यात. त्यात मीठ भरावे. त्यानंतर लोणच्यासाठीचे सारण तयार करावे. दुसऱ्या दिवशी, कैऱ्यांची कोय (बी) काढून टाकावी. साल

कैरीला चिकटून राहणार नाही याची काळजी घ्यावी लागे. ही बी तशीच कैरीला चिकटून राहिली तर लोणचे काळे पडू लागते म्हणून ! त्यानंतर त्या कैऱ्यांत लोणच्याचे सारण भरावे. चीनी मातीच्या बरणीत त्या कैऱ्या जपून, सांभाळून ठेवाव्यात. उरलेले सारण वरून ओतले जाई. शेवटी, तापवून थंड केलेले तेल कैऱ्यांवरून जाईल इतके घालावे. कैऱ्या त्या तेलावर तरंगू नयेत म्हणून त्यावर एक दगड ठेवला जाई. सरतेशेवटी, त्या बरणीला एक पांढरा कपडा बांधून, सर्वांच्या नजरेपासून दूर, ती, माजघरात ठेवून दिली जात असे.

हे लोणचे करताना, कैऱ्यांच्या बिया बाहेर फेकून दिल्या जात. वास्तविक, ह्या बिया हृदयासाठी खूप चांगल्या असतात म्हणे ! आपण आंबा खाऊन त्याची कोय बाहेर फेकून देतो परंतु, लखनौच्या नवाबांचे शाही स्वयंपाकी, त्यापासून 'सुरबुस' मसाल्याची भाजी करत म्हणे. असो !

बरणीत भरून ठेवलेले हे लोणचे श्रावण महिन्यात बाहेर काढले जाई. तोपर्यंत, 'करेल' (लोणच्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आंब्यांची एक खास जात) आंब्याच्या कैऱ्यांचे लोणचे, श्रावण येईपर्यंत वापरले जाई.

आमची आई, लिंबांचेही लोणचे करीत असे. लिंबांच्या फोडी मिठात घालाव्यात, त्यात लिंबांचा रस घालावा, त्यात लोणच्याचा मसाला घालावा आणि वरून तेल ओतावे... एवढ्या उचापती कोण करेल? आणि म्हणून मी अख्ख्या कैऱ्यांचे आणि लिंबांचे लोणचे करीत नसे.

लग्न झाले आणि कोडीबाग-कारवारला पोचले. तेथे, लोणचे करण्याची माझ्या सासूची पद्धत सोपी होती. गंमतीची गोष्ट म्हणजे, तेथे तेल अजिबात घातले जात नसे. माझी सासू लहान आकाराच्या कैऱ्या वापरत असे. त्या कैऱ्या ती दोणात घालून त्यांना मीठ लावून ठेवत असे. 'दोण' म्हणजे लाकडाचे एक पसरट भांडे. पाच-सहा दिवस, कैऱ्या दोणातच ठेवल्या जात. मग त्या कैऱ्यांना पाणी सुटे.

माझी सासू, ते पाणी गरम करून थंड करीत असे. कैऱ्या बरणीत भरत असे. त्यानंतर 'बेडगी' आणि 'संकेश्वरी' मिरच्यांची लालभडक पूड, मोहरीची डाळ आणि त्यात कैऱ्यांचे पाणी घालून ते दगडावर वाटले जाई. अशा पद्धतीने वाटलेले सारण बरणीतल्या कैऱ्यांवर ती ओतत असे. त्यावर कैऱ्यांचे शिल्लक राहिलेले पाणी. झाले लोणचे तयार. त्यात मेथी, हिंग हे काहीही नसे. तरीदेखील हे लोणचेसुद्धा चवीला छान लागत असे.

कारवारला 'आपेमेडी' नावाच्या, खास लोणचे करण्यासाठी वापरावयाच्या कैऱ्या मिळतात. अंगापिंडाने अगदी भरलेल्या, गुटगुटीत. मिठात घातल्या तरी त्यांना सुरकुत्या पडत नाहीत. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, लोणचे तयार करताना मिठागरातील मीठ वापरल्यास लोणच्याची चव वाढते.

मुंबईत, लिंबाचे लोणचे करताना त्यात लिंबाचा रस घालत नाहीत. त्याचबरोबर, तेलही केवळ फोडणीपुरतेच घालतात. पावसाच्या दिवसात लिंबू स्वस्त मिळतात. त्यावेळी लिंबांचे लोणचे केले जाते. लिंबांच्या फोडी करतात. त्यातील बिया काढून टाकतात. ह्या फोडी बरणीत भरल्यावर, त्यावरून मीठ घालतात. त्यावर दोन चमचे साखर. रोज ही बरणी हलवून आतील मिश्रण वर-खाली ढवळतात. लिंबांच्या फोडी मऊ होऊन, त्यांचा रंग बदलेपर्यंत रहावे. त्यात 'तयार' (रेडीमेड) लिंबांच्या लोणच्याचा मसाला घातला, की झाले लिंबांचे लोणचे.

आणखी एक प्रकार हा असा. लिंबाच्या बारीक फोडी कराव्या. त्यातील बिया काढून टाकाव्या. या फोडी 'मिक्सर'मध्ये घालाव्या. त्यात मीठ, साखर, लोणच्याचा मसाला घालून मिश्रण छानपैकी वाटून घ्यावे. सुंदर असे आंबट, गोड, तिखट लोणचे तयार. पोळी (चपाती) सोबत खाण्यास उत्तम. त्याचबरोबर, व्हिटामीन सी वगैरेही शरिराला लाभते. आपल्या देशात वेगवेगळ्या प्रदेशांत तऱ्हेतऱ्हेची लोणची केली जातात.

गुजराती लोक हे खूप मोठे खवय्ये. गुजराती स्त्रिया वेगवेगळ्या तऱ्हेची लोणची करतात. त्यांच्या घरात सात-आठ प्रकारची तरी लोणची असतातच. त्याशिवाय, त्या-त्या मोसमातील खास लोणची वेगळीच. उदाहरणादाखल, गाजराचे, ओली हळद आणि आंबेहळदीचे लोणचे. त्याचप्रमाणे, कच्ची मिरी लिंबाच्या रसात घालून वेगळेच लोणचे तयार करतात.

गुजराती लोक कैऱ्यांचे लोणचे करतात. मुंबईतल्या माझ्या वास्तव्यात या गोष्टीचा मी पुरेपूर अनुभव घेतला आहे. ते लोक 'छुंदा' या नावाचे आंबट-गोड-तिखट लोणचेही करतात. ते माझ्या अगदी आवडीचे. या 'छुंदा'साठीच्या खास कैऱ्या गुजरातहून आणल्या जातात. त्यांना 'लाडवा' म्हणतात. त्यात 'ठसी लाडवा' असाही वेगळा उपप्रकार असतो. या 'ठसी लाडवा'चा 'छुंदा' अधिकच चांगला बनतो. ह्या कैऱ्यांची वरची साल तासून घ्यावी. त्यानंतर किसणीवर या कैऱ्या किसून घ्याव्यात. त्यात मीठ घालून रात्रभर ठेवून द्यावे. दुसऱ्या दिवशी, कैऱ्यांच्या समप्रमाणात साखर घालावी (उदाहरणार्थ, एक किलो कैऱ्यांसाठी एक किलो साखर). स्टीलच्या पातेल्यात हे मिश्रण घालावे. त्यावर पातळ सुती कपडा बांधून उन्हात वाळवण्यासाठी ठेवून द्यावा. रात्री पातेले आत आणावे व पुन्हा दुसऱ्या, दिवशी उन्हात ठेवण्याआधी पातेल्यातील मिश्रण नीट चाळून घ्यावे. हा क्रम आठ दिवस करावा. नवव्या दिवशी त्यात मिरची आणि जिऱ्याची पूड घालावी. शेवटी, हे लोणचे बरणीत भरून ठेवावे. वर्षभर हे लोणचे छान टिकते.

मेथीचेही फार छान लोणचे करतात. मेथी भिजत घालून मुगांप्रमाणे त्याला मोड काढावी. मोड काढलेली मेथी बाटलीत भरावी. त्यावरून वाहून जाईल एवढा लिंबांचा रस त्यात घालावा. मीठ घालावे. दोन चमचे साखर घालावी. हे लोणचे चवीला छान लागते. चौकशी केल्यावर माहिती मिळाली की, जैन गुजराती लोक कैऱ्यांचे तिखट लोणचे करतात. पाण्यात भिजवलेले 'सोनयाळे' चणे

आणि मेथी या लोणच्यात घालतात.

आल्याचे लोणचे मला भारी आवडते. आल्याच्या साली काढून त्याचे तुकडे करावे. त्यावर लिंबू पिळावा. चवीपुरते मीठ घालावे. हिंगाची पूड घालावी. एवढे झाल्यावर छान गुलाबी रंग येतो. हे लोणचे पावसाच्या दिवसांत, दुपारच्या जेवणाआधी अर्धा चमचा खाल्ल्यास सर्दी होत नाही असे म्हणतात.

'कॉस्मोपॉलिटन' स्वरूपाच्या मुंबईत, वेगवेगळ्या प्रदेशातील माणसे राहतात. या सर्व लोकांचे लोणच्यांचे प्रकारही वेगवेगळे. तामिळ लोक टॉमेटोचे लोणचे करतात. टॉमेटोच्या फोडी करून, मीठ लावून रात्रभर ठेवाव्यात. मग त्याचे भरपूर पाणी सुटते. दुसऱ्या दिवशी फोडी पिळून काढाव्यात. शिल्लक राहिलेल्या पाण्यात थोडेसे आमसूल घालून ते मिश्रण फ्रीजमध्ये ठेवावे. कुरकुरीत होईपर्यंत फोडी वाळवाव्या. फोडी वाळल्यावर, फ्रीजमध्ये ठेवलेले पाणी बाहेर काढून, गाळून घ्यावे. त्या गाळलेल्या पाण्यात वाळवलेल्या फोडी भिजत घालाव्या. छानपैकी मऊ झाल्यावर मिक्सरमधून वाटून घ्याव्यात. तेल तापवून त्यात मेथी, हिंग परतून घ्यावे. राहिलेल्या तेलात हळद घालून, वाटलेले टॉमेटो त्यात घालावे. मेथी आणि हिंगाची पूड त्यात घालावी. मिरचीची पूड घालावी. रटरट असा आवाज आला की समजावे, झाले लोणचे तयार. या टॉमेटो लोणच्यासमोर टॉमेटो 'सॉस', 'कॅचप' तर अगदीच फिके.

हल्ली लोणचे कुणी करीतच नाही. वास्तविक, बहुतेकांना लोणचे करताच येत नाही. तब्येतीसाठी मीठ चांगले नसते असे मानतात आणि त्यामुळेदेखील लोणचे खाण्याचे प्रमाण कमी झाले आहे. या सर्वांच्याच जोडीला, बाजारात 'तयार' (रेडीमेड) लोणची विकत मिळतात. लोणच्याची, एक लहानशी बरणी विकत आणली की झाले काम.

लोणचे आणि पापडाशिवाय भारतीय शाकाहारी जेवण अपूर्णच. पापडाच्या बाबतीत एक गोष्ट चांगली. ती म्हणजे, सगळ्या

भारतीय भाषांत त्याला पापडच म्हणतात. दक्षिणेकडे त्याला पापडम् असे म्हणतात एवढाच किंचित फरक. लोणच्याचे मात्र तसे नाही. कोकणीत 'लोणचे' म्हणतात. ख्रिश्चन लोक 'मिस्कुट' म्हणतात. गुजरातीत 'अथाणा' तर हिंदीत 'अचार' म्हणतात. इंग्रजीत 'पिकल' तर पोर्तुगीज भाषेत त्याला 'आशार' असे नाव आहे. हिंदीतील 'अचार' हा शब्द पोर्तुगीज भाषेत कसा काय आला असावा ? असा प्रश्न मला नेहमी पडे. मग लक्षात आले की, पोर्तुगीज केरळमध्येही आले होते. तिथेच, पहिल्यांदा त्यांनी लोणचे चाखले असावे. गंमत म्हणजे, मल्याळी भाषेतही लोणच्याला 'अचार' म्हणतात. अशा पद्धतीने 'आशार' असा शब्द पोर्तुगीज भाषेत आला असावा.

या सर्व गोष्टी काही का असेनात आणि लोणच्याला कितीही वेगवेगळी नावे असली तरीही लोणचे ते लोणचेच. फक्त नाव काढायची फुरसत, लगेच तोंडाला पाणी सुटते. कोणत्या प्रकारचे लोणचे कोणी, कसे आणि किती खावे हा ज्याचा त्याचा प्रश्न.

बालपणीची एक आठवण. आईने कैऱ्यांचे लोणचे केले होते. त्या दिवशी दुपारच्या जेवणात मी पळीभर लोणचे ताटात घेतले. आई लागलीच माझ्यावर ओरडली, ''भाताएवढे लोणचे कुणी घेतात का कधी ? भात किती घ्यावा, लोणचे किती खावे याचे काही प्रमाण असते की नाही ?''

आईच्या त्या ओरडण्यात एक प्रकारचा विचार होता. त्या शब्दांच्या अंत:प्रवाहात दडलेला साधा अर्थ. आज तो लक्षात येतो. हसणे, खिदळणे, विनोद, आराम, मनोरंजन... कोणतीही गोष्ट असो, हे सर्व घटक जीवनाला चव प्राप्त करून देतात. गुणवत्ता मिळवून देतात. परंतु या सर्व घटकांचे प्रमाण किती असावे? जेवणातल्या लोणच्याइतकेच. तसे झाले, तरच आपले जीवन स्वादिष्ट आणि चवदार बनते !

□

श्री. चिन्मय घैसास

जन्म : १० नोव्हेंबर १९८८
पत्ता : ७३, वरगाव, माशेल, गोवा.
संपर्क : ९८२३७२८६४०

शिक्षण :
बी.ए. (मराठी/इतिहास, गोवा विद्यापीठ).
एम. ए. (मराठी, पुणे विद्यापीठ).
बी.एड. (गोवा विद्यापीठ).
सध्या इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून पत्रकारिता पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम.

कार्यानुभव :
कवळे येथील श्री शांतादुर्गा शिक्षण समितीच्या सौ. अन्नपूर्णाबाई मा. ढवळीकर विज्ञान उ. मा. विद्यालयात मराठीचे अध्यापक.
गोवा दूरदर्शन केंद्राच्या प्रादेशिक बातमीपत्र विभागात हंगामी वृत्तनिवेदक.
पणजी आकाशवाणी केंद्राच्या प्रादेशिक बातमीपत्र विभागात हंगामी वृत्तनिवेदक व भाषांतरकार.
'गोवा प्लस' वृत्तवाहिनीचे माजी वृत्तनिवेदक.
राज्य व राष्ट्रीय पातळीवर सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रमांसाठी सूत्रसंचालक, मुलाखतकार.
वृत्तनिवेदन, बातमीपत्र निर्मिती व सूत्रसंचालन विषयावर व्याख्याने, कार्यशाळा.
संगीत नाटक, गायन कार्यक्रमातून कला सादर.
प्रश्नमंजुषा स्पर्धांसाठी क्वीजमास्टर.

विशेष उल्लेखनीय :

राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर अभिनय, गायन, वक्तृत्त्व आणि प्रश्नमंजुषा स्पर्धात सहभाग व यश संपादन.

साधना प्रकाशन (पुणे) तसेच कला आणि संस्कृती संचालनालय (गोवा सरकार) आयोजित राष्ट्रीय साहित्य प्रश्नमंजुषा स्पर्धेचे विजेतेपद.

सकाळ करंडक आंतर-महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत 'अंतर्मुखी' एकांकिकेसाठी अभिनयाचे प्रशस्तीपत्र.

गोमंतक मराठी अकादमी आयोजित अखिल गोवा मराठी संगीत नाट्य स्पर्धेत 'हे बंध रेशमाचे' नाटकासाठी अभिनयाचे प्रशस्तीपत्र.

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र (मुंबई) आयोजित राष्ट्रीय आंतर-महाविद्यालयीन सुगम संगीत गायन स्पर्धेत सलग ४ वर्षे गोव्याचे प्रतिनिधित्व (२००६-२००९)

एल.जी. एलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (दक्षिण कोरिया), हानयांग विद्यापीठ (दक्षिण कोरिया) व पुणे विद्यापीठातर्फे संचालित भारत-दक्षिण कोरिया आंतरराष्ट्रीय 'लाईफ्स ग्रीन क्लास' विज्ञान प्रसार प्रकल्पाचे सदस्य.

□